६८ वा
वर्धापनदिन विशेषांक

संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

शनिवार, १५ ऑगस्ट २०१५ । मूल्य रु.३०

# पुनर्भेट
# हमीद दलवाईंची



हमीदच्या वैचारिक साहित्याचे वेगळेपण
त्याच्या वास्तवाच्या सम्यक आकलनात
आणि निर्भय मांडणीत दिसून येते.
तीच गोष्ट त्याचे ललित साहित्य
वाचतानाही जाणवते.
त्याचे मानवी भावजीवनाचे आकलन
सम्यक वास्तवावर आधारलेले आहे.
तो मुस्लिम समाजात वावरला, वाढला.
त्या जीवनातील विविध रसधारा
त्याने पाहिल्या, चाखल्या.
इतर मुस्लिम लेखकांप्रमाणे आपला समाज
वगळून त्याने फारसे लिहिले नाही.
त्याच्या काव्यात्म सत्याच्या मुळाशी
वास्तव सत्य ठाम उभे असते.
त्याने माणसे बेचैन, प्रक्षुब्ध झाली तरी
ते वास्तव सत्य नाकारणे
कोणालाच शक्य नसते.

यदुनाथ थत्ते ('लाट'च्या प्रस्तावनेतून)


कंप्यूटरशी मैत्री,
स्मार्ट करियरची खात्री MS-CIT
MS-CIT नंतर मी काय करु शकतो?
लेटर, ग्रीटिंग कार्ड, रिपोर्ट अशी आकर्षकपणे करू शकेन
मी माझा छान प्रोजेक्ट रिपोर्ट बनवू शकेन
मी ऑडॅसिटीचा वापर करून ऑडिओ रेकॉर्ड आणि एडिट करू शकेन
माझा व्हिडीओ बायोडेटा बनवू शकेन
माझ्या कामासाठी आकर्षक जाहिराती बनवू शकेन
इच्छित ठिकाणी पोहोचण्यासाठी गुगल मॅप्सवरून पत्ता शोधू शकेन
गुगलवरून मी हवी ती माहिती मिळवू शकेन आणि वापरू शकेन
मी नेट बँकिंगद्वारे बँकेचे व्यवहार घरबसल्या करू शकेन
मी स्क्रॅच प्रोग्रॅमिंग करून वेगवेगळे ॲनिमेटेड गेम्स तयार करू शकेन
सोशल मीडियामधून माझी नाती जोडू शकेन
MS-CIT नंतर पुढे...
क्लिक करियर ओरिएंटेड कोर्सेस
KLiC कोर्सेसची वैशिष्ट्ये
• यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मान्यताप्राप्त
• प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत प्रवेश व १५ तारखेला कोर्स सुरू
• एक/दोन/तीन महिन्यांच्या बॅचेसचे पर्याय • कोर्स कालावधी १२० तास
• MS-CIT व KLiC केंद्रात कोर्सेस उपलब्ध • इंग्रजी माध्यमातून प्रशिक्षण
• ४/५/६ क्लिक कोर्सेस पूर्ण केल्यावर KLiC Diploma मिळेल
• ऑनलाइन वर्क असाईनमेंट्स करून प्रत्यक्ष कमाई करिता EASY पोर्टल ही विशेष सुविधा
• ई-लर्निंग • प्रति कोर्स फी ₹३०००/-
KLiC Courses
DTP Track
KLiC Photoshop
KLiC DTP (Adobe)
KLiC DTP(CorelDraw)
KLiC WebDesigning
Finance & Accounts Track
KLiC Tally
KLiC Excel
Programming Track
KLiC SCRATCH
IT Hardware & Networking Track
KLiC Hardware Support
KLiC Network Support
KLiC Security Support
KLiC Desktop Support
Other Courses
KLiC AutoCAD
KLiC Video Editing
KLiC PowerPoint Expert
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
अधिक माहितीसाठी आजच नजीकच्या MS-CIT केंद्राला भेट द्या!
अथवा संपर्क: 9326552525
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कॉम्प्युटर कोर्स
www.mkcl.org/klic
www.mkcl.org/mscit



# अनुक्रम


पुनर्भेट कशासाठी ? । संपादकीय । ४
सत्यशोधक हमीद दलवाई । गोविंद तळवलकर । ०७
हमीदच्या गोष्टी । भाऊ पाध्ये । १४
हमीदनंतर...। मेहरुन्निसा दलवाई । २१

कथा । धर्म । हमीद दलवाई । २८
कथा : आमच्या घरची गोष्ट । हमीद दलवाई । ३३
कथा : कोल्हा आणि कोकरू । हमीद दलवाई । ३९

लेख : मुंबईकर मुसलमान । हमीद दलवाई । ४३
लेख : महाराष्ट्रीय मुसलमान । हमीद दलवाई । ४९
लेख : भारतीय मुसलमानांचे अंतरंग । हमीद दलवाई । ५४
लेख : हिंदू-मुस्लिम संबंध । हमीद दलवाई । ५९



१५ ऑगस्ट २०१५
वर्ष ६८ / अंक : १

संपादक :
विनोद शिरसाठ

**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

**विशेष सहाय्य :**
राजेंद्र बहाळकर

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**

अंकनिर्मिती व्यवस्थापक व अक्षररचना :
**सुरेश माने**

मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि. , २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा. लि. , वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून,
**४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.**
येथे प्रसिद्ध केले. □□.:(020)24451724
□□□.:7028257757
संपादक- विनोद शिरसाठ.
[illegible]@[illegible]
[illegible]

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. अंकातील छायाचित्रे इंटरनेटवरून. )

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ६०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १२०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : १८०० रुपये**

नाव, पत्ता, फोन नं व इ-मेल इत्यादी तपशील कळवून रोख/म. ऑ. /डी. डी. /चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, रक्कम साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, खाते क्र. 60025586634, □□□□□□□□□0000001, बँकऑफमहाराष्ट्र बाजीराव रोड शाखा, पुणे येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल/फोन करून कळवावेत.

## संपादकीय

# पुनर्भेट कशासाठी?



साधना साप्ताहिकाचा ६८ वा वर्धापनदिन (१५ ऑगस्ट) आणि डॉ.नरेंद्र दाभोलकर यांचा दुसरा स्मृतिदिन (२० ऑगस्ट) ही दोन निमित्ते साधून, हा विशेषांक प्रकाशित करीत आहोत.

महात्मा फुले-हमीद दलवाई-डॉ.नरेंद्र दाभोलकर हा काटकोन त्रिकोण आहे. म्हणजे तिघांच्या विचारांत व कार्यात साम्यस्थळे आणि अंतर्गत सुसंगती बरीच आहे. कशी आणि किती?

१. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि बहुजनांच्या शिक्षणाचा (विद्येविना मती गेली) जोरदार पुरस्कार केला. हमीद दलवाई यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली, त्यामागे महात्मा फुले यांच्या कार्याची प्रेरणा होती. डॉ.नरेंद्र दाभोलकर यांनी महात्मा फुले यांना 'सुधारकांच्या विद्यापीठांचे कुलपती' असे संबोधले आणि स्वत:च्या मुलाचे नाव हमीद दलवाई यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ठेवले.

२. महात्मा फुले यांनी स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र यांना गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी काम केले. हमीद दलवाई यांनी मुस्लिम समाजातील तलाक पद्धतीचा तीव्र धिक्कार केला आणि आधुनिक शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. नरेंद्र दाभोलकर यांनी शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करून, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार व प्रसार केला. महात्मा फुले यांनी ब्राह्मणी धर्मावर कठोर प्रहार केले, दलवाईंनी इस्लामची परखड चिकित्सा केली, दाभोलकरांनी 'कालसुसंगत धर्मचिकित्सा' हे सूत्र अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चतु:सूत्रीपैकी एक मानले. शोषण होत नसेल, अनैतिक वर्तनाचे समर्थन होत नसेल; तर या तिघांचाही धर्माला विरोध नव्हता, किंबहुना 'आम्हीच खरे धार्मिक' असा त्यांचा दावा होता.

३. धर्माच्या नावाखाली होत असलेल्या शोषणाला आणि त्यातून निर्माण होणाऱ्या विषमतेला विरोध करण्यासाठी तिघेही लढत होते, पण म्हणूनच केवळ त्या तिघांनाही 'धर्मबुडवे' हे विशेषण लावले गेले. महात्मा फुले यांचा खून करण्यासाठी मारेकरी पाठवले गेले होते; त्यातील एक नंतर त्यांचा अनुयायी झाला, हे आपल्याला माहीत आहे. हमीद दलवाईंच्या मृत्यूनंतर नरहर कुरुंदकरांनी लिहिले, ''दलवाईंबाबत खऱ्या आश्चर्यकारक गोष्टी दोन आहेत. एक- आठशे वर्षांच्या परंपरेविरुद्ध बंड पुकारणाऱ्या दलवाईंना चारशे अनुयायी मिळाले आणि दुसरे आश्चर्य- त्यांना नैसर्गिक मरण आले, हौतात्म्य पत्करावे लागले नाही.'' पण दलवाई आणखी दहा-वीस वर्षे जगले असते आणि तेच काम करीत राहिले असते तर त्यांना नैसर्गिक मरण आले असते, असे छातीठोकपणे म्हणता येत नाही. आणि डॉ.दाभोलकरांची हत्या जरी २०१३ मध्ये झाली असली, तरी मागील २५ वर्षे ते अशा प्रकारचा धोका पत्करून काम करीत होते की, जणू काही मृत्यूशीच खेळत आहेत.

गेल्या वर्षी हा काटकोन-त्रिकोण प्रकर्षाने लक्षात आल्यावर, डॉक्टर दाभोलकरांच्या दुसऱ्या स्मृतिदिनी 'हमीद दलवाई विशेषांक' काढायचे ठरवले. त्याला आणखी एक कारण होते- महात्मा फुले व डॉ.दाभोलकर यांचे सर्व आणि त्यांच्याविषयी इतरांनी लिहिलेले बरेच लेखन पुस्तकरूपाने उपलब्ध आहे; हमीद दलवाई यांच्याबाबत तसे म्हणता येत नाही आणि नव्या पिढीला तर त्यांच्या विचारांची व कार्याची पुरेशी ओळखही नाही. पण दलवाई यांच्यावर विशेषांक काढायचा म्हणजे नेमके काय करायचे, असा प्रश्न पुढे आला. म्हणून प्रोसेसने जायचे ठरवले. दलवाईंनी स्वत:

लिहिलेले व त्यांच्याविषयी इतरांनी लिहिलेले असे सर्व लेखन वाचायला घेतले. मग हळूहळू चित्र स्पष्ट होत गेले. अगोदर, आजच्या संदर्भात दलवाई आणि त्यांचे लेखन-कार्य-विचार यांवर नवीन लेख मिळवून विशेषांक काढायचे ठरवले; पण नंतर लक्षात आले की, दलवाईंच्या बरोबर वावरलेली अनेक माणसे काळाच्या पडद्याआड गेलेली आहेत आणि जे कोणी हयात आहेत, त्यांनी केलेले लेखन कुठल्या ना कुठल्या पुस्तकात उपलब्ध आहे. दरम्यान, दलवाईंचे व त्यांच्याविषयीचे १९५० ते ७० या काळात वृत्तपत्रांतून/नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेले, पण अद्याप कोणत्याही पुस्तकात समाविष्ट न झालेले (आणि पूर्णत: नजरेआड राहिलेले) काही लेखन वाचायला मिळाले. त्यातील डझनभर कथा आणि दोन डझन लेख असे आहेत, जे पुढे आणायलाच हवेत. त्यामुळे हमीद दलवाईंच्या तीन कथा व चार लेख आणि त्यासोबत मेहरुन्निसा दलवाई व भाऊ पाध्ये यांचे कोणत्याही पुस्तकात समाविष्ट नसलेले दोन लेख या अंकात घेतले आहेत. (गोविंद तळवलकर यांचा लेख मात्र या अंकासाठीच लिहिलेला आहे.)

या अंकातील दलवाईंचे लेखन १९५४ ते १९६६ या काळातील आहे. म्हणजे वय वर्षे २२ ते ३४ या काळातील दलवाईंचे हे लेखन आहे, याचे विस्मरण वाचकांना दोन कारणांसाठी व्हायला नको. एक- त्या काळाच्या पार्श्वभूमीवर या लेखनाचा विचार करावा आणि दुसरे- दलवाईंची बौद्धिक झेप आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यावरच किती मोठी होती हे लक्षात यावे.

या अंकातील (तळवलकरांचा लेख वगळता) सर्व लेखन राजेंद्र बहाळकर या आमच्या मित्राने, सेवादल सैनिकाने मिळवून दिले आहे. एवढेच नाही तर, मेहरुन्निसा भाभींशी सतत संपर्क ठेवून अंकाला आवश्यक ते सहकार्य मिळवले आहे. किंबहुना हमीद दलवाई यांच्यावर अंक काढायचा आहे, हे सांगितल्यानंतर त्यानेच आमचा आणि इतरांचाही पाठपुरावा केला आहे. या अंकासाठी लेख व कथा निवडण्यासाठी हिनाकौसर खान या नव्या पिढीतील मुलीचे मत विचारात घेतले आहे. अंक तयार होण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना सय्यदभाई व शमसुद्दीन तांबोळी यांची मदत झाली आहे. अमीर शेख या मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या संस्थापक सदस्याने काढलेली अतिशय दुर्मिळ छायाचित्रे सय्यदभाईंनी उपलब्ध करून दिली आहेत.

हमीद दलवाई यांचे ललित साहित्य व वैचारिक साहित्य यांवर विश्लेषणात्मक व दीर्घ लेख रझिया पटेल लिहिणार होत्या, पण वेळेअभावी तो पूर्ण झाला नाही. मात्र २९ सप्टेंबरच्या साधना अंकात (हमीद दलवाईंच्या जन्मदिनाचे निमित्त साधून) तो प्रसिद्ध करणार आहोत. डॉ.हमीद (दाभोलकर) लेख लिहिणार होता, त्याला हमीद दलवाई आयुष्याच्या तीन वेगवेगळ्या टप्प्यांवर कसे भेटले या विषयावर! पण पुनर्भेट अंक हे स्वरूप निश्चित झाल्यामुळे तो लेख मागे ठेवला आहे. आता २ ऑक्टोबरला युवा दिवाळी अंक प्रकाशित होईल, त्यात डॉ.हमीदचा लेख आणि त्यासोबत हमीद दलवाईंची ‘दहा रुपयांची नोट’ ही कथा प्रसिद्ध होईल. (ही कथा १९५२ मधील आहे, त्यावेळी दलवाईंचे वय होते २० वर्षे).

या अंकाचे संपादन करताना प्रकर्षाने लक्षात आलेला मुद्दा हा होता की, दलवाईंची तीनच पुस्तके (लाट, इंधन, राष्ट्रीय एकात्मता व भारतीय मुसलमान) उपलब्ध आहेत. त्यांचे ‘इस्लामचे भारतीय चित्र’ हे पुस्तक बऱ्याच वर्षांपासून उपलब्ध नाही, त्याची नवी आवृत्ती काढणे आवश्यक आहे. Muslim Politics in India हे त्यांचे पुस्तक मराठीत आलेले नाही. (दिलीप चित्रे यांनी दलवाईंचे साधनातील चार लेख इंग्रजीत अनुवाद करून आणि दलवाईंशी बोलून आठ लेख थेट इंग्रजीत केलेले आहेत.) त्याचा मराठी अनुवाद करून, ते पुस्तक प्रकाशित करणे आवश्यक आहे. शिवाय, दलवाईंच्या १२ कथा असंग्रहित आहेत, त्यांचेही एक पुस्तक होऊ शकेल. आणि या अंकातील चार लेख व अन्य आठ-दहा लेख यांचे मिळूनही एक नवे पुस्तक होऊ शकेल. सर्व संबंधितांचे सहकार्य मिळाले तर ही चारही पुस्तके साधना प्रकाशनाकडून येत्या ३ मेच्या आत

(दलवाईंचा स्मृतिदिन) प्रकाशित करणार आहोत.

हा सर्व आणि इतका खटाटोप कशासाठी, असा प्रश्न काही वाचकांच्या मनात येईल. त्याची दोन कारणे उघड आहेत. एक म्हणजे दलवाईंनीच त्यांच्या मृत्युपत्रात 'स्मारक नको, रिसर्च इन्स्टिटट्यूट उभारा' अशी अंतिम इच्छा व्यक्त केली होती, त्यामुळे किमान त्यांचे लेखन उपलब्ध करून देण्यासाठी आपण हातभार लावला पाहिजे. दुसरे कारण : मुळात हमीद दलवाईंची जडणघडण व वाटचाल यासाठी राष्ट्र सेवादल, समाजवादी पक्ष- संघटना आणि साधना परिवार यांचा बराच मोठा सहभाग राहिला आहे, त्यामुळे दलवाईंचे विचार व कार्य यांचे दस्तावेज नव्या पिढीसमोर आणणे हे साधनाचे कर्तव्यच आहे. किंबहुना ध्येयवादी वारशाला नव्याने उजाळा देण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. हमीद दलवाई आज हयात असते तर केवळ ८३ वर्षांचे झाले असते. त्यांना केवळ ४४ वर्षे आणि सात महिने (१९३२ ते ७७) इतके अल्प आयुष्य मिळाले. साधारणत: पहिली बारा वर्षे लेखनाचा काळ आणि नंतरची बारा वर्षे मुस्लिम समाजातील सुधारणांसाठी प्रबोधन व संघर्षाचा काळ, असे त्यांचे सार्वजनिक आयुष्य राहिले आहे. म्हणजे अवघ्या २५ वर्षांच्या काळात त्यांनी जे काम केले आहे, ते थक्क करणारे आहे.

रामचंद्र गुहा यांनी त्यांच्या Makers of Modern India या संपादित ग्रंथात ज्या १९ व्यक्तींविषयी लिहिले आहे, त्यात हमीद दलवाई एक आहेत. गुहा यांनी दलवाईंचा उल्लेख The Last Modernist असा केला आहे. ''पंधरा वर्षांपूर्वी, मुंबईच्या फूटपाथवर Muslim Politics in India हे जुने पुस्तक २० रुपयांत मिळाले आणि त्यानंतर अर्धा डझन वेळा तरी मी ते वाचले आहे.'' असे गुहा यांनी त्यांच्या एका लेखात म्हटले आहे. दलवाईंच्या याच पुस्तकातील तीन दीर्घ उतारे गुहा यांनी 'त्या' संपादित पुस्तकात घेतले आहेत. गुहांच्या पुस्तकातील १९ व्यक्तींमध्ये सर सय्यद अहमद खान, बॅ.महमंद अली जिना आणि हमीद दलवाई या तीन मुस्लिम व्यक्ती आहेत. यासंदर्भात गुहा यांना 'दलवाईंना कुठून व का आणले?' असा प्रश्न अनेकांनी विचारला. त्यावर त्यांचे म्हणणे इतकेच आहे की, 'आजच्या भारताला आधुनिक करण्यासाठी दलवाईंच्या विचारांइतकी उपयुक्तता अन्य कोणा मुस्लिम सुधारकाची मला तरी दिसलेली नाही.' असो...

हमीद दलवाईंच्या विचारांची व कार्याची उपयुक्तता अधोरेखित करण्यासाठी इतिहासकार रामचंद्र गुहा यांची साक्ष आम्ही दिली आहे. पण दलवाईंचे विचार व कार्य यांची आजच्या काळाच्या संदर्भात, अभ्यासपूर्वक चर्चा-चिकित्सा कोणी करणार असेल, तर त्या लेखनाला साधना साप्ताहिकातून पुरेशी जागा उपलब्ध करून दिली जाईल. कारण सेक्युलॅरिझम आणि रॅशनॅलिझम (धर्मनिरपेक्षता/धर्मातितता आणि विवेकवाद) बळकट करत जाणे, हे उद्दिष्ट भारतीय संविधानानेच आपल्यासमोर ठेवलेले आहे.

## प्रकाशन समारंभ

**पुनर्भेट : हमीद दलवाईंची** या विशेषांकाचे प्रकाशन
हस्ते : **दिलीप पाडगांवकर** (माजी संपादक, द टाइम्स आफ इंडिया)
प्रमुख पाहुणे : **डॉ.जब्बार पटेल** (ज्येष्ठ सिने-नाट्य दिग्दर्शक)
अध्यक्ष : **भाई वैद्य** (ज्येष्ठ समाजवादी नेते)
प्रमुख उपस्थिती : **मेहरुन्निसा दलवाई, सय्यदभाई, डॉ.हमीद दाभोलकर**

वेळ : सोमवार दि. १७ ऑगस्ट, सायं. ६ वाजता
स्थळ : एस.एम.जोशी फाऊंडेशनचे सभागृह, नवी पेठ, पुणे ३०

**स्मरण** । गोविंद तळवलकर

# सत्यशोधक हमीद दलवाई



हमीद केवळ मुस्लिम समाजावर टीकास्त्र का सोडतात, असा प्रश्न त्यांचे अनेक धर्मबांधव विचारत असत; परंतु समाजपरिवर्तनाचे काम करणाऱ्या अनेक परिवर्तनवाद्यांनी पूर्वापार हेच केले आहे. ज्या समाजात आपण जन्मलो- वाढलो, त्याच्यासंबंधी लिहिणे ओघानेच येते. लोकहितवादी, आगरकर, कर्वे, महात्मा फुले आदी सर्वांचा हाच परिपाठ असल्याचे दिसेल. तेव्हा हमीद आपल्याच समाजाच्या उणिवा दाखवून हिंदूंचा अनुनय करतात, ही टीका व्यर्थ होती; कारण त्यांनी हिंदूंवरही अनेकदा टीका केली आहे. पुढे तर त्यांनी समाजवादी पक्षावरही टीका केलेली दिसेल.

हमीद दलवाई जाऊन आता अडतीस वर्षे झाली, पण कोणत्या ना कोणत्या प्रसंगी वा निमित्ताने या काळात त्यांची अनेकदा आठवण येत राहिली.

हमीद वाचकांच्या पुढे आले ते कथाकार म्हणून. साठ-बासष्टचा तो काळ होता. त्यांची 'इंधन' कादंबरी पासष्टमध्ये 'मौज'ने प्रसिद्ध केली. ती चांगलीच गाजली. तिची लोकप्रियता दीर्घ काळ टिकल्यामुळे दोन वर्षांपूर्वी या कादंबरीची सातवी आवृत्ती निघाली.

आचार्य अत्रे यांनी त्यांच्या 'मराठा' या दैनिकात हमीद यांना १९६२ मध्ये घेतले होते. दैनिकात त्यांना दिवस व रात्रीच्या पाळ्या कराव्या लागत. पण नंतर अत्रे यांनी त्यांना मुक्त पत्रकार म्हणून वागवण्याचे ठरवले असावे. यामुळे ते अनेक दौरे करत. काश्मीरचाही दौरा झाला होता.

हमीद यांच्या कथा निरनिराळ्या मासिकांत येत. त्यातील बहुतेक लिखाण माझ्या वाचनात येत असे. पण त्या काळात मी डोंबिवलीत राहत होतो. हमीद यांची फेरी दादर, गिरगाव भागात झाली, तरी मला तिकडे फेरफटका फारसा करता येत नव्हता. पण १९६८ मध्ये मी 'महाराष्ट्र टाइम्स'चा संपादक झाल्यावर पुढच्या वर्षी मुंबईत चर्चगेटला ब्रेबॉर्न स्टेडियमजवळ राहू लागलो. यामुळे भेटीगाठी वाढणे शक्य झाले आणि आमची मैत्री वाढली.

हमीद यांना मुस्लिम समाजात परिवर्तनाचे अवघड कार्य करायचे होते. नोकरी-धंदा करून ते शक्य नव्हते. प्रसिद्धीपासून सदैव अलिप्त राहून विविध कार्ये आणि कार्यकर्ते यांना सदैव मदत करणाऱ्या समाजवादी परिवारातील गोरेगावचे पी.बी.सामंत यांनी हमीद यांच्यापुढे एक प्रस्ताव मांडला होता. सामंत व हमीद यांच्या काही मित्रांनी मांडलेल्या योजनेमुळे हमीद यांना नोकरी करण्याचे कारण राहिले नाही. त्यांच्या पत्नी मेहरुन्निसा या नोकरी करत राहिल्या.

हमीद यांनी त्यांच्या चिपळूणजवळच्या गावात असतानाच राष्ट्रसेवा दल या समाजवादी नेतृत्वाखालील

संघटनेत प्रवेश केला होता. त्यामुळे अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, ग.प्र.प्रधान, यदुनाथ थत्ते, भाई वैद्य, आदींच्या सहवासात हमीद येणे साहजिक होते. मुंबईत काम करू लागल्यावर त्यांच्याशी संबंध वाढत गेला आणि त्यांच्याकडून हमीद यांनी राजकीय धडे घेतले.

ललित लेखन आणि पत्रकारिता करणारे हमीद, मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापन करून व काही सहविचारी जमवून अत्यंत कठीण आणि काही वेळा स्वत:च्या व आपल्या कुटुंबीयांच्या जीवास धोका आणणारे काम करू लागले. त्यांच्या लिखाणाचे कौतुक करणाऱ्या माझ्यासारख्यांना मग वेगळ्या हमीदचे दर्शन झाले.

ललित लेखकाचे हे परिवर्तन मात्र आकस्मिक आणि केवळ भावनाशीलतेच्या आहारी जाऊन झाले नाही, हे त्यांच्याच काही कथा आणि 'इंधन' ही कादंबरी यांमुळे समजू शकेल.

'लाट' या कथासंग्रहातील पहिली कथा आहे, 'छप्पर'. नंतर थोड्याच वर्षांत हमीद यांनी मुस्लिम समाजात परिवर्तनाचे कार्य सुरू केले, त्यासाठीची त्यांची मानसिक तयारी तेव्हा होत असल्याची साक्ष देणारी ही कथा आहे. कथेचा नायक आपले शिक्षण संपवून चार वर्षांनी घरी येतो; पण घरातल्या अंधाराने बेचैन होतो. घरात जातो तो आणखी काळोख्या खोलीत आपली बहीण तिच्या नवजात मुलीला घेऊन बाजेवर पडलेली कशीबशी दिसते. तिचा पांढराफटक पडलेला चेहरा त्याला धक्कादायक वाटतो. या मुलीला काही झाले नसल्याची आई-वडिलांची खात्री मुलाला पटत नाही. घरात वारा व उजेड पाहिजे म्हणून तो आग्रह धरतो आणि डॉक्टरला बोलावून आणतो. तपासणी झाल्यावर बहीण वाढत्या अवस्थेतील क्षयाने बेजार असल्याचे समजते. ती मुलगी थोड्याच दिवसांत मरण पावते. तिच्या शुश्रूषेमुळे, संसर्गाने लहान बहिणीचे आयुष्य संपते आणि तिच्यानंतर वडिलांचेही. हा मुलगा छप्पर बदलण्याचा आग्रह धरतो; तर 'घर कसे जुने आहे, पूर्वजांनी आपल्याला हा ठेवा दिला असून तो किती मोलाचा आहे,' याची कहाणी आई सांगते. हिंदू काय नि मुसलमान काय- या समाजांच्या छपरांतच नव्हे, घरातही बदल व सुधारणा हवी; हमीद यांच्या या मागणीचा उगम अशा कथांत सापडू शकतो.

'इंधन' ही कादंबरी आजही ताजीतवानी वाटते. थकलेल्या शरीराला विश्रांती देण्यासाठी आपल्या कोकणातल्या खेडेगावात पंधरा वर्षांनी आलेला अशक्त नायक अपरिचित अशा वातावरणात येतो. नंतर हे आपले छोटे गाव कसे बदलले आहे, याची उदाहरणे एकामागोमाग त्याच्या पाहण्यात येऊ लागतात. पण त्याला खरा धक्का लहानपणी एकाच शाळेत शिकलेल्या सुमतीच्या जीवन-कहाणीने बसतो. ती अविवाहित असते; एकाच घराच्या अर्ध्या भागात भिंत घालून वेगळा राहणारा भाऊ वेगळ्याच वृत्तीचा असतो.

नायकाचा विवाहित भाऊ शिक्षक असताना या त्याच्या विद्यार्थिनीला बळजबरीने नादी लावतो आणि तिचे जीवन बरबाद होते. तीच हे सर्व त्याला कथन करते. कदाचित ती नायकाच्या प्रेमात पडली असावी. गावात इतरही अनेक बदल झालेले असतात. या बदलांबद्दल सुमती व नायक बोलतात, तेव्हा आश्चर्यचकित झालेल्या नायकाला ती म्हणते, 'आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. तू तर पुढारी आहेस, परिवर्तनाच्या गोष्टी करतोस; पण गावात होत असलेले बदल तुला माहीत नाहीत आणि समजलेही नाहीत.' इत्यादी बोलून तिने परिवर्तनाची हाक देणाऱ्यांना जमिनीवर येण्यास सांगितले आहे. परंतु, कितीही बदल झाले तरी कथानक पुढे गेल्यावर एका मूलभूत बाबतीत हवा तो बदल झालेला नाही, हे नायकास आणि सुमतीस पाहायला मिळते. ती बाब म्हणजे, हिंदू-मुसलमान यांच्यातील संबंध.

फाळणीनंतर मुंबईपासून दूर असलेल्या गावात उलथापालथ झाली, पण वातावरण निवळले. यात काही काळ गेला. तथापि, नायक परत गावी आला तेव्हा टाळता येऊ शकणाऱ्या कारणावरून हिंदू-मुसलमानांत दंगल पेटली. मग बदल कसला? या स्थितीत सुमती मुंबईला जाण्याचे टाळत होती, ती मुंबईला रवाना होते आणि नायकही तोच मार्ग स्वीकारतो. काही प्रश्न वर्षानुवर्षे सुटतच नाहीत, असा हा कादंबरीचा शेवट आहे. कादंबरी प्रसिद्ध झाली, तेव्हा हमीद यांच्या गावातही विरोधी वातावरण पसरले आणि महाराष्ट्रात ही कादंबरी चर्चेचा विषय होऊन बसली.

हमीद याच विषयात अधिकाधिक मग्न होत गेले आणि त्यांनी या विषयाचा अभ्यास व त्याविषयीची चर्चा अनेक वर्तुळांत, तसेच अनेक गावांत जाऊन करण्याचा परिपाठ सुरू केला. हमीद यांनी आपल्या कार्यास एखादे स्वतंत्र व्यासपीठ असावे, असा निर्णय घेतला. तसा तो घेणे अनिवार्य होते. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेऊन त्यांनी मंडळाच्या कामाला चालना देण्यास आरंभ केला, तो पुण्याला भाई वैद्य यांच्या घरी. हेही




डावीकडून : मुनीर सय्यद, मे.पुं.रेगे, ए.बी.शहा, नंदा नारळकर, हमीद दलवाई, श्री.करंदीकर, प्रभाकर पाध्ये.
या सर्वांसमोर (पाठमोरे) दिसत आहेत : सय्यदभाई आणि कुमार सप्तर्षी (गांधीभवन, कोथरूड, पुणे, नोव्हेंबर १९७०)

नमूद केले पाहिजे की, 'साधना' परिवार आणि समाजवादी व प्रजासमाजवादी हे हमीद यांना अनेक परीने मदत करत राहिले. परंतु हमीद यांनीच लिहिले आहे की, 'या राजकीय पक्षांना निवडणुकीच्या राजकारणाच्या मर्यादा होत्या. त्या लक्षात घेऊन स्वतंत्र संस्था स्थापन करणे आवश्यक होते.' यामुळे ज्यांच्याकडून जे मिळेल ते साह्य घेऊन बाकीचे आपण पाहावे, असा हमीद यांनी निर्णय घेतला.

नंतर प्रा.ए.बी. शहा, त्यांचे सहकारी व्ही.के. सिन्हा आणि दिलीप चित्रे हे कवी व लेखक यांनी हमीद यांना संस्थेच्या यंत्रणेचे साह्य देण्यास आरंभ केला. शहा यांची 'इंडियन सेक्युलर सोसायटी' आणि ते संपादित करत असलेले 'क्वेस्ट' मासिक यांचा हमीद यांना उपयोग होत होता. यामुळे महाराष्ट्राबाहेर प्रचार होण्याचा एक मार्ग मोकळा झाला. हमीद यांनी त्यांची संघटना उभी केली, त्या आधी थोडेच दिवस मी 'महाराष्ट्र टाइम्स'चा संपादक झालो होतो. हमीद यांची भेट झाल्यावर मी हमीद यांना जेवढे साह्य देता येईल तितके देण्याचे ठरवले. गिरगावच्या बाजूस राहत असलेले माझे सहकारी दि.वि.गोखले यांची हमीद यांच्याशी चांगली ओळख होती. हमीद लेख देण्यासाठी किंवा इतर चर्चा करण्यासाठी कार्यालयात येत, तेव्हा गोखले हजर असत. हमीद यांचा मनमोकळेपणा आणि त्यांची बोलण्याची हौस व लकब यांमुळे आमच्या कार्यालयात त्यांना अनेक मित्र मिळाले होते.

बोलता-बोलता एखादा विषय आमच्या मनात येई आणि हमीद त्याच्या अनेक बाजू लक्षात घेऊन लेख तयार करत. काही वेळा हमीदची व माझी अचानकपणे एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथालयात भेट होई. मग तिथेच असलेल्या मोकळ्या जागेत दुर्गाबाई भागवत, नाना जोशी, जयंतराव जोगळेकर आणि इतर काही यांच्या अड्ड्यामध्ये गप्पांत आम्ही वेळ विसरून जात असू. यातूनही विषय मिळत. 'महाराष्ट्र टाइम्स'मधील हमीद यांचा एक लेख रा.स्व. संघाच्या 'ऑर्गनायझर' या इंग्रजी नियतकालिकाने

भाषांतर करून प्रसिद्ध केला. त्यानंतर अलिगढ विद्यापीठातील एका चर्चासत्रासाठी आमंत्रित म्हणून हमीद, मे.पुं.रेगे आणि व्ही.के.सिन्हा गेले असता त्यांना 'ऑर्गनायझर'मधील लेखावरून कसे अडचणीत पकडण्यात आले, याची हकिगत हमीद यांनी मला अलिगढ़हून आल्यावर सांगितली होती. 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' या त्यांच्या पुस्तकात ती आहे.

अलिगढ विद्यापीठास हमीद अपरिचित नव्हते. ते पूर्वी अलिगढला काही वेळा गेले होते. पण या वेळेला काही विद्यार्थ्यांनी त्यांना 'ऑर्गनायझर'मध्ये तो लेख का लिहिलात आणि त्या नियतकालिकात तुमचे अनेक लेख कसे आले, असा प्रश्न विचारून त्याचे समाधानकारक उत्तर मिळण्यासाठी आग्रह धरला. हमीद यांचा खुलासा होता की– तो लेख त्यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'ला दिला होता, त्यामुळे त्याचे हक्क त्या पत्राचे झाले. 'ऑर्गनायझर'ला लेख त्यांनी दिला नव्हता. इतरही लेख कधीही दिले नाहीत.

एवढ्याने सर्व वाद थांबायला हवा, पण काही वेळाने त्याच विद्यार्थ्यांच्या गटाने 'ऑर्गनायझर'मध्ये हमीद यांचे आणखी काही लेख असल्याची तक्रार करून खुलाशासाठी घेराव घालून हमीद यांना चर्चासत्रात भाग घेण्यास अडथळा आणण्याचा मनसुबा रचला. तेव्हा रेगे व सिन्हा यांना चर्चासत्रात भाग घेण्यासाठी मागे ठेवून हमीद यांना आपले हॉटेल गाठावे लागले. या प्रकारचे मुस्लिमविरोधी लेख लिहून हमीद हिंदूंचा पाठिंबा मिळवत असल्याची निराधार टीका सर्रास होत होती.

हमीद यांचा असाच एक लेख 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मी छापला. तो रविवार होता. दुसऱ्या दिवशी सकाळीच मोइनुद्दीन हॅरिस यांचा मला फोन आला. हमीद यांचा लेख आक्षेपार्ह असल्याचे सांगून आपण दुपारी भेटायला येतो, असे ते म्हणाले. हॅरिस समाजवादी पक्षाचे मुंबईतील नेते होते. महापालिकेतील त्यांचे काम चांगले असे. एक सौम्य वृत्तीचे व अभ्यासू नगरसेवक म्हणून मी त्यांना मानत होतो. त्यांचा लेख प्रसिद्ध करण्यास मला काही अडचण नव्हती. पण मी त्यांना सांगितले की, तुमच्या लेखाने दोन पक्ष पडणार आहेत. तुम्ही उत्तर पक्ष करणार असल्यामुळे हमीद यांना उत्तर देण्याचा हक्क आपोआपच पोचतो. हॅरिस यांना ते मान्य होते. त्याप्रमाणे हमीद यांनी सविस्तर उत्तर दिले. वाद तिथेच संपला. आजच्या काळात काय झाले असते, याची कल्पना करवत नाही.

हमीद केवळ मुस्लिम समाजावर टीकास्त्र का सोडतात, असा प्रश्न त्यांचे अनेक धर्मबांधव विचारत असत; परंतु समाजपरिवर्तनाचे काम करणाऱ्या अनेक परिवर्तनवाद्यांनी पूर्वापार हेच केले आहे. ज्या समाजात आपण जन्मलो–वाढलो, त्याच्यासंबंधी लिहिणे ओघानेच येते. लोकहितवादी, आगरकर, कर्वे, महात्मा फुले आदी सर्वांचा हाच परिपाठ असल्याचे दिसेल. तेव्हा हमीद आपल्याच समाजाच्या उणिवा दाखवून हिंदूंचा अनुनय करतात, ही टीका व्यर्थ होती; कारण त्यांनी हिंदूंवरही अनेकदा टीका केली आहे. पुढे तर त्यांनी समाजवादी पक्षावरही टीका केलेली दिसेल. तेव्हा हिंदू अनुनयाची टीका किती चूक होती, हे स्पष्ट होईल.

मुस्लिम समाजाप्रमाणेच हिंदू समाजातही प्रतिगामी लोक सुधारणांना विरोध करत आले आहेत. उदाहरणार्थ– हिंदू कोडविषयीच्या विधेयकामुळे सरसंघचालक गोळवलकर तर रागावलेच, पण राष्ट्रपती असलेले डॉ.राजेन्द्र प्रसादही नाराज होऊन त्यांनी जितके अडथळे आणता येतील तितके आणले. यामुळे हिंदू कोड विधेयकाचा पहिला आराखडा काही बाबतींत थोडा सौम्य झाला. हिंदू लोकांची संमती असल्याशिवाय ते विधेयक आणता कामा नये, असा गोळवलकर, राजेन्द्र प्रसाद आदींचा पवित्रा होता; पण दुरुस्तीनंतर हिंदू कोड संमत झाले. त्यानंतर इतका काळ गेला. हिंदू समाजाचे त्यामुळे काय नुकसान झाले?

हमीद यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळ बळकट करण्यासाठी जोमाने काम करण्यास सुरुवात केली. अनेक मुस्लिम तरुण व स्त्रिया त्यांच्या कामात सहभागी होऊ लागल्या. मंडळाच्या विविध व वाढत्या कामाचे स्वरूप मेहरुन्निसा यांच्या आत्मचरित्रावरून लक्षात येईल.

आपले काम आणि लेखन यांसंबंधी चर्चा करण्यास हमीद यांना माझ्या कार्यालयाचे व घराचे दरवाजे कायम खुले होते. घरी माझी पत्नी शकुंतला सर्वांचे जसे नेहमी स्वागत करीत असे, तसेच त्यांचे मोकळेपणाने स्वागत करत होती. ते पहिल्यांदा घरी येऊन गेल्यावर शकुंतला म्हणाली, "हे तर कोकणस्थ ब्राह्मणासारखे दिसतात! त्यांच्यासारखे घारे डोळे आणि काहीसे सानुनासिक उच्चार."

हमीद यांचा रोखठोकपणा आणि स्वत:च्या व कुटुंबीयांच्या जीवाला धोका असताना बोलण्या–लिहिण्यात काही बदल न करण्याची वृत्ती, यामुळे राजकारणाशी कसलाही संबंध नसलेल्या व्यक्तींवर त्यांचा प्रभाव पडावा यात आश्चर्य नव्हते. हमीद यांनी एकदा सुलभ घटस्फोटाच्या (तलाक) प्रथेबद्दल मुस्लिम महिलांचा

निषेधपर मोर्चा काढला होता. तसा मोर्चा निदान मुस्लिम समाजाच्या इतिहासातील पहिलाच असावा. त्यास मिळालेल्या प्रतिसादावरून मूळ मागणीची निकड प्रकर्षाने जाणवली.

या मंडळाच्या वाढत्या व्यापामुळे संघटनात्मक, व्यावहारिक इत्यादी बाबींचा विचार करण्यासाठी हमीद बैठका घेत. अनेक बैठकांना आमंत्रण असल्यामुळे मी भाग घेत असे. पण संघटना, सभा इत्यादी मला न मानवणाऱ्या बाबी होत्या. वसंतराव नगरकर आणि ए.बी. शहा हे उत्साही व कार्यकुशल. यासाठीच्या काही बैठका आमच्या घरी घेण्यास मात्र मी तयार असे आणि तशा त्या होत.

मुंबईत मंडळाने एक परिषद घेतली होती. माझी आठवण बरोबर असेल तर, वेस्ट एन्ड या चित्रपटगृहाच्या वर वा जवळ एका सभागृहात ती भरली असावी. अर्थात, ठिकाण महत्त्वाचे नाही. समारंभासाठी अध्यक्ष म्हणून आलेल्या व्यक्तीचे भाषण झाले, इतरांचीही झाली. सभेचे आयोजन, नियंत्रण इत्यादीत मुख्य सहभाग शहा व हमीद यांचा होता. माझ्या हे नजरेस आले की- हमीद हे परिषदेचे आकर्षण, केंद्रबिंदू; पण उत्सवमूर्ती असलेल्या, अध्यक्षस्थानी असलेल्या व्यक्तीस ते पूर्ण मान देऊन वावरत होते.

मुस्लिम सत्यशोधक मंडळ महाराष्ट्रात स्थापन झाले. त्याचे संस्थापक हमीद हेही मराठी. पण ते कधी कोकण व मुंबई यातच फक्त फेऱ्या मारत राहिले नाहीत. महाराष्ट्राच्या सर्व भागाचा त्यांनी परिचय करून घेतलाच; पण त्यांची दृष्टी व्यापक, देशव्यापी होती. यामुळे दक्षिणेच्या चारही राज्यांचा त्यांनी दौरा केला. गुजरात, पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि पूर्वेस बंगाल व आसाम त्यांना अपरिचित नव्हते. या भेटीत अनेक तरुण मुस्लिमांशी चर्चा करण्यावर व मिळेल तितकी माहिती जमा करण्यावर त्यांचा कटाक्ष असे. 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' या त्यांच्या पुस्तकात हमीद यांच्या या चौफेर फिरण्याचा आणि दृष्टीचा पुरावा मिळेल. ती माहिती वाचल्यावर विविध भागांतल्या मुस्लिमांचे प्रश्न वेगवेगळे आहेत, हे लक्षात येऊन सरसकट एकच मत बनवणे आणि उपाय सुचवणे कसे चुकीचे आहे, हे समजते. हमीद यांचे ते पुस्तक त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध झाले. त्याचे हस्तलिखित मेहरुन्निसा यांना सापडल्यावर त्यांनी ते ग.प्र.प्रधान यांना दिले, तसेच भाई वैद्य यांना प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली आणि वैद्य यांनी ती लिहिली. पुस्तकाची पहिली आवृत्ती २००२ मध्ये तर दुसरी २०१२ मध्ये निघाली.

पुस्तक अपुरे राहिले, कारण हमीद यांचा शेवटचा वर्ष-दोन वर्षांचा काळ असाध्य रोगामुळे दुखण्यात गेला. मूत्राशयात बिघाड झाला होता. दुसरे मूत्राशय मिळाले आणि शस्त्रक्रियाही झाली. पण लवकरच पुन्हा बिघाड झाला. मग तीन-चार दिवसांनी डायलिसिसवर जावे लागे. जसलोक हॉस्पिटलमध्ये उपचार होत. कुरुविल्हा व कामत हे दोन्ही डॉक्टर अतिशय दक्ष होते.

हॉस्पिटलपासून जवळ राहण्याची त्यांची सोय शरद पवार व त्यांच्या पत्नी प्रतिभाताई यांच्यामुळे झाली. दोघांनी चांगली व्यवस्था केली होती. त्या काळात मी अनेकदा रामटेकच्या आवारातील त्या बंगलीत हमीद यांना भेटण्यासाठी जात असे. हमीद जेव्हा उपचार झाल्यावर परत येत, तेव्हा त्यांचा उत्साह बघून आनंद होई. एकदा तर दुसऱ्या महायुद्धाचा विषय त्यांनी काढला आणि पाऊणएक तास याच विषयावरचे संभाषण आमच्यात रंगले. पण ते संपल्यावर मी घरी जायला निघालो, तेव्हा वाईट वाटले. त्या दिवसांत हे वारंवार होत असे.

दलवाई यांच्या वर उल्लेखिलेल्या पुस्तकास लिहिलेल्या भाई वैद्य यांच्या प्रस्तावनेत निरनिराळ्या देशांत उदारमतवाद कसा वाढत आहे याची माहिती दिली असून, अखेरीस काही व्यक्तींचा नामनिर्देश केला आहे. तसेच हमीद यांच्या लिखाणाचा सर्व संदर्भ नीट लक्षात घेऊन मुस्लिमांनी विश्व हिंदू परिषद ज्याप्रमाणे हिंदूंची मने भडकवीत आहे त्याप्रमाणे मुसलमानांच्या बाबतीत करू नये, असे आवाहन केले आहे. परंतु हमीद यांनी मात्र मुस्लिमांच्या वृत्तीचा व हिंदूंचा संबंध नसून तिचा स्वतंत्रपणे विचार केला पहिजे, असे म्हटले आहे.

भाई वैद्य यांनी हमीद यांच्या कार्याचे यथायोग्य मूल्यमापन करून हिंदुत्वनिष्ठ संघटना कशा प्रकारे प्रचार करतात याचे विवेचनही केले आहे. हिंदू जातीयवादी संघटना वाढल्याबद्दलचा विषाद उचित आहे. त्याचबरोबर मुस्लिम जातीयवादी संघटनांचाही निषेध केला पाहिजे, असे हमीदच म्हणत असत. हिंदू समाजाच्या वर्तनाची प्रतिक्रिया मुस्लिम समाजात होते, असे हमीद यांनी म्हटलेले नाही. तेव्हा आत्मपरीक्षणाचा मार्ग आपल्या सर्वच राजकीय पक्षांनी स्वीकारला, तर बरे होईल.

हमीद यांनी स्वतंत्र व्यासपीठ स्थापन केले. हमीद हे ललित लेखक होते, पण त्याबरोबर ते नुसत्या स्वप्नात वावरत नसत. कित्येक वेळा आपण असे पाहतो की, प्रबोधनाचे अवघड आणि धोक्याचे कार्य करणारे लोक,

आपण यशाच्या जवळ आल्याचे मानून बोलत व लिहीत असतात. हमीद त्यांतले नव्हते. ‘राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान’ या पुस्तकात त्यांनी प्रबोधनाच्या कार्याचा आढावा घेताना ‘आपण मुस्लिम समाजास नव्या जीवनसरणीकडे वळवू,’ अशी भाषा केली नाही. हे सावकाश होणारे काम आहे, असे ते म्हणत. त्यांचा भरवसा तरुण पिढीवर होता. तसेच त्या पिढीत तंत्रज्ञ निर्माण व्हावेत, लहानसहान तांत्रिक कामांचा प्रसार व्हावा, असे ते म्हणत.

लक्षात घेण्याची गोष्ट ही की, हिंदू व मुसलमान हे दोन धर्मपंथ नसून दोन राष्ट्रे आहेत, असे सर सय्यद अहमद नंतर म्हणू लागले असले; तरी त्यांनी महाविद्यालयाची स्थापना करताना विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या शिक्षणासच प्राधान्य दिले होते. हमीद यांचा भरही विज्ञान व तंत्रज्ञान यांवर होता. अशा या हमीद यांच्या आयुष्याची समाप्ती अल्प काळात व्हावी, ही मोठी दु:खद घटना होती. अनेक घटनांनी भरलेल्या हमीद यांच्या जीवनाच्या अखेरीनंतरही पेच निर्माण झाला होता.

हमीद यांच्यावर अंत्यसंस्कार कोणत्या पद्धतीने करणार, हा तो प्रश्न. हमीद यांच्या गावचे पाच-पंचवीस लोक आले होते. हमीद यांचे शव गावाला नेऊन मुस्लिम पद्धतीने अंत्यसंस्कार करणार, असे ते म्हणत होते. तथापि, हमीद यांनी तीन छोटी पत्रे लिहिली होती. एकात त्यांनी ‘दफन करू नये,’ असे लिहून; ए.बी.शहा, वसंतराव नगरकर

## सच्चा सत्यशोधक

श्री. हमीद दलवाई यांच्या मृत्यूने एक सच्चा सत्यशोधक आपण गमावला आहे. दलवाईंनी हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन असा भेद कधीच मानला नाही, व्यवहारातही केला नाही. पण भारतातील मुस्लिम समाज अनेक कालबाह्य समजुतींनी, घातक रूढींनी ग्रस्त असल्यामुळे तो समाज इतरांच्या मागे राहिलाच आहे; पण मुसलमानांच्या प्रचंड संख्येमुळे राष्ट्रीय जीवनप्रवाहही थबकला आहे, अशी त्यांची धारणा होती व म्हणून त्यांनी मुस्लिम समाजसुधारणेच्या कार्याला वाहून घेतले. दलवाई हा अष्टपैलू मनुष्य होता. पत्रकारिता, लेखन, राजकारण आदी विषयांत आपणास उत्तम गती आहे हे त्यांनी सिद्ध केले होते, पण गेली काही वर्षे मुस्लिम समाजसुधारणेवाचून त्यांच्या डोक्यात अन्य विषय नव्हता, ओठांवर दुसरी भाषा नव्हती. मुसलमान समाजाचे अज्ञान नाहीसे झाले पाहिजे. मुस्लिम समाजातील बहुभार्या पद्धती नाहीशी व्हायची असेल, तर मुस्लिम स्त्रियांना गोषाबाहेर काढून त्यांच्यातच जागृती निर्माण केली पाहिजे, ही तळमळ त्यांना लागली होती. यासाठी त्यांचे सतत प्रचारदौरे चालू असत. जेथे जात तेथे मुस्लिम तरुणांच्या ते बैठकी घेत; महिलांना संघटित करीत, त्यांना परिषदा भरवून आवाज उठविण्याची प्रेरणा देत. हे करताना ना त्यांनी आपल्या संसाराकडे लक्ष दिले ना प्रकृतीकडे पाहिले. झपाटलेला कार्यकर्ता कसा असतो असे ते आजारी होण्यापूर्वी कोणी विचारले असते, तर हमीद दलवाईंकडे बोट दाखवावे लागले असते.

काही माणसे तोंडात चांदीचा चमचा घेऊन जन्माला येतात, तर काही माणसांच्या कपाळी कष्ट व हालअपेष्टाच लिहिलेल्या असतात. दलवाई या दुसऱ्या वर्गातले. घरची गरिबी, त्यामुळे उच्च शिक्षणाकडे वळणे अशक्य झाले. फाळणीच्या गर्जना भारतात घुमत होत्या त्याचवेळी हमीद सेवादलात जाऊ लागले. त्यामुळे वडिलांचे त्यांच्याशी तंटे झाले; समाजही डोळे वटारून पाहू लागला. पण दलवाईंच्या निष्ठा कधी ढेपाळल्या नाहीत, गरिबीमुळे ते जसे खचले नाहीत, तसे या डरकावण्यांनीही ते हबकले नाहीत. याच काळात त्यांचा ध्येयवाद निश्चित झाला, नि त्याच अनुरोधाने त्यांची पावले पत्रव्यवसायाकडे वळली. मुस्लिम समाजाबद्दल क्रांतिकारक विचार मांडणारे त्यांचे लेख वृत्तपत्रांत येऊ लागले, नि साहजिकच सनातनी मुसलमान संतापले. पण ‘इंधन’ या आपल्या कादंबरीबद्दल दलवाईंना मुस्लिमेतर समाजाचाही रोष ओढवून घ्यावा लागला. वस्तुतः ‘इंधन’ ही एक दर्जेदार कादंबरी आहे. वाचक व टीकाकारांनी ती जशी गौरविली, तसाच शासनानेही तिला पुरस्कार दिला. पण काही हितसंबंधी मंडळींनी कोकणातल्या लोकांना भडकावले नि दलवाईंना निदर्शनांना तोंड द्यावे लागले. दलवाई मात्र अशा गोष्टी हसण्यावारी नेत. सत्य तेच बोलणार नि इष्ट तेच करणार हा त्यांचा सुधारकी बाणा होता. समाज सुधारकाला लोखंडाचे चणे पचवावे लागतात, हे त्यांना ठाऊक होते. लेखणीप्रमाणे दलवाईंची वाणीही बहारदार होती. मराठी, हिंदी व उर्दूवर

आणि गोविंद तळवलकर या तिघांनी मिळून अंत्यसंस्काराची व्यवस्था करावी, असे म्हटले होते. आम्ही हमीद यांच्या गावकऱ्यांना हे वाचण्यासच दिले. शहा आणि शरद पवार यांनी त्या गावकऱ्यांना सांगितले की, हमीद यांनी त्यांची शेवटची इच्छा छोट्या पत्रात स्पष्ट केली आहे. ती पुरी न झाल्यास आम्हाला वाईट वाटेल.

मी चर्चगेट भागात जिथे राहत होतो, त्या रस्त्याच्या दुसऱ्या टोकाला दलवाई याच नावाचे गृहस्थ राहत. ते विधान परिषदेचे काँग्रेसतर्फे निवडून गेलेले आमदार होते. आम्ही एकमेकांस ओळखत होतो, इतकेच. बोलणे-चालणे विशेष नव्हते. त्या दिवशी मात्र मी त्यांना थोडे बाजूला बोलावले आणि म्हटले की, हा वादाचा विषय न झालेला बरा. हमीद यांची अखेरची इच्छा तुम्हाला समजली आहे. आमचा कसलाच आग्रह नाही. तेव्हा हे लक्षात घ्याल, तर सर्वांत बरे. दोन-चार मिनिटांत ते त्यांच्याबरोबर आलेल्यांशी बोलले आणि सर्व जण कसलाही वाद न करता निघून गेले. सर्व संस्कार झाले आणि हमीदच्या आठवणी काढत मी व शकुंतला घरी परतलो.

JmoqpX VidcH$a
govindtalwalkar@hotmail.com

त्यांचे प्रभुत्व होते. त्यामुळे भारतात कोठेही ते मुल्ला-मौलवींशी यशस्वी रीतीने दोन हात करीत. प्रसंग आला की अनेक माणसे लढतात, झुंज घेतात, पण दलवाईंना लढण्यात आनंद वाटे. लढण्याची त्यांना हौस होती.

दलवाईंचे नाव राहील ते मात्र त्यांनी सुरू केलेल्या मुस्लिम सत्यशोधक मंडळ या संस्थेमुळे. समाजसुधारणा हा विषय भारतातील सर्वच समाजांना अप्रिय, मुस्लिम समाजात तो इतरांपेक्षा कितीतरी नावडता. पण हेच आव्हान मानून दलवाईंनी हा मार्ग पत्करला. पहिली काही वर्षे त्यांना मिळणारा प्रतिसाद इतका क्षीण असे की, कोणीही वैतागून हे कार्य सोडून द्यावे. पण दलवाईंच्या प्रेरणा पोलादी होत्या. महात्मा ज्योतिराव फुले यांचे खडतर जीवन त्यांच्यासमोर होते. दलवाई खचले नाहीत. थकले नाहीत. नव्या उत्साहाने ते कामाला लागत. दोन वर्षांपूर्वी त्यांची प्रकृती बिघडली. पण तोपर्यंत त्यांच्या कार्याने चांगलेच बाळसे धरले होते. मुस्लिम महिला परिषदा मोठ्या गर्दीत झाल्या होत्या. अनेक मुस्लिम महिला आम्ही इतःपर अन्याय चालू देणार नाही, असे म्हणू लागल्या होत्या. बहुभार्या पद्धती कायद्याने बंद करता येईल काय, याचीही चर्चा सुरू झाली होती. अनेक मुस्लिम तरुण सत्यशोधक मंडळात आले होते. ही सारी दलवाईंच्याच तपस्येची फळे. आणीबाणीच्या काळात मुसलमान समाजातही प्रचंड मानसिक स्थित्यंतर घडले असून, तो राष्ट्रीय जीवनप्रवाहात आल्याचे दृश्य दिसते आहे. पण केवळ जनता पक्षाचे सरकार आल्याने जयप्रकाशांना अभिप्रेत असलेली संपूर्ण क्रांती होणार नाही. त्याचप्रमाणे आपल्या कालहत रूढी नि समजुतींचा संपूर्ण त्याग केल्याखेरीज मुसलमान समाजालाही विकासाच्या मार्गाने घोडदौड करता येणार नाही. हमीद दलवाईंची धडपड यासाठीच होती. मुस्लिम सत्यशोधक समाजाचे ईप्सित तेच आहे. दलवाई गेले तरी त्यांचे कार्य चालू राहिले पाहिजे; किंबहुना त्याला अधिक गती आली पाहिजे. तीच दलवाईंना खरी श्रद्धांजली.

आमच्या व्यक्तिगत दृष्टीने बोलायचे तर आमचा भाऊ गेल्याचे आम्हाला दुःख होते. हमीद न चुकता आठ-पंधरा दिवसांनी आमच्याकडे येत व जिवाभावाच्या गोष्टी बोलत. हमीद म्हणजे गोष्टीवेल्हाळ मनुष्य. पण त्यांच्या संभाषणात आकर्षकता असे, तसा जिव्हाळाही असे. यापुढे हमीद केव्हाही आमच्या घरी येणार नाहीत व आपले नवनवे अनुभव नि उत्साही योजना सांगणार नाहीत, हा विचारही आम्हाला बेचैन करतो. त्यांच्या पत्नी मेहरुन्निसा या आपल्या पतीच्या कार्यात समरस झाल्या होत्या. त्यांनी दलवाईंची गेल्या दोन वर्षांत जी सेवा केली ती केवळ प्रशंसनीय म्हटली पाहिजे. त्यांचे सांत्वन करणे आमच्या शक्तीबाहेरचे आहे. दलवाई कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

(अग्रलेख : महाराष्ट्र टाइम्स - ४ मे १९७७)

**स्मरण** । भाऊ पाध्ये

# हमीदच्या गोष्टी



हमीद निरीश्वरवादी होता. तो ज्या आपत्तीशी झगडला, तशा आपत्तीत निरीश्वरवादी राहणे ऐऱ्यागैऱ्याचे काम नाही. त्यात तो धर्माने मुसलमान. आमच्या वयाच्या लोकांना फालतू सांसारिक आपत्तींना तोंड देता-देता सिद्धिविनायकाला आणि शिर्डीला शरण जाताना मी पाहिले आहे. डॉ. लोहियांच्या मृत्यूनंतर अत्यंत साधेपणाने आणि कसलेही धार्मिक विधी न करता हमीदचे दहन झाले. हमीदच्या सर्व सत्यशोधक चळवळींपेक्षा त्याचे निर्वाणच मला स्पर्शून गेले.

'आज मी फक्त महात्मा गांधींच्या गोष्टी सांगणार आहे.' डॉक्टर लोहिया यांनी एकदा असे सांगूनच महात्मा गांधींवर भाषण दिले होते.

मीदेखील आज हमीदच्या गोष्टी सांगणार आहे, त्यापलीकडे त्याचे माझ्याकडे काही राहिले नाही. मी अलीकडे त्याला भेटलो नव्हतो. तो कधीही मान पुढे करून डोकावत, मला शोधत आला नाही आणि त्यामुळे एखाद्या हॉटेलात बसून गप्पाटप्पा झाल्या नाहीत. तो गोष्ट अत्यंत रसाळपणे सांगायचा. अरेबियन नाईट्स ते हमीद दलवाई-सारेच मुसलमान वर्णन करण्यात मोठे रसाळ. ऐकत राहावी. दळवी यांचे दलवाई कसे बनले किंवा कुणा तरी मुसलमानाने आपल्या दुष्मनाला आपल्या मुसलमानी घराच्या भूलभुलैय्यामध्ये दावत देऊन त्याचा काटा कसा काढला वगैरे.

दै. मराठाची नोकरी सोडून तो मुसलमानांना अक्कल शिकवण्याच्या पाठीमागे हात धुऊन लागला होता. त्याचा थांगपत्ता कुठे असेल, ते काय सांगावे? दै. मराठात असताना त्याच्या सहकाऱ्यांना मी विचारायचो, 'हमीद सध्या कुठे आहे?' ते विनोदाने म्हणत, 'तो आता पाटण्याला असेल जे. पी.शी वाद घालत. मग आला की सांगेल, मी जे.पींना एक सवाल टाकला. जे. पी. त्यावर नॉन-प्लस्ड ना!' मला एकदा तो असाच रेल्वेच्या डब्यात एकटा बसलेला आढळला. मी त्याच्याजवळ बसलो. मी त्याला डिवचण्यासाठी म्हणालो, ''काय हे मुस्लिम सत्यशोधक समाजाचे लफडे सुरू केले आहेस?'' तो म्हणाला, ''तुला काही मिळत नाही वाटतं हातात! तू काढ शोधून!''

हां, मी काही दिवस सिनेमा-व्यवसाय शोधून काढला.

हां ! आमच्या दोघांच्या लेखी काही तरी शोधून काढणे, हा एक आवश्यक भाग होता. कारण एकदा आम्ही एकाच प्रवाहात होतो. समाजवाद्यांच्या, साहित्याच्या आणि बेकारीच्या त्या प्रवाहात आम्ही गटांगळ्या खात नेहमीच

एकत्र येत असू. हमीद दलवाई या नावाविषयी मला कुतूहल वाटले ते त्याच्या सत्यकथेमध्ये (पंचवीस वर्षांपूर्वी) छापून आलेल्या 'बेकार माणसाच्या गोष्टी'मुळे. मी कामगार चळवळीमधून बाहेर पडून आता बेकारच होतो. बेकारीचे चटके बसल्यामुळे हमीदची ती कथा मला एकदम भिडली होती.

एक दिवस माझी बायको शोषण्णा युनियनच्या कचेरीवर हमीदला घेऊन आली. हमीद त्या वेळी फारच कोवळा, भाबडा, साधा समाजवादी कार्यकर्ता होता. असा कार्यकर्ता म्हटला म्हणजे, तो शोषण्णाला चिकटायचाच. आमच्या युनियनच्या नीरस मंडळींत लिहिण्याची धडपड करणारा आणि थोडेफार वाचलेला मीच. हमीदचीही सत्यकथेतली गोष्ट मी वाचली होती. त्यामुळे त्याची आणि माझी दोस्ती जमली.

साहित्यक्षेत्रात हमीद हा मला सीनिअर होता. फ्रेंड, गाईड, फिलॉसॉफर म्हणून तो तीनही भूमिका पार पाडू लागला. दोस्तोव्हस्की नामक कुणा रशियन कादंबरीकाराचा ग्रंथोबा तो काखेत घेऊन यायचा. त्यामधील काही मजकूर तो माझ्यासमोर ठेवायचा, 'वाच- असं लिहिता आलं पाहिजे!' त्यामुळे मी दोस्तोव्हस्कीच्या पाठीमागे लागलो. साहित्याच्या ॲक्टिव्हिटीमध्ये त्याला फारच उत्साह. त्या वेळी साहित्याच्या चर्चा अशा चालत- 'बा. सी. मर्ढेकरांनी कवितेला नवे वळण दिले.,' 'गंगाधर गाडगीळांनी मराठी कथा गोष्टीच्या फॉर्ममधून सोडवली'. असल्या चर्चांना हमीद मला फरफटत घेऊन जायचा. त्याने रूपारेल कॉलेजमध्ये एक चर्चा मंडळही स्थापन केलं होतं. शिवाय प्रा. शांता शेळके यांचे दादरचे घर, अभिरुचीकार चित्रे यांचे घर, इकडेही तो मला घेऊन जायचा. कधी तरी या चर्चेमध्ये 'हमीद दलवाईने मराठी साहित्यात मुसलमान जीवन आणले' असे बोलले जावे आणि आपले कान तृप्त व्हावेत, असे त्याला मनापासून कुठे तरी वाटत असावे. त्या वेळी लेखकमंडळी असेच लिहीत. श्री.ना.पेंडसे कोकणावर किंवा व्यंकटेश माडगूळकर माणदेशी माणसांवर. माझ्या पहिल्या दोन्ही कादंबऱ्या कामगार चळवळीवर होत्या. मला हमीद म्हणाला, ''तूदेखील चळवळ हाच विषय घेतला आहेस काय?'' मी त्याला म्हणालो, ''मी कामगार चळवळीला कायमचा रामराम ठोकलाय!''

तो काळ असा होता की, राजकारण आणि साहित्य

डावीकडून : हमीद दलवाई, बाबूमियाँ बँडवाले, मरियम रिफाई, गं.बा.सरदार (२५ मार्च १९७७, सेवासदन, पुणे)



हातात हात घालून जात नसे. हमीद आणि मी अशी चार-दोनच तरुण माणसे राजकारणातही रमत असू आणि लिहीतही असू. हमीदला माझ्या लिखाणात खूप इंटरेस्ट असे आणि मलाही त्याच्या लिखाणात खूप इंटरेस्ट असे, याचे कारण हेच असावे. हमीद माझ्या कथा घेऊन सत्यकथेत जायचा आणि परत घेऊन यायचा. त्यावर संपादक राम पटवर्धन यांनी लिहिलेला शेरा, त्याच्या टिपिकल खटक्या-खटक्याने हसण्याबरोबरच वाचून दाखवायचा, ''घ्या - तुमचा अनुभव गोळीबंद नाही.''

त्या वेळी विजय तेंडुलकर 'वसुधा' मासिकाचे संपादन करायचे. एक दिवस मला त्यांच्याकडे घेऊन गेला. माझ्या लिखाणाविषयी विजयरावांनी त्या वेळी सहानुभूतीने चौकशी केली. याचे कारण, माझ्या लेखनगुणासाठी हमीद जामीन राहिला होता ना!

लेखक म्हणून आयुष्यात कमाई करण्यासाठी असा आमचा दोघांचा स्ट्रगल चालला होता. एरवी आमची उमेदवारी चालली होती, तरी आमच्या उड्या फार मोठ्या होत्या. आपल्या हातून काही तरी युगप्रवर्तक लिखाण झाले नाही तर काही खरे नाही, असे आम्हाला मनोमन वाटायचे. दोस्तोव्हस्की तर आमच्या माथ्यावरच बसला होता. नाकेला, उंच, फाटक्या देहाचा, गोरा, दाढी वाढवलेला, तोंडात सतत 'सिमला' सिगारेटचे थोटूक चोखत असलेला हमीद म्हणजे मला दोस्तोव्हस्कीच वाटे. दोस्तोव्हस्की म्हणजे एक तुफान जीवन जगलेला लेखक. त्याचे अनुभव किती मोठे असतील! हमीदने एक दिवस मला एक किस्सा सांगितला. लहानपणी गावातल्या नदीमध्ये भर पुरात त्याने होडके हाकारले नि मग पुराने त्याला असे काही वाहून नेले की, आपण जिवंत राहतो की मरतो याची त्याला भ्रांत पडली. ''अनुभव हा असा असतो-'' मला तो म्हणाला. असे अंतर्बाह्य तुफान जगण्यासाठी आणि जीवघेण्या अनुभवासाठी काहीही करायचे. पण वाटून काय उपयोग? बेकारी हात धुऊन पाठीमागे लागली होती आमच्या. बेकारीने आमच्या जीवनातला बराचसा मौल्यवान वेळ आणि संधीही वाया गेली. एक दिवस मी निराश झालो असता हमीद मला म्हणाला, ''प्यासा सिनेमा बघ- तुझा लेखकाचा इगो त्यामुळे सुखावला जाईल.''

हमीद आणि माझे त्या वेळचे संबंध म्हणजे 'रोमन हॉलिडे'मधल्या राजवाड्यातून काहीही न घेता पळालेली राजकन्या आणि जुगारात कमाई घालवून बसलेला पत्रकार यांच्यामधील 'फिफ्टी-फिफ्टी' भागीदारासारखे. हमीदला पैशाची गरज नेहमीच असायची आणि त्या वेळेला त्याच्या पद्धतीने डिप्लोमॅटिकली पैशाचा विषय काढण्यासाठी तयारी करून तो यायचा. अत्यंत गांभीर्याने तो पैशांची मागणी करायचा. पैसे परत देण्याबद्दल अत्यंत आशादायक चित्र रेखाटायचा. तोपर्यंत मी एक शब्दही बोलत नसे. खिशातील पैशांचा अंदाज घेऊन, आणखी दोन दिवस चालतील एवढे पैसे ठेवून त्याला किती देता येतील, न देता आल्यास आमचा कॉमन मित्र विठ्ठल वाळिंबे किंवा दुसऱ्या कुणाच्या गळ्यात त्याला बांधता येईल का- वगैरे वगैरे ठरवायचो. परिस्थितीच इतकी बेकार झाली होती की, दिलदारपणानेही लाजून तोंड लपवावे. एकदा हमीदने धंदा करायचे ठरवले. त्या वेळी त्याने माझ्याकडे चक्क २५० रुपयांची मागणी केली. त्या वेळी माझा पगारही २५० रुपये नव्हता. मी मोठा हुशार. हमीदला दुखवायचे नाही आणि आपल्या खिशाला चाट नको, म्हणून त्याला विठ्ठल वाळिंबे या आमच्या भाबड्या मित्राच्या गळ्यात बांधले. बिचारा विठ्ठल फसला. पैसे देऊन बसला, पण ते मुदतीच्या आत येण्याची शक्यता दिसेना. तो चिडून हमीदला अद्वातद्वा बोलू लागला. हमीद अगदी खालच्या आवाजात त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न करू लागला. मी सेफ होतो.

अर्थात, पैसे देण्या-घेण्यामुळे आमचे संबंध बिघडले नाहीत. हमीद आमच्याकडे येत राहिला.

हमीदने एकदा बॉक्सेसचा धंदा सुरू केला, नंतर ट्रकचा. दोन्ही धंदे बुडाले. त्याच्या ट्रकच्या धंद्याचा किस्सा विजय तेंडुलकर वर्णन करून सांगत, तो ऐकण्यासारखा आहे. पैशांवरून संबंध तुटतात म्हणतात, पण हमीदचे संबंध कधीच तुटले नाहीत. पैसे घेऊन व देऊनही तो भेटायला येतच असे.

हमीद कसा यायचा? तुम्ही कधी हॉलीवुडहून येणारी 'ट्रिनिटी' ही विनोदी स्टंट चित्रपटाची मालिका पाह्यली आहे? 'वॉच आऊट- वुई आर मॅड' वगैरे! त्यातला तो तरुण पोरगा टेरेन्स हिल पडद्यावर दिसला की, काही तरी आता गडबड-धमाल होणारच असे वाटते - तसे हमीद आला की, वातावरण व्हायचे. त्याच्या 'कोपरी'मध्ये काही तरी 'मिश्चिफ' असायचीच! त्याने आपल्या एखाद्या मित्राचे प्रेम प्रकरण पाह्यले असेल, आपल्याविषयी कुणी तरी काही तरी बोलल्याचे ऐकले असेल... किंवा दुसऱ्या कुणाविषयी त्याला काही तरी गॉसिप सांगायचे असेल... त्या सर्वांना तो वाट करून द्यायचा!

''अरे, तुझा तो मित्र एका जून आणि थोराड पोरीबरोबर

फिरताना पाह्यला!'' हमीदने असा बाँबगोळा टाकला की, आमचे मित्रमंडळ हादरलेच पाहिजे. एकदा त्याच्या ऑफिसातल्या एका पोरीवर माझी लाईन होती. मी म्हणालो, ''हमीद, आपले जुळवून दे ना!'' तो म्हणाला, ''ती कुठे आणि तू कुठे!- तुला ती शोषण्णाच ठीक आहे!'' हमीदने मला बऱ्याच दीक्षा दिल्या. काही सांगण्यासारख्या, काही न सांगण्यासारख्या. फटकळपणा हा प्रथम मी हमीदकडून शिकलो. तो चार-चौघांत सरळ विचारायचा- ''बाईकडे जातोस की नाही? तिच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न आहे!'' त्या काळात समाजवादी पक्षाचे दोन तुकडे झाले आणि आम्ही लोहिया समाजवादी झालो. बाटग्याला आपल्या आधीच्या धर्माचा जसा राग असतो, त्याप्रमाणे आम्ही प्र.सो.पा.चा तिटकारा करायचो आणि आमच्या कळपात एखादा प्र.सो.पा.वाला आला की, मी त्याला उचलून हमीदपुढे टाकायचो. एखाद्या खाटकाप्रमाणे त्याच्यावर शाब्दिक सुरी फिरवून हमीदने त्याची बोटी-बोटी करून नाही टाकली, तर नावच नको. हमीदभाईने मनात एका कादंबरीची जुळवणी केली. तिचे नाव होते 'पछाडलेली!' खरा पछाडलेला असायचा हमीदच! नाना धंद्यांत मार खाऊन, नाना-पैशाच्या भानगडी करून आणि बेकारीमध्ये व तब्येतीच्या तक्रारींमध्ये पोळूनही तो आपल्या संकल्पित कादंबरीप्रमाणे ('पछाडल्या'प्रमाणे) वागायचा. त्याची आक्रमक वृत्ती कुठल्याही अडी-अडचणीमुळे कणभरही कमी झाली नव्हती. हा लेखक लिहायचा कमी. प्रसंगी अखंडित तात्त्विक वादावरून कुणाशीही भांडाभांडी काढावी, त्याला निरुत्तर करावे, याशिवाय त्याला सुखाची झोप लागत नसावी.

हमीदभाईचा एक सीरिअस प्रश्न होता. एक दिवस त्याने माझ्याजवळ वाच्यता केली- लग्न! हमीदसारखा फटकळ माणूस हा प्रश्न सीरिअसली घेईल, असे मला कधी वाटले नव्हते. ऑफिसमधल्या कार्बन पेपर्सचे काळे डाग खादीच्या कपड्यांवर उमटले आहेत, बोकडासारखी दाढी वाढवली आहे, तोंडात सिमलाचे सिगारेटचे थोटूक आहे- असा हमीदचा बकाल अवतार. शोषण्णाला तितक्याच धश्चोटपणे सांगायचा, ''अगं, तू कशाला माझी बहीण म्हणवतेस? तुझ्या एकाही मैत्रिणीची माझ्याशी ओळख करून देत नाहीस.'' शोषण्णा तरी काय करणार? हा असामी कितीही चांगला लेखक असला तरी, त्याचे फटकळ तोंड उघडले की, शोषण्णाची कुठली मैत्रीण त्याला घाबरली नसती? पण एक दिवस त्याचा लग्न हा प्रश्न खरोखरीच सीरिअस असल्याची मला जाणीव झाली. हा एक चांगला लेखक, राष्ट्रीय व समाजवादी वृत्तीचा मुसलमान- याने कधी सुखाचा संसार करायचा ठरवला; तर आपल्या भाभीशी चार शब्द बोलायचे सोडा, तिचे नखही दृष्टीस पडणार नाही- कारण ती असणार बुरख्यात. शिकलेली असणार, 'अलिफ बे' इतपावत. आपल्याला आपल्या तोडीची तरी- किमान मॅट्रिकपर्यंत शिकलेली, 'पडदा' वगैरे न पाळणारी आणि मित्रांचे आदरातिथ्य वगैरे व्यवस्थित पार पाडेल अशी बायको मिळणे दुरापास्त आहे, याची चिंता त्याला जाळायची.

एक दिवस अचानक तो 'आर्किमिडिज'प्रमाणे 'युरेका - युरेका' म्हणतच माझ्याकडे आला. त्याने माझ्या कानावर बातमी घातली ती अशी- खादी बोर्डात एक मेहरुन्निसा नावाची मुलगी आहे. ज्या अर्थी खादीबोर्डात लागली आहे, त्याअर्थी ती किमान मॅट्रिक असणारच- वगैरे. 'पुढे प्रगती?' होईल, म्हणाला. पण आपल्यासाठी खुदाने मुलगी निर्माण केली आहे, हे काय कमी आहे? त्यानंतर एक दिवस तो फोर्टात मिस्त्रीभवनमध्ये जिथे खादी बोर्ड होते, त्याच्या टेरेसवर तिच्याशी दोन-तीन तास प्रेमालाप करून आला. त्याने आपण बाजी मारल्याचा किस्सा सांगितला. त्या वेळी मी हा फटकळ आणि बेछूट असामी एका तरुण मुलीशी प्रेमालाप कसा करत असेल, हे चित्र डोळ्यांसमोर उभं करत होतो. काही केल्या ते चित्र डोळ्यांसमोर उभे राहिना. एकूण हमीद लग्न करत होता. हमीदचे लग्न म्हणजे ते साधेसुधे अन् मिळमिळीत कसे होईल? काही तरी त्याला झणझणीतपणा हवाच होता. मेहरुन्निसाच्या सग्यासोयऱ्यांनी हमीदला नापास केले होते. आता हमीद एलेमेंटस्‌मध्ये आला. काही तरी विरोध होतो आहे, कोणी तरी आपल्यासमोर लढण्यासाठी उभा राह्यलाय हे पाह्यलं की, हमीदमधील लढवय्याचे सगळे गुण उफाळून यायचे. त्या वेळी हमीदची सासुरवाडी दादर (सेंट्रल रेल्वे) स्टेशनजवळच्या त्या बकाल वस्तीत होती. मी नायगावला स्प्रिंग मिलमध्ये कामाला. हमीदला माझ्याकडे यायचं म्हणजे, सासुरवाडी समोरून यावं लागत असे. हमीदचा मी मित्र असल्यामुळे त्या वस्तीसमोरून जाताना माझ्याही कण्यातून एक थंडगार शिरशिरी जात असे. एक दिवस एका असामीने हमीदची गर्दन गप्कन धरली. झाले- त्याच्याशी झटापट करून हमीद निसटला आणि माझ्याकडे आला. त्याची तोळामासा प्रकृती त्या दिवशी संतापाने पेटली होती. जीभ चाबकाप्रमाणे सपासप चालली होती.

मेहरुन्निसा धीराची. तिने हमीदला वरले होते, म्हणजे वरले होते. लग्नाचा दिवस ठरला. त्या वेळी आपले दुष्मन आपल्या वाटेमध्ये काय काय अडचणी आणतील, या शंकांनी हमीद घेरलेला असे. अखेर मेहरुन्निसा घरातून बाहेर पडली, शादी नीटपणे झाली. हमीद आणि मेहरुन्निसा मुंबईच्या एका उंच शिखरावर अँटॉप हिलवर पोहोचले.

ते एक मुसलमान होस्टेल असावे. एक दिवस हमीद मला पाहुणचारासाठी घेऊन गेला. हमीद नेहमीच अशा भलत्याच वैराण ठिकाणी राहायचा. प्रथम जोगेश्वरी स्टेशनपासून ओशिवरा येथे भन्नाट रस्त्यावर एकच एक दलवायांची बंगली होती. तिथे तो राहायचा. आता अँटॉप हिलवर ह्या नवपरिणत युगुलाचा तो संसार पाहण्यासाठी मला अक्षरश: तंगड्या तोडाव्या लागल्या. पण वर गेल्यावर बरं वाटलं. मला मुसलमानांच्या संस्कृतीचे एक आकर्षण नेहमीच वाटले. ते म्हणजे, त्यांच्या देवाच्या घरात भरपूर मोकळी जागा ठेवतात. मला आता ते घर संपूर्ण आठवत नाही, पण खूप मोकळे वाटत होते. माझ्या स्वागतासाठी चहा व भजी होती आणि मी त्यांना कसलेच प्रेझेंट घेऊन गेलो नव्हतो. आपल्या सुखी संसाराविषयी सांगण्याऐवजी त्या दोघांनी दुष्मनाच्या हालचाली इतक्या ऐकवल्या की, त्या रीत्या जागेच्या भिंतींना कान तर नाहीत ना, असे मला भय वाटू लागले.

अखेर हमीदची आणि सग्यासोयऱ्यांची गोडी झाली असावी. हमीद आणि मेहरुन्निसाबाई They lived happily everafter असे जीवन जगू लागली होती. धर्मेच म्हणजे सत्यशोधक समाजाच्या कार्यात व अर्थेच- कारण मेहरुन्निसाही नोकरी करत होती. दोघांनी परस्परांना चांगलीच साथ दिली. हमीदने काढलेला पहिला मुस्लिम स्त्रियांचा मूक मोर्चा आठवतो. एक हमीद आणि पाच मुस्लिम बायका मागे. प्रत्येकाच्या हातात एक एक घोषणा-फलक. एकूण असा मोर्चा काढायला, नव्हे तर, त्यात सहभागी व्हायलाही हिंमत असावी लागते. मेहरुन्निसाबाई त्यांत एक होत्या. मी हमीदची बायको असतो, तर त्या मोर्चात मुळीच गेलो नसतो.

'डोंबाऱ्याचा खेळ' ही माझी पहिली कादंबरी हमीदच्या पहिल्या पुस्तकाच्या आधी आली. एक प्रकारे मी शर्यतीत आघाडीच मिळवली होती. लेखकाचे पहिले पुस्तक त्याच्या वाङ्मयीन जीवनातील घटना असते. माझ्यापेक्षा सीनिअर असलेले हमीद, दिलीप चित्रे यांची पुस्तके रेंगाळली आणि त्यामुळे त्यांच्या लिखाणावर लक्षणीय परिणाम झाला, असे माझे मत आहे. माझी स्प्रिंग मिलमधील नोकरीही याच वेळी संपली. हमीद त्या वेळी मला ना.वि. काकतकर संपादन करत असलेल्या 'रहस्य-रंजन' मासिकाच्या फोर्टमधील कचेरीत घेऊन गेला. तिथे माझी अशोक शहाणेशी गाठ पडली. अशोक शहाणे 'डोंबाऱ्याचा खेळ' वाचत होता. त्याने पुढील अंकातच माझ्यावर फर्मास परीक्षण लिहून मला आघाडीच्या लेखकांत नेऊन बसवले. त्यामुळे माझी हस्तरेषाच बदलून गेली. आतापर्यंत मी एक पाय राजकारणात आणि एक पाय लेखनात, अशी वाटचाल करत होतो; पण मी आता राजकारणातून माझा पाय उचलून फक्त लेखनाच्या दगडावर ठेवायचे ठरवले. माझ्या पुस्तकानंतर लगोलग हमीदचा 'लाट' हा कथासंग्रह अशोकच्या हातात दिसू लागला. 'लाट'वर अशोकने लिहिलेल्या परीक्षणाचे हस्तलिखित मला वाचायला मिळाले. त्याने हमीदचे पुस्तक झोडून काढले. मला त्यामुळे फारच वाईट वाटले. मी अशोकला म्हणालो, ''तुला काय म्हणायचे आहे? हमीद चांगला लिहित नाही का? हमीदचे अनुभव किती समृद्ध आहेत ना!''

''आहेत ना! मला ठाऊक आहे. त्याच्याजवळ अनुभवांचा खूप साठा आहे. पण त्यापैकी लेखनात काहीच उतरत नाही.''

अशोकच्या परीक्षणानंतर हमीदची हस्तरेषाही बदलली असावी. त्या परीक्षणामुळे तो नक्कीच दु:खी झाला असावा, पण त्याला इलाज नव्हता. त्या परीक्षणानंतर हमीद लेखनातून आपला पाय उचलून राजकारणात हळूहळू ठेवतो आहे, असा भास झाला.

हमीदचे त्यानंतरचे पुस्तक 'इंधन'. त्याच्यावर मी 'नवशक्ती'मध्ये चांगले परीक्षण लिहिले असले, तरी मी हमीदकडून अधिक जोरदार लेखनाची अपेक्षा करत होतो. हमीद जी माणसं पाहत असे - ज्या घटना पाहत असे, ती उघडी दिसतील अशा पद्धतीने त्यांचा आपल्या लिखाणात उपयोग करायचा. 'इंधन'मधल्या व्यक्तीमुळे चिपळूणमध्ये निदर्शने झाली, ती त्यामुळेच. हमीदच्या 'इंधन'ला राज्य पारितोषिक मिळाले, त्याच वेळी वासूनाक्याचे वादळही उठले होते. आचार्य अत्रे माझ्यावर जोरात हल्ले करत होते. एक दिवस हमीदचा मला फोन आला. तो म्हणाला, ''मी आणि शिरीष पै, साहेबांची समजूत काढण्याचा प्रयत्न करतो आहोत. तू अस्वस्थ होऊ नकोस.'' वगैरे.

हमीदने 'इंधन'नंतर मराठी साहित्यात काही भर टाकली नाही किंवा मराठी साहित्यात कोकणचा मुसलमान आणला नाही वगैरे- म्हणून काहीच बिघडले नाही- अर्थात, त्याचे; मराठी साहित्याचे नव्हे! मराठी साहित्यात आता प्रादेशिक

कादंबऱ्यांची पहाट झोपडपट्टी, वासूनाक्याची दुपार आणि कोसला व बॅ.धोपश्वरकर यांची संध्याकाळ संपून चक्क भयाण रात्र सुरू झाली होती. या रात्रीमध्ये मलाही चांगली प्रसिद्धी मिळाल्यानंतर फारसा इंटरेस्ट राहिला नव्हता. आता साहित्याच्या माध्यमापेक्षा चित्रपटाच्या माध्यमांतच काही करता आले तर ते बरे, असे मला वाटू लागले होते. मग उगीच या साहित्याच्या अंधारमय जीवनात ठेचकाळण्यापेक्षा हमीद मुसलमानांमध्ये सुधारणेचे कार्य करू लागला. त्यामुळे त्याचे कर्तृत्वही प्रकाशात आले.

मी हिंदू-मुसलमान वाद मानत नव्हतो. त्यामुळे रॉड स्टीगर या गोऱ्या नटाला ज्याप्रमाणे काळ्या सिडने पोशिएने म्हणे वर्णभेदाचे स्वरूप समजावून दिले, त्याचप्रमाणे मला हमीदने या जातीयवादाचे स्वरूप समजावून दिले. आम्ही सेवादलवाले काय किंवा राष्ट्रीय चळवळवाले काय, एखाद्या हिंदूलाच मुसलमानी टोपी चढवून, दाढी चिकटवून आणि लुंगी नेसवून दुसऱ्या हिंदूचा हातात हात धरून 'हिंदू-मुसलमान भाई भाई' म्हणून घोषणा देत होतो. त्या बकवास होत्या, हे हमीदमुळे मला समजले.

पुढे 'नवशक्ती'मध्ये असताना हमीदच्या चळवळींना पाठिंबा देण्याचे आमचे धोरणच होते. हमीद ज्या 'दै. मराठा'त काम करत होता, त्या मराठापेक्षा नवशक्तीने हमीदचा पाठपुरावा केला. हमीदच्या साऱ्या चळवळींचे रिपोर्टिंग करणे माझ्याकडेच असे. त्याचे पुस्तक आले की, त्याच्यावर परीक्षणे लिहिणेही माझ्यावरच सोपवले जाईल.

हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या प्रश्नाला हमीदने एक वेगळा, अधिक तर्कशुद्ध आणि धडाडीचा दृष्टिकोन दिला, यात शंका नाही. मला एकदा तो म्हणाला होता, ''काय तुम्ही डरपोक हिंदू. तुम्ही चाळीस कोटी असून, आठ कोटी मुसलमान तुम्हांला टरकवतात!'' त्या वेळी मला माझे बालपण आठवले. लहानपणी आम्हाला ज्याने-त्याने मुसलमानाचा बागुलबुवा दाखवावा. त्यामुळे आम्ही टरकू बनलेले- आता मोठेपणी मग आर. एस्. एस्. मध्ये जाऊन आणि हिंदू महासभेत जाऊन आमची भीती कशी जाणार? अर्थात, मुस्लिमांच्या प्रश्नाबाबत माझा इंटरेस्ट यथातथाच होता. हमीद म्हणजे, त्याच्या न लिहिलेल्या कादंबरीच्या नावाप्रमाणे मुसलमानांच्या प्रश्नाने पछाडलेला होता. त्याचे

डावीकडून : नजमा शेख, श्रीमती तय्यबजी, हमीद दलवाई, बाबूमियाँ बँडवाले, मरियम रिफाई (२५ डिसेंबर १९७१)



ते पाकिस्तान दौरे, जयप्रकाशांपासून बाळ ठाकऱ्यांपर्यंत ज्या-त्या पुढाऱ्याला हिंदू-मुस्लिम प्रश्नाबाबत समज देण्याची धडपड, बुजुर्ग नेते एम्. हॅरिस यांच्याशी सवाल, जबाब- अशी सारखी धुमश्चक्री चालली होती. त्या वेळी मुंबईमध्ये युवक क्रांती दल ऊर्फ यूक्रांद ही संस्था हमीदच्या कार्याचा पाठपुरावा करायची. हमीदला युक्रांद आणि युक्रांदला हमीद असे समीकरण झाले होते. एकदा दादरच्या साने गुरुजी विद्यामंदिरात युक्रांद आणि जनसंघाच्या विद्यार्थी परिषदेचे तद्दन Confrontation झाले होते. हमीदचे भाषण ऐकण्याचा त्या वेळी मला प्रथम योग आला होता. मला पूर्वी नेहमी वाटायचं की, हमीद बोलण्यात माझ्यासारखाच आहे. व्याख्याने टाळणारा. पण आता हमीद चांगलाच बोलायला शिकला होता. त्याच्या भाषणाचा रिपोर्ट देताना हमीदने विद्यार्थी परिषदेचा धुव्वा उडवला म्हणून मी लिहिले. दुसऱ्या दिवशी विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते माझ्यामागे लागले होते.

हमीदच्या ह्या भाषणावर दुसरीकडे लिहिताना मी कॉमेंट्स केल्या. 'हमीदचे भाषण म्हणजे, पैगंबरापासून औरंगजेबापर्यंतचा इतिहास ऐकावा लागतो!' त्यानंतर हमीद मला भेटला तेव्हा तो मला म्हणाला, ''आज माझं अमुक तमुक ठिकाणी भाषण आहे; मी पुन्हा पैगंबरापासून औरंगजेबापर्यंतचा इतिहास सांगणार आहे. ये, तुझा इतिहास पक्का होईल.'' हमीदबरोबर पूर्वीप्रमाणे दिलखुलासपणे बोलायचा माझा हा अखेरचा प्रसंग. त्यानंतर हमीद एका चळवळीचा पूर्ण नेता झाल्याचे दृश्य पाहण्याचा योग आला. मराठा मंदिर येथे भरलेल्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या परिषदेत. मुस्लिम सत्यशोधक ह्या चळवळीने आता विचारात येण्याइतके मोठे स्वरूप धारण केले होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले कार्यकर्ते, अनेक मुसलमान महिला आणि चळवळीच्या अग्रस्थानी हमीद विराजमान झालाय. एक विचारवंत, धडाडीचा मुत्सद्दी आणि आपले सर्वस्व त्या चळवळीमध्ये झोकून देणारा लढवय्या. अचानक त्याचा जीवनपट माझ्या डोळ्यांसमोरून हलला. लहान मुलाने हातातला रंगीत गॅसचा फुगा हवेत सोडून द्यावा आणि त्याचा अस्मानात क्षणोक्षणी उंच जाणारा प्रवास कुतूहलाने पाहत राहावा, त्याप्रमाणे परिषदेच्या कोपऱ्यामध्ये बसून मी हमीदकडे पाहत होतो. इतक्यात दोन कार्यकर्ते आले आणि त्यांनी मला उचलून पत्रकारांच्या रांगेत नेऊन बसवले.

त्यानंतर माझ्या नि हमीदच्या मुलाखती कमी. हमीदला आमच्यासारखे वेगवेगळ्या विषयांत इंटरेस्ट नाहीत आणि मुस्लिम चळवळीमध्ये त्याने लक्ष घातल्यामुळे तो पछाडल्यासारखाच वागत होता. एकदा मी चक्क त्याच्याबरोबर चर्चगेट ते बांद्रा हा प्रवास केला. या प्रवासामध्ये तो इतका काही आपल्या विचारात गढला होता की, मला तो विसरलाच होता. दुसरी गोष्ट, माझ्या लक्षात आली होती- ती म्हणजे, तो सतत अस्थिर होता. आपले हात, बोटे व भिवया अशा काही हलवायचा की, मलाही बेचैन वाटू लागले. बांद्रा येताच मी त्याचा निरोप न घेताच उतरलो- त्या वेळी माझ्यावरचे एक दडपण दूर झाल्यासारखे वाटले. मुंबई हे एक दुरावा निर्माण करणारे शहर आहे. एखाद्या क्यूमध्ये अधिकाधिक माणसे घुसू लागली म्हणजे आपण जसे दूर फेकले जातो, तसे मुंबईमध्ये आपण एकमेकांपासून दूर फेकले जातो. हमीदला मी अलीकडे भेटत नसे. मी अतिशय आळशी, एकलकोंड्या आणि माणूसघाण्या झालो होतो. मुंबईमध्ये मधुमेह आणि हे स्वभावदोष एकदम येतात. मला आठवते- एकदा मी मेहरुन्निसा भाभीला चलाखीने टाळून सटकण्याचा प्रयत्न करत होतो, पण भाभीने मला पकडून चांगलेच शरमिंदा केले होते. हमीदपासून मी दूर गेलो, याच्याबद्दलही मला अशीच शरमिंदगी वाटते...

परवा हमीद गेल्याचे वृत्त आले. तेव्हा एक मित्र, हमीदचे कुठल्या मशिदीमध्ये दफन होणार याची माहिती काढण्यासाठी फोनवर फोन करत होता. अखेर तो 'झूम'च्या कचेरीमध्ये आला नि मला म्हणाला, ''काही कळत नाही, हमीदला कुठे नेला ते?'' मी म्हणालो, ''त्याला चंदनवाडीत इलेक्ट्रिक भट्टीत नेण्यात आले आहे. जा तिथे.'' तो म्हणाला, ''तू चौकशी केलीस का?'' मी म्हणालो, ''नाही, पण मला ठाऊक आहे.''

हमीद निरीश्वरवादी होता. तो ज्या आपत्तीशी झगडला, तशा आपत्तीत निरीश्वरवादी राहणे ऐऱ्यागैऱ्याचे काम नाही. त्यात तो धर्माने मुसलमान. आमच्या वयाच्या लोकांना फालतू सांसारिक आपत्तींना तोंड देता-देता सिद्धिविनायकाला आणि शिर्डीला शरण जाताना मी पाहिले आहे. डॉ.लोहियांच्या मृत्यूनंतर अत्यंत साधेपणाने आणि कसलेही धार्मिक विधी न करता हमीदचे दहन झाले.

हमीदच्या सर्व सत्यशोधक चळवळींपेक्षा त्याचे निर्वाणच मला स्पर्शून गेले.

('सोबत' साप्ताहिक : ७ जून १९७७)

**स्मरण** । मेहरुन्निसा दलवाई

# हमीदनंतर...



या प्राध्यापक महाशयांच्या घरी जाताना त्यांचा पत्ता विचारण्यासाठी म्हणून
मी टांगा थांबवला आणि एका सद्‌गृहस्थांना विचारलं
तेव्हा त्यांनी पत्ता सांगितला; पण माझं नाव सांगितल्यानंतर मात्र तो उसळला,
''वो जनसंघ का बगलबच्चा एजंट हमीद दलवाई? उसकी आप बेगम?''
हुसेन जमादारांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, पण त्याने
आपल्या आरोपांचं पालुपद चालूच ठेवलं.
अर्थात, रस्त्यावर कुठलाही अतिप्रसंग झाला नाही.

हमीद दलवाईंचे व माझे एक मित्र श्रीकृष्ण व्यवहारे यांनी त्यांच्या संस्थेमार्फत ठाणे येथे मुसलमानांच्या प्रश्नावर व्याख्यान देण्याकरता गेल्या वर्षी बोलावले होते. व्याख्यानानंतर काही प्रश्नोत्तरे झाली. एक प्रश्न होता– मुसलमान समाजातील तुम्ही अतिअल्पसंख्य. तुमच्या पाठीशी समाज नाही यावरून तुमची काही धोरणे चुकत आहेत, असे तुम्हाला वाटत नाही का? प्रश्न विचारणारे गृहस्थ हिंदू होते आणि म्हणून क्षणभर मला या प्रश्नाचे आश्चर्य वाटले. तुमच्या पाठी मुसलमान समाज नाही, तुमचे विचार तुम्ही हिंदूंपुढे मांडता वगैरे आरोप हमीद दलवाईंवर बऱ्याच ठिकाणी केले जात आणि असे आरोप करणारे केवळ मुसलमानच होते. कोणा हिंदूने तुमच्या पाठीशी समाज नाही म्हणून तुमचे विचार चुकीचे आहेत, असे दलवाईंना सांगितल्याचे माझ्या ऐकिवात नाही. म्हणून मला विचारल्या गेलेल्या प्रश्नाने मी थोडीशी चकित झाले. तरीसुद्धा या प्रश्नाचे उत्तर माझ्यासमोर स्पष्ट होते आणि ते येथे मुद्दाम नमूद करण्यासारखे आहे. मी म्हणाले, ''महत्त्वाची गोष्ट ही आहे की, प्रबोधनाची संघटना किंवा चळवळ ही विचारांवर वाढणारी संघटना आहे, संख्येवर नाही. विचार हे या चळवळीचे प्रमुख अधिष्ठान आहे. या विचारामागे काही निश्चित निष्ठांच्या प्रेरणा आहेत. विचार जर बरोबर असेल, तर या विचारामागे संख्या किती, हा मुद्दा माझ्या दृष्टीने गौण आहे. दुसरे असे की, सामाजिक सुधारणेचा विचार हा काळाच्या नेहमी दोन पाऊले पुढे असतो आणि इस्लाम धर्माच्या संदर्भात हमीद दलवाई व मुस्लिम सत्यशोधक मंडळ यांच्या धोरणांचा विचार केला तर, तो बराच शतकं पुढे आहे, असं मला वाटतं. आणि तो कितीही पुढे असला आणि आमची संख्या कितीही कमी असली, तरी तो गाठत राहणं हे देशहिताच्या दृष्टीने, मुसलमान समाजाच्या हिताच्या दृष्टीने आमचं कर्तव्य मानतो. हे आधुनिक विचार मुसलमान समाजाने स्वीकारले नाहीत, आत्मसात केले नाहीत; तर या समाजाला या देशात

भवितव्य नाहीच, पण सामाजिक तणाव यामुळे अधिक वाढतील आणि दोन समाजांतील दुरावा वाढेल. वैमनस्यही वाढेल. तिसरे असे की- ज्या समाजात आपण राहतो, त्या समाजाकडून आपण आपल्या जीवनामध्ये बरंच काही घेतो; पण त्याची परतफेड आपण करत नाही. प्रत्येकाने आपल्या शक्तीनुसार ही परतफेड केली, तर समाजजीवन अधिक संपन्न आणि सुदृढ होईल. आमचं कार्य हे देणं देण्याच्या स्वरूपातीलही आहे.''

माझ्या या उत्तरानं पुढचा प्रश्न त्यांनी विचारला नाही. हमीद दलवाईंच्या निधनानंतर मी प्रा. अ. भि. शहांकडे महिनाभर राहिले, त्या काळातच मी माझ्या या विचाराची दिशा ठरवलेली. वाचन, वाचनातून चिंतन, चिंतनातून प्रबोधन आणि या प्रबोधनातून सामाजिक सुधारणेकडे जाण्याची वाट मी ठरवली. अर्थात, हे ठरवण्यामागे यशापयशाची कुठलीही चिंता नव्हती. जो समाज १४०० वर्षे एका बंदिस्त विचारप्रणालीला बांधला गेलेला आहे; तो माझ्या प्रयत्नाने प्रबोधनाच्या चळवळीत सामील होईल, त्यात साथ देईल व सामाजिक सुधारणेकडे झटपट वाटचाल करायला तयार होईल, हा विचार करण्याइतकी हमीद दलवाईंच्या सहवासात राहून मी स्वप्नाळू राहिले नव्हते. दलवाईंनी आपल्या निधनापूर्वीच्या काही वर्षांमध्ये या कार्याला वाहून घेतलेल्या बऱ्याच कार्यकर्त्यांची एक संघटना महाराष्ट्रात उभारली होती आणि त्यांची बांधिलकी दलवाईंच्या विचारांशी व मंडळाच्या ध्येय-धोरणांशी पक्की होती. दलवाईंचे विचार पुढे नेण्याकरता हे सर्व कार्यकर्ते झटतील, अशी मला आशा होती. ती कमी-अधिक प्रमाणात फलद्रूपही झाली आहे.

हमीद दलवाईंच्या निधनापूर्वी मी फारसं स्टेजवर येणं पसंत केलं नव्हतं. त्यांनी आयोजित केलेल्या बहुतेक सभा-संमेलनांना मी उपस्थित असायची आणि काही मदतही करायची. द्विभार्याप्रतिबंधक कायद्याच्या मागणीसाठी, समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी त्यांनी एप्रिल १९६६ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर आयोजित केलेल्या मोर्चांत माझा सहभाग होता आणि त्याच्यानंतरही मुंबईत आयोजित केलेल्या काही मोर्चांत माझा क्रियाशील सहभाग असायचा. पण व्यासपीठावर येण्याचा प्रसंग मराठा मंदिरमध्ये आयोजित केलेल्या मुस्लिम सामाजिक परिषदेचा अपवाद वगळल्यास आला नव्हता, तो त्यांच्या निधनानंतर आला; अमरावतीमध्ये विदर्भातील मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संघटक शेख वजीर पटेल यांनी डिसेंबर १९७७ मध्ये आयोजित केलेल्या मुस्लिम घटस्फोटित महिलांच्या परिषदेत. या परिषदेला ३०० हून अधिक महिला हजर होत्या आणि त्यांचे अनुभवकथन शेवटी वजीर पटेल यांना आवरावे लागले. या बायकांना बोलण्याची संधीच मिळाली नव्हती. ती मिळाली, तेव्हा फुटलेल्या धरणातील पाण्याप्रमाणे त्या धो-धो बोलू लागल्या. इस्लाम हा सामाजिक न्याय देणारा धर्म आहे, सहिष्णुवृत्तीचा आहे- ही एक भली मोठी ऐतिहासिक थाप आहे, हे त्या दिवशी प्रत्यक्ष पाहण्यात आलं आणि या महिलांची गाऱ्हाणी जिथे तिथे मांडण्याचं मी ठरवलं- यात धर्माच्या समाजिक अंगाचं विश्लेषण व टीका आली- आणि हे जाहीरपणे मांडण्याचं धोरण, प्रसंग येईल तिथे वापरण्याचं ठरवलं.

धर्माच्या सामाजिक अंगाचं चिकित्सक मूल्यमापन केल्यानं मुसलमान समाज चिडतो, हे सर्वश्रुत आहे. पण मला एक वेगळा अनुभव माझ्या अलिगढच्या भेटीत आला. अलिगढ येथे १९७८ मध्ये फार मोठ्या प्रमाणात जातीय दंगली झाल्या. हमीद दलवाईंचे एक निकटचे सहकारी कोल्हापूरचे श्री. हुसेन जमादार यांनी असं सुचवलं की, वर्तमानपत्रांतून येणाऱ्या बातम्या वाचून या दंगलीविषयी आपण कुठलंही निवेदन करण्यापूर्वी अलिगढला प्रत्यक्ष भेट देऊ या. अलिगढला भेट देताना मनात थोडीशी भीती होती. कारण हमीद दलवाईंना आपल्या अलिगढच्या पहिल्या भेटीमध्ये फार कटू अनुभव आला होता आणि त्या वेळी ते सुदैवाने बचावले होते. अलिगढ विद्यापीठातील ज्या प्राध्यापकांनी दलवाईंना त्या वेळी सुखरूप बाहेर पडण्यास मदत केली होती, ते प्राध्यापक मला व माझ्या सहकाऱ्यांना आपल्या घरी राहू देण्यास उत्सुक दिसले नाहीत. त्यांनी आम्हाला एका हिंदूकडे पाठवले. त्या हिंदूने आमची व्यवस्था केली, पण या आश्रमात राहणं येण्या-जाण्याच्या दृष्टीनं गैरसोईचे वाटलं. म्हणून आम्ही अलिगढ विद्यापीठातील एक दुसऱ्या प्राध्यापकांकडे गेलो आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या प्राध्यापकाने आमची सोय विद्यापीठातील एका गेस्ट हाऊसमध्ये केली. या विद्यापीठाच्या प्राध्यापकवर्गामध्ये ज्यांना-ज्यांना मी भेटले, त्या सर्वांना दलवाईंचं नाव परिचित होतं; पण त्यांनी मला कुठल्याही प्रकारची गैरवागणूक दिली नाही. एकच प्राध्यापक असे भेटले; त्यांनी मला सांगितलं की, तुम्ही हमीद दलवाईंच्या बेगम आहात, हे कुणाला सांगू नका. (हे प्राध्यापक महाशय हमीद दलवाईंचे मित्र आणि एके काळचे खासदार, स्वत:ला 'सेक्युलर' म्हणवणारे)

मी विद्यापीठाच्या अतिथीगृहात आठ-दहा दिवस राहून

रात्रंदिवस फिरते आहे, हे जेव्हा त्यांना सांगितलं; तेव्हा त्यांना आश्चर्य वाटलं. या गृहस्थांनी मला चहासुद्धा न देता माझा पाहुणचार केला आणि परत पाठवलं. अलिगढमध्ये झालेल्या दंगलीची यांच्या सेक्युलर विचारांना बरीचशी झळ लागली होती, हे त्यांच्या बोलण्यातून मला स्पष्ट जाणवत होते. या प्राध्यापक महाशयांच्या घरी जाताना त्यांचा पत्ता विचारण्यासाठी म्हणून मी टांगा थांबवला आणि एका सद्गृहस्थांना विचारलं तेव्हा त्यांनी पत्ता सांगितला; पण माझं नाव सांगितल्यानंतर मात्र तो उसळला, ''वो जनसंघ का बगलबच्चा एजंट हमीद दलवाई? उसकी आप बेगम?'' हुसेन जमादारांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला पण त्याने आपल्या आरोपांचं पालुपद चालूच ठेवलं. अर्थात, रस्त्यावर कुठलाही अतिप्रसंग झाला नाही.

दलवाईंच्या आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या ध्येय-धोरणांशी चर्चा करण्याचा प्रसंग हमीद दलवाईंच्या एका परिचित महिलेच्या घरी आला, श्रीमती वसीफा अन्सारी सिंग यांच्या घरी. लखनऊमधील प्रसिद्ध फिरंगी महल या घराण्यातील या महिला. कम्युनिस्ट चळवळीशी त्यांचा संबंध आला आणि श्री.सिंग यांच्याशी त्यांनी विवाह केला. त्यांनी आपल्या परीनं माझं फार आदरातिथ्य तर केलंच, शिवाय ८०-८५ महिलांना बोलावून चर्चेचा कार्यक्रम आखला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, आम्ही मांडलेल्या विचारांना या महिलांनी चांगला प्रतिसाद दिला. धर्माच्या सामाजिक अंगाची बाजूही गतिमान असली पाहिजे, घटस्फोटित महिलेला न्याय मिळाला पाहिजे, सुधारणा घडवून आणण्यासाठी समान नागरी कायदा अतिआवश्यक आहे; हे या महिलांनी मान्य तर केलेच; इतकंच नव्हे, तर या मागण्यांसाठी सहकार्य देण्याचंही आश्वासन त्यांनी दिलं. दुर्दैवाची गोष्ट ही की, अशा देशभर विखुरलेल्या शक्ती एकत्र आणण्यासाठी आमची ताकदच कमी पडते.

या शक्ती अर्थातच दुर्बल आहेत; त्या अलिगढमध्ये असोत किंवा देशातील इतर कुठल्याही विभागातील असोत. ह्याचं मुख्य कारण असं आहे की, मुस्लिम समाज हा समुदायवृत्तीचा आहे. कोणत्याही प्रश्नावर विचार करताना धर्माचा दृष्टिकोन केंद्रीभूत मानला जातो आणि धर्माच्या नावावर तो कोणत्याही प्रश्नावर झट्कन एकत्र येतो. फाळणीपूर्व व फाळणीनंतरच्याही काळात मुसलमानांच्या या वृत्तीमध्ये फरक पडला आहे, असं वाटत नाही. उर्दू भाषा

डावीकडून : बाबूमियाँ बँडवाले, बिल गिरामी, हमीद दलवाई, ए.बी.शहा (नवी दिल्ली- १९७१)



आणि इस्लाम धर्म याचा तसा काहीच संबंध नाही; तरीसुद्धा पाकिस्तानच्या चळवळीमध्ये उर्दू भाषेचा फार मोठा वाटा होता. जसे केवळ धर्मावर अधिष्ठित एखादं राष्ट्र उभं राहू शकत नाही, तसेच केवळ धर्माशी बादरायण संबंध जोडलेली भाषाही देश उभारणीसाठी उपयोगी पडत नाही आणि हे बांगलादेशच्या स्वातंत्र्यानंतर मुसलमानांना उमजायला पाहिजे होतं. पण ते तसं त्यांना उमजलंय, असं मला वाटत नाही. कारण सर्व राष्ट्रात उर्दूला दुसऱ्या अधिकृत राजभाषेचा दर्जा देण्याची मुसलमान समाजाची एकमुखी मागणी आहे. या राज्यात मुसलमान कितीही अल्पसंख्य असले तरीही मागणी केली जाते आणि ही मागणी करण्याऱ्यांमध्ये केवळ मुसलमानांच्या जातीयवादी संघटना आहेत असं नव्हे, तर सेक्युलर पक्षातील मुसलमानसुद्धा याच मागणीचा पुरस्कार करताना दिसतात. किंबहुना, आपल्याला असं दिसेल की, उर्दूशिवाय इतर प्रश्नांवरसुद्धा सर्व मुसलमान नेते (ते आणि संघटना कुठल्याही पक्षातील असोत) एकाच व्यासपीठावर आलेले आपल्याला दिसतात. उदा.– सरकारी इत्यादी नोकरीतील आरक्षणाचा प्रश्न, अलिगढ विद्यापीठाला अल्पसंख्याकाचा दर्जा देण्याचा प्रश्न किंवा धर्मांतराचा प्रश्न. या त्यांच्या एकत्र येण्यावरून मुसलमान समाज धर्माच्या नावावर कसा समुदायवृत्तीचा बनतो, हे आपल्याला दिसून येईल.

इस्लामच्या स्थापनेपासून मुसलमानांची ही समुदायवृत्ती निरनिराळ्या प्रकारे पोसली गेली आहे. या समाजाचा एकत्रितपणा ही त्याची जबरदस्त शक्ती आहे.

समाज कुठलीही भाषा बोलो, कुठलाही वेश परिधान करो, कुठल्याही प्रदेशात राहो; उम्मत या संकल्पनेचा त्याच्यावर एक जबरदस्त पगडा आहे. जोपर्यंत ही त्याच्या मनावरील पकड ढिली होत नाही, तोपर्यंत या समाजात वेगळा विचार निर्माण होणं, मूळ धरणं संभवनीय नाही.

विवेक, तर्कनिष्ठ विचार या गोष्टी या धर्माला संमत नाहीत आणि समाजसुधारणेकरता आवश्यक असलेली तार्किक विवेचनाची–विश्लेषणाची एक परंपरा निर्माण होणं आवश्यक असतं, ती या समाजात झालेली नाही. ज्या ग्रीक संस्कृतीने साऱ्या जगावर आपला प्रभाव पाडला, त्याचा इस्लामशी सरळ संपर्क आला नाही, हे त्याचं एक कारण असू शकेल. इस्लामी जगतात अशा प्रकारची विचारसरणी निर्माण होईल, हे संभवनीय व शक्य नाही आणि...

इस्लाममध्ये नवा विचार यावयाचाच असेल तर तो या देशातच येऊ शकेल, हे विचारवंतांचं मत अगदी बरोबर आहे. या देशात काही गोष्टी अनुकूल आहेत. उदा.– लोकशाही संकल्पना, धर्मनिरपेक्ष राजकीय व्यवस्था, समाजसुधारणा, राजकीय समता आणि न्याय यांच्या लढ्याची शतकाहूनही अधिक पार्श्वभूमी, संघटित उदारमतवादी लोकमत इत्यादी. पण इतक्या अनुकूल गोष्टी असूनसुद्धा समाजप्रबोधनाची चळवळ मुसलमानांत दुर्दैवाने पसरू शकलेली नाही. त्या समाजातील सुधारणेला विरोध करण्याची ऐतिहासिक प्रवृत्ती, नव्या विचाराला विरोध ही कारणे आहेत. पण या देशातील हिंदूसुद्धा मुसलमानांतील समाजसुधारणेबाबत बरेचसे तटस्थ आणि उदासीन आहेत, असं मला वाटतं; राजकीय पक्षांची तर गोष्टच सोडा. नानासाहेब गोरेंनी असं एके ठिकाणी म्हटलंय की, सर्व राजकीय पक्ष समाजसुधारणेच्या प्रश्नाबाबत प्रतिगामी वृत्तीचे बनले आहेत आणि ते खरंच आहे. दत्तकविधेयक हे याचे उत्तम उदाहरण म्हणून देता येईल. समाजसुधारणेचा आणि सामाजिक न्यायाचा टाहो फोडणाऱ्या जनता पक्षाच्या सदस्यांनी एक दिवस दत्तकविधेयक राज्यसभेत मांडलं आणि दुसऱ्या दिवशी ते परत घेतलं. त्याला अर्थात अपवाद आहेत आणि एक मुद्दाम नमूद करण्यासारख्या अपवाद म्हणजे श्रीमती प्रमिला दंडवते यांचा. सुप्रीम कोर्टाच्या श्री. कृष्णा अय्यर यांनी दिलेल्या या निकालानुसार घटस्फोटित मुस्लिम महिलेला पोटगीचा हक्क मिळतो, तो राजकीय दबावाने नष्ट करण्याचा उद्योग आणि घटस्फोटित मुसलमान स्त्रीला निर्वासित बनवण्याचे धार्मिक कार्य जनता पक्षाचे राज्यसभेतील खासदार शाहबुद्दीन करत आहेत. श्रीमती दंडवते यांनी क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या १८५ कलमाला दुरुस्ती सुचवणारं आणि घटस्फोटित मुस्लिम महिलेचा पोटगीचा हक्क अबाधित व कायद्यात स्पष्ट करणारं एक बिल लोकसभेत सादर केलं आहे. या बिलाला किती पक्षांचा पाठिंबा मिळतो, ते पाहू या.

मुसलमान समाजात सामाजिक सुधारणेला पुरेसा प्रतिसाद न मिळण्याचं आणखी एक कारण मला दिसतं, ते असं की– या समाजातील काही पुरोगामी मानले गेलेले विचारवंत हे बौद्धिक दृष्ट्या अप्रामाणिक आहेत, भोंदू आहेत. ही मंडळी डाव्या विचारसरणीची आहेत, असं मानलं जातं. ही मंडळी स्वत:ला निरीश्वरवादी समजणारी आहेत. तरीसुद्धा मुसलमानांच्या वैयक्तिक कायद्यात कुठलाही बदल करण्याचं आमचं धोरण नाही, असं जाहीरपणे सांगताना त्यांची सदसद्विवेकबुद्धी त्यांना जराही बोचत नाही. बोहरा धर्मगुरू त्यांच्या जमातीतील सुधारणावादी गटांवर जो अन्याय

करतात, त्याची चौकशी करण्यासाठी नाथवानी आयोग स्थापन झाला होता आणि त्या स्थापनेमागे काही मान्यवर हिंदूंचेच प्रयत्न होते. एरवी अशा प्रकारची चौकशी होणंच शक्य नव्हतं. इतकं असूनसुद्धा या देशात राहणं आपल्याला असुरक्षित वाटतं, असं या बोहरा सुधारणावादी चळवळीचे एक नेते श्री. असगरअली इंजिनिअर यांनी मोरादाबाद येथे झालेल्या जातीय दंगलीच्या संदर्भात आचार्य दादा धर्माधिकारी यांना सांगितलं. असे दुटप्पी धोरण किंवा विचारातील अप्रामाणिकपणा घेऊन पुढे जाऊ पाहणारे लोक मुलगामी समाजसुधारणा घडवून आणू शकतील, असं मला वाटत नाही. जे समाजसुधारणेच्या बाबतीत मुसलमानांतील मान्यवर तथाकथित विचारवंतांविषयी मी म्हटले आहे, तेच जातीय दंग्याबाबतीतसुद्धा म्हणता येईल. जवाहरलाल नेहरू इत्यादी विद्यापीठांमध्ये अशी काही प्राध्यापकमंडळी आहेत, त्यांचे असे मत आहे की; जातीय दंग्याची आता नवी केंद्रे बनत आहेत. ही केंद्र कशी आहेत, जिथं मुसलमान आर्थिक दृष्ट्या प्रबल झाले आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये बिहारमध्ये दंगे झाले, उत्तर प्रदेशात दंगे झाले, महाराष्ट्रातही झाले आणि या सर्व राज्यांतून झालेल्या दंगलीची केंद्रस्थाने या शतकाच्या जवळजवळ सुरुवातीपासूनच निर्माण झालेली आहेत.

सन १९२० नंतर बिहार, उत्तर प्रदेश, पंजाब, बंगाल या राज्यांतील शहरे ही दंगलीची मुख्य केंद्रं होती. या केंद्रांमध्ये सोलापूर हे महाराष्ट्रातील शहर होते. या सोलापुरात अलीकडेच जातीय दंगली झाल्या. तेव्हा जातीय दंगली होण्यामागे मुसलमानांची सुधारित आर्थिक परिस्थिती आहे, हे तर्कट मोठं अजब वाटतं. मोपल्यांचं बंड हा एक वर्गसंघर्ष होता, असं म्हणण्यासारखंच हे हास्यास्पद आहे. मशिदीवरून वाद्य वाजवण्याचा प्रश्न असो किंवा गोहत्येचा प्रश्न असो; जी निमित्तं १९२२ पासून होणाऱ्या दंगलींना कारणीभूत होत होती, तीच कारणे बऱ्याच हिंदू-मुस्लिम दंग्यांना आजही कारणीभूत आहेत.

मुसलमानांतील जातीयवादी संघटनांविषयी तर बोलायलाच नको. यात केवळ जमाते इस्लामी सामील नाही. जातीय तणावाला हीच एक संघटना कारणीभूत आहे, असं समजून तिच्यावर टीकास्त्र सोडण्यात येते. टीका जरी योग्य असली तरी मुसलमानांतील जातीय संघटना ही एकच नाही, किंवा मुस्लिम लीगही नाही. जमा-तुल्-उलेमा हीसुद्धा कर्मठांची आणि मूलभूततावाद्यांची एक संघटना आणि तीही जमाते-इस्लामीइतकीच मागे पाहणारी व कडवी आहे. त्यांच्यातील फरक हा ‘उडदामाजी काळे-

हमीद दलवाईंची शोकसभा, (पुणे) : दुसऱ्या रांगेत - भाई वैद्य, ए.बी.शहा, नानासाहेब गोरे, भाऊसाहेब रानडे



गोरे' असाच. मध्यवर्ती कायदे मंडळात बालविवाहविरोधी एक बिल १९२७ मध्ये सादर करण्यात आले. त्याला विरोध करण्यात जमा-तुल्-उलेमा आघाडीवर होती. अर्थात, त्या काळातही टी. ए. के. शेख यांच्यासारख्या सदस्यांनी या बिलाला पाठिंबा दिला. होता बॅरिस्टर जीनांनीही सुरुवातीला याला पाठिंबा दिला, पण उलेमाच्या त्यांच्यावरील जहरी टीकेमुळे त्यांनी हा पाठिंबा आस्ते-आस्ते काढून घेतला. मुख्य म्हणजे ब्रिटिश सरकारने मुसलमानांच्या विरोधाला अक्षरश: वाटाण्याच्या अक्षता लावल्या होत्या. मोहंमद अली आदी काही मौलानांच्या शिष्टमंडळाला व्हाईसरॉयने तर भेटणेही नाकारले होते. त्यांचं असं म्हणणं होतं की, सदर बिल म्हणजे मुसलमानांच्या वैयक्तिक कायद्यातील हस्तक्षेप आहे. मौलानांचा आणि कर्मठ मुसलमानांचा हा विरोध न जुमानता व्हाईसरॉयने या बिलावर शिक्कामोर्तब केलं होतं. जमा-तुल्-उलेमांचा हा पूर्वेतिहास आणि या बिलावरील त्यांची भूमिका (या बिलाच्या चर्चेच्या वेळी या संघटनेचे सदस्य असे म्हणाले होते की, मी पहिल्यांदा मुसलमान आहे आणि नंतरच भारतीय आहे.) ही तमिळनाडूत झालेल्या धर्मांतरावरील त्यांच्या भूमिकेच्या संदर्भात तपासून बघितली; तर या संघटनेची खरीखुरी जातकुळी काय आहे, हे कळून येणं अवघड ठरू नये. ही मंडळी काही ऐतिहासिक गैरसमजुतीमुळे उगाचच राष्ट्रीय समजली गेलेली आहेत. खरं तर हे सारे शहा वली उल्ला किंवा शिबली नोमानी यांचेच औरस पुत्र शोभतील.

ब्रिटिशांनी काही बाबतींत मुसलमानांच्या विरोधाला न जुमानण्याची भूमिका जरी घेतली असली, तरी एकंदर स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांची भूमिका मुसलमानांना गोंजारण्याचीच होती आणि मुसलमानांना या तिसऱ्या पक्षाच्या फार मोठा आधार होता. हा कायम स्वरूपाचा आधार नाही, हे मुसलमानांना अर्थातच कळत होते. किंबहुना यासाठीच तुर्कस्थानचं स्वातंत्र्य अबाधित राहावं आणि खलिफाची सत्ता व सामर्थ्य वाढावं, ही त्यांची खिलाफत चळवळीमागील भूमिका होती. हे अर्थातच साकार झाले नाही.

इस्लाममधील उम्मतच्या कल्पनेविषयी मी वर लिहिलं आहेच, पण त्याहीपुढे जाऊन जमाते-इस्लामी आणि जमा-तुल्-उलेमा या संघटनांतील मौलाना आपल्याला थेट पैगंबरांचे वंशज मानतात. जमा-तुल्-उलेमाचे एक शंकराचार्य मौलाना हुसेन अहमद मदनी यांचे असे म्हणणे होते की, यांच्या धमन्यांतून अरबी रक्त वाहत आहे. उत्तर प्रदेशातील फैझाबाद जिल्ह्यातील हे गृहस्थ आपल्या आत्मचरित्रात असं म्हणतात की, त्यांच्या वडिलांच्या स्वप्नांमध्ये एकदा प्रॉफेटचा पुतण्या आला आणि त्याने असं सांगितलं की, तू इमाम हुसेनचा पुत्र आहेस.

अशा कित्येक कल्पित कथा त्यांनी त्यांच्या आत्मचरित्रात लिहिल्या आहेत. एकदा त्यांनी आपल्या स्वप्नामध्ये पैगंबरांना आणि पहिले खलिफा अबू बकर यांना आपल्या शेजारी उभं असताना पाहिलं होतं. अशी वंशावळ सांगणारे नेते राष्ट्रीय मानले गेले. खरं म्हणजे, हे नुसते मूलभूततत्त्ववादी नाहीत, तर ते समाजविघातक आहेत आणि अशी मंडळी मुसलमान समाजात कर्मठपणा वाढवत आहेत. अरब देशांतील पेट्रो डॉलर या कारवायांना अप्रत्यक्षपणे पण सबळ खतपाणी पुरवीत आहे. दुर्दैवाने मुसलमान समाजात या देशात कुठला शरियत कायदा लागू आहे, या संबंधी एक भयंकर अज्ञान आहे. मी एकदा सफाळे येथे गेले होते. काही मुसलमान मंडळीशी तेथील सेवादलातील मित्रांनी एक चर्चा घडवून आणली. या चर्चेत बोलताना आपल्या देशात ब्रिटिशांनी घालून दिलेला शरियत कायदा मुसलमानांना लागू आहे, असं जेव्हा मी सांगितलं; तेव्हा तुम्ही थाप मारता आहात, खोटं बोलत आहात, असं एक मौलाना मला म्हणाले. मुसलमान समाजातील हे अज्ञान घालवणं, हे फार महत्त्वाचं कार्य आहे आणि हे सोपं नसलं, तरी करणं आवश्यक आहे.

अज्ञानाबरोबरच चुकीचा प्रचार हाही मुसलमान समाजात कुठल्याही सुधारणावादी कार्यक्रमांना विरोध पोहोचवण्यास मदत करतो. 'रेडियन्स' या जमाते-इस्लामीच्या मुखपत्राचे संपादक अमी-नुल-हसन रिझवी यांनी इतर मुसलमानांप्रमाणेच दत्तक विधेयकालाही विरोध करण्याची आघाडी उघडली. मी त्यांना एकदा विचारलं की, तुम्ही त्याला विरोध का करता? त्यांचं उत्तर फार मजेशीर होतं. ते म्हणाले की, 'समजा एका गृहस्थाने एका मुलीला दत्तक घ्यायचं ठरवलं, दत्तक घेतल्यानंतर त्या मुलीविषयी या गृहस्थाच्या मुलाला जर प्रेम वाटू लागलं आणि त्यांची विवाह करण्याची इच्छा निर्माण झाली, तर शरियत कायद्यात ते संमत होणार नाही.' मी त्यांना सांगितलं की, 'यातून मार्ग आहे; आणि तो हा की, दत्तक घेण्यापूर्वीच मुलाला बापाने विचारावं, तुला हिच्याशी लग्न करायचं आहे का? त्याची जर इच्छा असली, तर हे लग्न करून द्यावं आणि नसलीच, तर दत्तक घेण्याचा मार्ग खुला होतो.' तेव्हा असल्या खुळचट प्रचाराला मुसलमान समाज बळी पडतो

आणि त्यामुळेच एकूण सुधारणेचे वारे या समाजात वाहू लागलेले दिसत नाहीत.

दत्तक विधेयकाला विरोध करण्यामागे मुसलमानांच्या जातीय संघटनांप्रमाणेच सेक्युलर पक्षातील मुसलमान आणि काही हिंदूही आघाडीवर होते. दत्तक विधेयकाचा पुरस्कार करणाऱ्या काही सामाजिक संघटनांनी मुंबईतील सध्याचे उपराष्ट्रपती श्री. हिदायतुल्ला यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा आयोजित केली होती. या सभेला प्रा. फैजी आणि छगलासाहेबही उपस्थित होते. मी तिथे असं सांगितलं की, १४०० वर्षांपूर्वी इस्लामच्या इतिहासात एक गोष्ट घडली आणि मुसलमानांना दत्तक घेणं निषिद्ध मानलं जाऊ लागलं. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही हे बंधन एखाद्या समाजावर लादणं, गैर आहे. धर्माचा तसा आदेश असला तर तो सामाजिक न्यायासाठी चक्क झुगारून दिला पाहिजे. सभेनंतर हिदायतुल्ला मला म्हणाले, ''फार स्पष्ट आणि चांगलं बोललात.'' काही बुजुर्ग मंडळींना भेटत असताना जनाब मोहिनुद्दीन हॅरिस यांना सलाम करण्याचा प्रयत्न केला, पण ते लक्ष देईनात. तरीसुद्धा मी परत समोर जाऊन उभी राहिले. माझ्या सलामचा रागाने स्वीकार करत ते म्हणाले, ''तुम्ही १४०० वर्षांपूर्वीची गोष्ट काय करताहात; १४०० वर्षांनंतरही हेच चालू राहील! तुम्हाला इस्लाम आणि कुराण समजलेलं नाही. चार लोक टाळ्या वाजवतील, पण मुसलमान समाज तुमच्यापाठी येणं शक्य नाही.'' काही वर्षांपूर्वी महाराष्ट्र टाइम्समध्ये हमीद दलवाईंनी एक लेख लिहिला होता– 'राष्ट्रीय मुसलमान, एक धोकादायक प्राणी'. यात दलवाईंनी हॅरिस यांच्यावरही टीका केली होती. सामाजिक दृष्ट्या लोकशाही समाजवादी पठडीमध्ये वाढलेले, सेवादलाच्या परंपरेत शिक्षण घेतलेले मुसलमानही कसा विचार करतात, ते पाहा–

असाच एक प्रश्न– ज्यावर सबंध देशातील मुसलमान एकत्र येतात– तो आहे, आसाममधील परकीय नागरिकांच्या चळवळीसंबंधी. या चळवळीच्या नेत्यांची साधी व सरळ मागणी आहे की– जे नागरिक नाहीत, जे घुसखोर आहेत; त्यांना देशाबाहेर घालवा. ही मागणी अत्यंत न्याय्य अशी आहे. बिगरनागरिकांना अशा तऱ्हेने देशात अनिर्बंधपणे येण्यास मुभा दिली, तर अनवस्था प्रसंग ओढवेल. आसाममध्ये मोठ्या प्रमाणात बंगाली मुसलमानांची आयात केली गेली. स्वातंत्र्यपूर्व काळापासून तिथे सादुल्ला याचं मंत्रिमंडळ असताना आसाम मुस्लिमबहुल प्रांत व्हावा, असे हेतुपुरस्सर करण्यात आले. या धोरणाचे सूत्रधार सुऱ्हावर्दी आणि चौधरी खलिकुल्झमान हे होते. खलिकुल्झमान तर असं म्हणत असत की, काही महिन्यांतच आसाम मुस्लिमबहुल प्रांत होईल. सादुल्लांच्या या धोरणासंबंधी लिहिताना लॉर्ड वेव्हेल यांनी आपल्या 'व्हाईसरॉइज परसल' या आत्मचरित्रात असं लिहिलं आहे की, सादुल्लांनी अधिक धान्य पिकवा (ग्रो मोअर फूड) या मोहिमेचं निमित्त केलं. पण त्यांचं खरं उद्दिष्ट आसाममधील मुस्लिमांची संख्या वाढवणं हे होतं (ग्रो मोअर मुस्लिम). अर्थात, त्यांना पाहिजे होता तसा इतिहास त्या वेळी घडला नाही. तरीसुद्धा अपूर्ण राहिलेली इच्छा पुरी व्हावी म्हणून काही समाजघटक तसा प्रयत्न पुढेही करत राहतात. तेव्हा आसामातील वाढत्या घुसखोरांच्या प्रश्नाबद्दल स्थानिक लोकांमध्ये आणि हिंदूंमध्ये काही गंभीर शंका निर्माण झाल्या, तर त्यात आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. अस्थिरता निर्माण होणं आणि तेही सीमेवरील एका प्रदेशामध्ये, हे फार धोक्याचं आहे. गेल्या निवडणुका असामात होऊच शकल्या नाहीत आणि एक लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट अशी आहे की, बेगम फकरुद्दीन अली अहमद यांना आपल्या मतदारसंघात जाणेही कठीण झाले. फकरुद्दीन अली अहमद हे आता हयात नसले तरी सादुल्लांचे धोरण कमी–अधिक प्रमाणात पुढे चालू ठेवण्याचा त्यांनीही प्रयत्न केला होता, हे विसरता येणार नाही.

आसामच्या चळवळीतील नेत्यांच्या मागणीला 'अल्पसंख्याकावर अन्याय होतो' अशी ओरड करून विरोध करण्याचा कसलाही अधिकार मुसलमानांना पोहोचत नाही. शिक्षणाचा प्रश्नही फार मोठा आहे. त्याच्यावर मदरसा शिक्षणाचा प्रभाव हा शालेय किंवा महाविद्यालयातील शिक्षणापेक्षा अधिक आहे. विज्ञानाधिष्ठित शिक्षण घेण्याची परंपरा व प्रवृत्ती फार कमी आणि आधुनिक शिक्षण घेऊनसुद्धा एकूण धार्मिक दृष्टिकोन प्रगतीच्या आड येतो. पाकिस्तानचे पदार्थविज्ञानशास्त्राचे नोबेल पारितोषिक विजेते डॉ.अब्दुल सलाम यांनी आपल्या मुंबई भेटीत एकदा असं सांगितलं की, धर्म हा मुसलमानांच्या प्रगतीच्या आड येतो आणि हे खरंच आहे. या समाजाला प्रगतीची दिशा कुठल्याही इस्लामी देशातून मिळणं शक्य नाही. या चळवळीचे मुख्य केंद्र या देशातच निर्माण करता येणे शक्य आहे.

(रविवार सकाळ : दिवाळी अंक, १४ नोव्हेंबर १९८२)

कथा । हमीद दलवाई

# धर्म

बोलण्याच्या आवेशात ते मुलीचे लग्न विसरले आणि एका जिहादची त्यांनी गर्जना केली. पानिपतच्या एका नव्या युद्धाचे रणशिंग फुंकले गेले. बलुची आणि पठाण सैन्यांच्या तुकड्यांच्या तुकड्या खानसाहेबांच्या आधिपत्याखाली दुआबातल्या विस्तीर्ण भूप्रदेशात गोळा झाल्या. समोरच काफिरांचे सैन्य उभे होते. दोन्ही फौजा एकमेकांना भिडल्या आणि अल्पावधीत काफिरांचे सैन्य पळ काढू लागले.

मुस्लिम लीगच्या डायरेक्ट ॲक्शनच्या दिवशी भाषण करायला म्हणून कोल्हापूरहून खानसाहेब नावाचे कोणी वक्ते येणार होते. आमच्याच घरी ते उतरणार होते. मोठ्या इतमामाचा हा पाहुणा असल्याचे बाबांना समजले होते. तेव्हा त्यांच्या इतमामाला साजेशी त्यांची बडदास्त झाली पाहिजे, असे त्यांना वाटत होते. खानसाहेब यायच्या दिवशी सकाळपासूनच बाबांची सारखी धावपळ चालली होती. कोल्हापूरहून ते सभेला परस्पर जाणार होते आणि तिथून आमच्या घरी येणार होते. दुपार झाल्यावर सभेला जायची घाई बाबांना लागली होती, म्हणून घरची सगळी व्यवस्था पाहण्याची कामगिरी त्यांनी माझ्यावर सोपवली आणि मला तंबी दिली, ''पाहुणे आल्यावर त्यांच्याजवळ उगाच बाता करू नकोस. तुझ्यापेक्षा त्यांना जास्त समजते. मधेच का राजकारणावर बोललास, तर कानफट फोडून टाकीन.''

ते गेले आणि दोनच तासांनी खानसाहेबांना घेऊन आले. खानसाहेब हाडापेरांनी चांगले दणकट गृहस्थ होते. घरात शिरताच त्यांनी डोक्यावरची जीना कॅप काढून हातात घेतली आणि त्यांच्यासाठी खास तयार केलेल्या जागेवर ते जाऊन बसले. मग त्यांना बघण्यासाठी गावातल्या जमलेल्या लोकांनी त्यांना सलाम केला. त्यांच्यापैकीच एक जण लगबगीने पुढे जाऊन त्यांना वारा घालू लागला. बाबांनी आपला फेटा सावकाश काढला आणि ते त्यांच्या शेजारी बसले. तेवढ्यात त्यांची नजर वर भिंतीवर टांगलेल्या जीनांच्या फोटोकडे गेली आणि ते म्हणाले, ''तुमाला माजा फोटू दाखवतो.'' खुंटीला टांगलेल्या शेरवानीच्या खिशातून त्यांनी एक घडी केलेला कागद बाहेर काढला आणि ते सगळ्यांना म्हणाले, ''आव, देखो.''

जमलेल्या लोकांनी लगेच खानसाहेबांच्या भोवताली घोळका केला. खानसाहेब त्यांना समजावून सांगू लागले, ''ह्या बाजूने बघा. ये क्या है? ये दिखता है?''

चित्र बघून एकेक जण बाजूला झाला. खानसाहेबांनी सगळ्यांना विचारले, ''आपने देखा? आपने देखा?'' आणि त्यांची नजर मी उभा होतो तिकडे गेली. ते एकदम कावरेबावरे झाले. बाबांना त्यांनी विचारले, ''ये कौन है जी?''

''मेरा बेटा!''

''काय? म्हणता काय! उमरखानसाहेब? तुमच्या मुलाच्या डोक्यावर गांधी टोपी? मला वाटले, हा तुमच्या घरातला कोणी कुणबी गडी आहे की काय?''

बाबांनी आपली नाखुशी व्यक्त करण्यापलीकडे काही उत्तर दिले नाही. खानसाहेबांनी मला विचारले, ''माझ्या लेक्चरला आला होतात?''

मी म्हणालो, ''नाही.''

ते यावर नुसते हसले. बाबा म्हणाले, ''खानसाहेबांचा लेक्चर तू ऐकायला होवा होतास. असलां भासण आपून कैक दिस ऐकलां नव्हतां.''

मी काही न बोलता ऐकत होतो. शिवाय मधे न बोलण्याची सक्त ताकीद दिली होतीच! यामुळेही माझा नाइलाज झाला. त्यांनीही काही वेळाने आपले बोलणे आवरले. बाबांच्या हातात तेवढ्यात कोणी तरी वर्तमानपत्र आणून दिले आणि त्यांत दोघांनीही डोके खुपसले.

दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत ते आमच्या घरी होते. या अवधीत अनेकदा प्रसंग येऊनही मी त्यांच्याजवळ गेलो नाही. दुसऱ्या दिवशी निघून जाताना ते विलक्षण खुशीत होते. जाता-जाता मात्र त्यांनी मला चार उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. ते म्हणाले, ''अरे, मुसलमानांची पोरं तुम्ही! ह्या म्हारा-पोरांच्या टोप्या घालता, हे बरें काय? आणि हे बघा शेखहमीद, जरा मुसलमानी बी पढत जा.'' इतके बोलून जाताना, कोल्हापूरला त्यांच्या घरी एकदा केव्हा तरी येण्याचे त्यांनी मला आणि बाबांना आग्रहाचे निमंत्रणही दिले.

वर्षभराने मला कोल्हापूरला जाण्याचा योग आला. अच्युत म्हणून माझा एक मित्र तिथे राहत होता. तो पुष्कळ दिवस मला बोलवत होता आणि मला जायला जमत नव्हते. अखेरीस एकदा मी जायचे नक्की केले. मी जायचे ठरवताच बाबांना साहजिक खानसाहेबांची आठवण आली. मला त्यांनी खानसाहेबांना भेटायला सांगितले. शक्य तर मी त्यांच्या घरी उतरावे, असाही त्यांनी मला आग्रह केला.

अर्थातच, मी गेल्यावर त्यांच्याकडे उतरलो नाही. अच्युत स्टेशनवर न्यायला आला होता. त्याच्याबरोबर मी त्याच्या घरी गेलो. चार-पाच दिवस त्याच्याबरोबर मजेत काढले आणि यायच्या आदल्या दिवशी खानसाहेबांना भेटायला गेलो. याच वेळी खानसाहेबांविषयी मला थोडीफार माहिती कळली. ते पूर्वी कुठे तरी चांगल्या नोकरीत



होते. ऐन तारुण्यात त्यांची पत्नी वारली, तेव्हा त्यांना एक छोटी मुलगी होती. खानसाहेबांनी मग दुसरे लग्न केले नाही. मुलीचा त्यांना विलक्षण लळा लागला. सेवानिवृत्तीनंतर कोल्हापूरला घर बांधून ते स्थायिक झाले. मधला राजकारणाचा काळ सोडला, तर पूर्वी त्यांचे आयुष्य संथ गतीने गेले होते; आणि आताही तशाच संथ, एकाकीवृत्तीने ते राहत होते.

मी गेलो तेव्हा ते आणि त्यांची मुलगी बाहेरच्या प्रशस्त खोलीत बसली होती. त्यांची मुलगी तरुण होती, दिसायलाही नीटनेटकी होती. तिचा चेहरा गोल-गोल होता आणि डोळे सुंदर- विलक्षण सुंदर होते. मी जवळ जाताच ती चट्‌कन उठून जायला निघाली. परंतु खानसाहेबांनी मला पाहताच तिला थांबवले आणि माझ्याशी तिची ओळख करून दिली. तिने किंचित हसून मान खाली घातली.

''जाव, जल्दी चाय का इन्तजाम करो'' असे सांगून त्यांनी तिला आत पिटाळले आणि ते माझ्याशी बोलू लागले. बोलता-बोलता त्यांनी मला विचारले, ''हां, मग काय म्हणतेय तुमची कांगरेज?''

त्यांच्याशी राजकारणावर बोलायला मी बिलकुल नाखूष होतो. संभाषण वाढू न देण्याच्या इराद्याने मी इतकेच म्हणालो, ''काय म्हणणार?''

इतक्यात त्यांची मुलगी चहाचे साहित्य घेऊन आली आणि आमचे संभाषण अनायसे बंद पडले. ती चहा तयार करण्यात दंग झाली आणि खानसाहेब तिच्याकडे विलक्षण प्रेमाने बघत मला सांगू लागले, ''मेहरू बंबईच्या अंजुमन इस्लाम साळेत शिकलेली हाय. मुसलमानी मी तिला घरात बराबर शिकवलेली हाय. कुरानची मानी तिच्या तोंडपाढ आहे. बेटी, पावन्यांना एक आयत पढून दाखव.''

त्यांची मुलगी एकदम लाजली. तिला हसू आले आणि हातातली चहाची किटली खाली ठेवून तिने दोन्ही हातांनी आपले तोंड झाकून घेतले. खानसाहेबांनी तिला आग्रह केला नाही.

चहा घेऊन होताच मी उठून जायला निघालो, परंतु खानसाहेबांना बरेच दिवस राजकारणावर बोलायला कोणी मिळाले नव्हतेसे दिसले. ''अरे, ठहरो. इतने जल्दी कहाँ चले?'' असे म्हणून त्यांनी मला थांबवले.

सहज विचारायचे म्हणून मी विचारले, ''खानसाहेब, तुम्ही पाकिस्तानात बरे नाही गेलात?''

त्यांना इतकेच बस होते. त्यांनी मला विचारले, ''का? आमचा इथे काही हक्क नाही काय?''

''आहे ना. नाही कोण म्हणतंय?'' त्यांच्याशी वाद घालायला मला काही जमेना.

''तुम्हाला काही माहीत आहे साहेब?'' ते म्हणू लागले. ''ह्या साल्यांच्या बापजाद्यांनी कधी राज्य केले आहे? राज्य करावे ते मुसलमानांनी आणि या गाढवांनी मुकाट्याने जिझिया कर भरावा.''

''ही फार जुनी गोष्ट झाली खानसाहेब. ते दिवस गेले आता!''

''कसले गेले? कुराने- पाकमध्ये काय लिहिले आहे, दुनियेच्या आखिरीला तमाम दुनियेत मुसुलमानी होईल. काफिरांचे नामोनिशाण उरणार नाही. पण तुम्ही मुसुलमानी पढली असेल तेव्हा ना!''

मी मुकाट्याने गप्प बसून त्यांचे बोलणे ऐकू लागलो. त्यांची मुलगी स्वस्थ बसली होती आणि तितक्याच स्वस्थपणे ऐकत होती. मी तिच्याकडे पाहताच ती हसली. बापाचे बोलणे तिला ऐकून-ऐकून पाठ झाले असावे.

अखेरीस कंटाळून मी जायला निघालो. एक जांभई दिली आणि म्हणालो, ''बाबांनी तुम्हाला सलाम सांगितला आहे.''

''वालेकुम सलाम. उमरखान सायबांना आमचा सलाम बोला.''

मी उठलो आणि त्यांचा निरोप घेतला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी मी कोल्हापूर सोडले.

मध्यंतरी तीन वर्षे निघून गेली. चिपळूण सोडून मी मुंबईला आलो आणि नोकरीसाठी बेकार अवस्थेत वणवण फिरत होतो. असाच एक दिवस रस्त्याने चाललो असताना एक सुंदर पॅकार्ड गाडी माझ्यासमोर येऊन उभी राहिली. आत खानसाहेब बसले होते. त्यांनी मला हाक मारली, ''शेख हमीद!''

माझ्या फाटक्या-तुटक्या वेशांत त्यांच्याजवळ जायची मला लाज वाटू लागली, परंतु त्यांना चुकवणे शक्य नव्हते. मी जवळ गेलो. माझ्या चेहऱ्यावर नजर फिरवीत ते जोरात ओरडले, ''वा शेख हमीद! दाढीबिढी बढाया है? तुम्हाला मुसुलमानी समजायला लागलीसे दिसते!''

कसली कर्माची मुसुलमानी! मी नुसता हसलो.

त्यांनी विचारले, ''काही काम हाय का?''

''नाही.''

''मग चला आमच्याबरोबर.''

मी आत जाऊन बसलो आणि मोटार तिथून निघून महंमद

अली रोडवरच्या एका आलिशान इमारतीपाशी येऊन थांबली.

तिथे पोहोचेपर्यंत खानसाहेबांनी माझी व बाबांची चौकशी केली आणि स्वत:विषयी पुष्कळसे सांगितले. मुलीचे लग्न करण्याचे त्यांनी ठरवले होते. तिला एका श्रीमंताची मंगनी आली होती. पाकिस्तानात कराचीला त्याचा मोठा व्यापार होता. मधून-मधून तो चार-आठ दिवसांनी मुंबईस येत असे. असाच तो आला असताना खानसाहेबांनी मुंबईत येऊन सगाई नक्की केली होती. लग्न मात्र नवऱ्यामुलाच्या सवडीनुसार सावकाश कराचीला होणार होते.

खानसाहेबांचा भावी जावई त्या इमारतीत राहत होता. माझी त्यांनी त्याच्याशी ओळख करून दिली. मग चहाची लगबग केली. लग्नाचे सामान दाखवले. साड्यांचे आणि दागिन्यांचे ढीगच्या ढीग मी पाहिले. आनंदाने ते बराच वेळ माझ्याशी बोलत होते. परंतु जराशा वेळानं दु:खी-कष्टी झाले. गहिवरलेल्या स्वरात ते म्हणाले, ''वीस वरसें मी देखभाल केली; आता बेटी परक्यांच्या घरी जायाची!''

लगेच त्यांनी आपले डोळे पुसले. मग ते हसत मला म्हणाले, ''मी बी तिच्याबराबर कराचीला जाणार.''

''तुम्हीही जाणार?'' मी आश्चर्याने विचारले.

''हो. ती गेल्यावर मी इथे कशाला ऱ्हावू? माजी बेटी माज्या नजरेत होवी शेख हमीद!''

आणि मग काही वेळ थांबून त्यांनी उद्‌गार काढले, ''आणि तुमच्या गवरमेंटने आम्हांला ऱ्हावू देलं पायजे ना!''

मुलीसाठी इथून जात असल्याचं सांगत असतानाच, इथं राहू न दिल्याचा कांगावा करण्याची त्यांची रीत पाहून मला आश्चर्य वाटलं. त्यांच्या आवाजातली मघाची कोमलता आता संपली होती. नेहमीच्या धारदार आवाजाने ते बोलू लागले होते.

''तुमचा हा नहेरू पाकिस्तानच्या सीमेवर फौजा नेऊन ठेवतो कशाला? हां?''

''पाकिस्तान कटकटी करते म्हणून!''

''मग करणारच! ते काय तुमच्यासारखे डरपोक हायत? तुमच्या फौजा तिथं काय करणार? एक मुसुलमान दहा हिंदूंना भारी हाय. तुम्ही काय रडणार, मुसुलमानी फौजे पुढे? तुम्हांला बलुची रेजिमेंटस्‌ म्हायती आहेत? बलुची रेजिमेंटस्‌ ऐशी लढते, नुसती कत्तल करत सुटते!''

बोलण्याच्या आवेशात ते मुलीचे लग्न विसरले आणि एका जिहादची त्यांनी गर्जना केली. पानिपतच्या एका नव्या युद्धाचे रणशिंग फुंकले गेले. बलुची आणि पठाण सैन्यांच्या तुकड्यांच्या तुकड्या खानसाहेबांच्या आधिपत्याखाली दुआबातल्या विस्तीर्ण भूप्रदेशात गोळा झाल्या. समोरच काफिरांचे सैन्य उभे होते. दोन्ही फौजा एकमेकांना भिडल्या आणि अल्पावधीत काफिरांचे सैन्य पळ काढू लागले. त्याबरोबर मुसलमानांनी काफिरांची भयानक कत्तल करायला सुरुवात केली. त्यांची मुंडकीच्या मुंडकी मुसलमानांनी उडवली आणि त्याची रास पानिपतच्या मैदानावर रचून ठेवली. नंग्या तलवारी घेतलेल्या मुसलमानांनी मग काफिरांचा राक्षसी संहार केला. त्यांच्या बायका-पोरांना पळवले आणि बाटवून मुसलमान केले. जगाच्या अंतापर्यंत अवघ्या भूतलावर इस्लामचे अधिराज्य करण्याच्या कुराणातल्या वचनांची नांदी म्हटली गेली.

कत्तलीचे एक महापर्व संपवून खानसाहेब बोलायचे थांबले, तरी त्यांच्या डोळ्यांत नुसत्या ठिणग्या उसळत होत्या. चिपळूणला डायरेक्ट ॲक्शनच्या सभेत त्यांनी कसे भाषण केले असेल, याची मला या वेळी पुरती कल्पना आली.

''तुम्हांला वायट वाटले असेल?'' हसून त्यांनी प्रश्न केला. मी काही उत्तर न देता उठून उभा राहिलो.

''निघालात?''

''होय. लांब जायचे आहे.''

''अच्छा. खुदा हाफिज. बुढ्ढ्याची कवा याद करा.''

''जरूर!'' मी म्हणालो आणि त्यांच्या हाताला हात लावून तिथून बाहेर पडलो.

यानंतर सहाच महिन्यांनी एका नोकरीच्या मुलाखतीसाठी मला कोल्हापूरला जावे लागले. मुलाखत आटोपून मी अच्युतला भेटायला गेलो आणि त्याने सांगितलेली हकिगत ऐकून थक्क झालो. खानसाहेब मुंबईस आले असताना, त्यांची मुलगी शेजारच्या एका हिंदू तरुणाचा हात धरून घरातून पळून गेली. जाताना बापाने तिच्यासाठी ठेवलेले पंधरा-वीस हजार रुपयांचे दागिन्यांचे डबोलेही ती घेऊन गेली. खानसाहेबांनी तिचा शोध लावण्याची पराकाष्ठा केली, परंतु तिचा पत्ताच लागला नव्हता.

अच्युतने सांगितलेली ही सगळी कथा मी सुन्न मनाने ऐकली. मग त्याला विचारले, ''म्हातारा इथेच आहे का?''

''असावा.''

''करतो काय? मनातल्या मनात आता तो बहुधा काफिरांची मुंडकी उडवीत सुटला असेल.''

''कोणास ठाऊक! पूर्वी रस्त्याने गेलो असताना निदान बाहेर मुलीबरोबर बसलेला तरी दिसायचा. पण पोरगी पळाल्यापासून मी त्याला पाहिलेला नाही.''

हे ऐकून खानसाहेबांना भेटावे, असे मला वाटू लागले. त्याच दिवशी संध्याकाळी मी त्यांना भेटायला गेलो.

त्यांच्या घरापाशी जाताच बिघडलेल्या मामल्याची मला एकदम कल्पना आली. घराभोवतालच्या बागेत गवताचे नुसते रान माजले होते. बागेतल्या वेली घराच्या भिंतीवर चढल्या होत्या. व्हरांड्यात किती तरी धूळ साचली होती. आढ्याला कोळिष्टके लागली होती आणि तिथल्याच मोठ्या घड्याळात कधी तरी कायमचे बारा वाजून राहिले होते. मला पाहताच एक छोकरा समोर आला. खानसाहेब आत असल्याचे त्याने सांगितले. माझे नाव-गाव विचारून तो आत वळला, पाठोपाठ मीही आत गेलो.

ते आपल्या खोलीत पलंगावर झोपले होते. त्या मुलाने सांगितले, ''सेठ, ये कोई आये है।''

त्यांनी वळून माझ्याकडे पाहिले. म्हातारा एकाएकी विलक्षण खंगून गेला होता. त्यांचे डोळे आणि गालफडे खोल गेली होती. मोठ्या मुश्किलीने ते उठून बसले आणि हाताने मला बसायची खूण करून ते म्हणाले, ''तुम्हाला कुठं समजलं...? माझी बेटी...''

''इथंच- मी माझ्या काही कामासाठी आलो होतो.''

''माजी बेटी एका काफिराचा हात धरून घरातून गेली शेख हमीद. तिला दिलेली सगळी तालीम पाण्यात गेली. माज्या नावाला बट्टा लावला तिने. मी गाफील ऱ्हायलो सायेब. मी इकडे रात्रीचा बेहोश निजत होतो आणि माझी बेटी तिकडे आपल्या खोलीत रातभर त्या काफिराच्या मिठीत लोळत पडली होती.''

खानसाहेबांचा हताश स्वर आपली केविलवाणी कथा मला सांगू लागला आणि कुरुक्षेत्रावरील धर्मयुद्ध पाहणाऱ्या संजयच्या दिव्य दृष्टीने पानिपतच्या मुसलमानांवर उलटलेल्या संग्रामाचे दुसरे पर्व मी पाहू लागलो... विजयोन्मादाने बेहोश झालेल्या मुसलमानांच्या सैन्यावर काफिरांच्या पळणाऱ्या सैन्याने उलटून हल्ला केला आणि त्यांची दाणादाण उडवून दिली. रात्रीच्या बेसावध वेळी पिछाडीला असलेल्या मुसलमानांच्या जनानखान्यापर्यंत काफिरांच्या फौजा पोचल्या आणि सूडाने पेटलेल्या अश्वत्थाम्याप्रमाणे त्यांनी मुसलमानांची कोवळी पोरे ठार करून बायकांना पळवून नेले. काफिरांच्या निवडक घोडेस्वारांनी खानसाहेबांच्या तंबूला गराडा घातला. त्यांच्या प्रतिकाराला सज्ज झालेल्या खानसाहेबांवर एक जबरदस्त वार करून, एका काफिराने त्यांच्या छोकरीला घोड्यावर घातली आणि तो क्षणार्धात दिसेनासा झाला. वाराने बेशुद्ध झालेले खानसाहेब शुद्धीवर आले, तेव्हा युद्धाचा सगळा रंग पालटून गेला होता. काफिरांनी मुसलमानांचा भयंकर संहार केला होता. जखमी आणि मृत सैनिकांचा रणांगणावर खच पडला होता. काळोखातून विव्हळणाऱ्या सैनिकांना तुडवीत खानसाहेब मुलीचा शोध करत सैरावैरा धावू लागले...

बोलता-बोलता ते थांबले. केविलवाण्या दृष्टीने माझ्याकडे पाहू लागले आणि मग वात्सल्याचे कढ त्यांना अनावर झाले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. ते दाटलेल्या कंठाने पुन्हा बोलू लागले, ''ती गेली आणि या घराची रोशनी गेली शेख हमीद. मी कुनासाठी जगू आता? माजी बेटी आता कुठं असंल? काय करत असंल? घरात पाण्याची बादली तिनं कवा उचलली नाही. मार्किटातनं भाजीची पिशवी तिनं कवा बी आनली नाय. माजा सोनां ती! माझ्या कलीजाचा टुकरा!''

काही वेळ ते स्तब्ध बसले. त्यांनी डोळे पुसले आणि पुन्हा बोलू लागले, ''मी आता छाप्यांत देनार हाय शेख हमीद. बेटी, तू कुठं लपून दिस काढू नको. मला तोंड दाखव. बापाला तोंड दाखव. मी तुला माफ केलंय. त्यालाबी हवा तर घेवन ये. माझी काय हरकत नाय.'' आपली नजर त्यांनी दुसरीकडे वळवली आणि ते उद्गारले, ''इष्कात पडलेला माणूस हवा ते करायला तयार होयल. बाईच्या नादी लागलेला बाप्या सांगाल ते कबूल करंल. ती दोघं आली तर मी त्याला मुसुलमान होयाला सांगीन. त्याला खुदाचा बंदा करून सोडीन. मग तर झालं?''... आणि अनावर वात्सल्याने ते लहान मुलासारखे ओक्साबोक्शी रडू लागले.

('पुरुषार्थ' दिवाळी अंक : १९५४)




सुरैयाआपा माझी थोरली बहीण. ओबडधोबड दिसणारी आणि निबरट चेहऱ्याची. तिचे वरचे दोन दात उगाचच बाहेर येऊन इतरांना भेडसावीत असल्यासारखे वाटायचे. ती त्यामुळे सहसा जोरजोराने हसायची नाही. हसली की ते दात सुळ्यासारखे पुढे यायचे आणि ती अधिकच विद्रूप दिसायची.

दोन-तीनदा आईने दटावले आणि एकदा बाबांनी डोळे वटारले, तेव्हा सुरैयाआपाची हसायची सवय नाहीशी झाली. प्रथम-प्रथम तिला हसू आले की ती हसत सुटायची आणि मधेच तिला बाबांच्या दटावण्याची आठवण आली की, तिचे हसू थबकून राहायचे. पुढे काही दिवस हसताना

सुमारे तासाभराने ते परतले, तेव्हा अधिकच गंभीर दिसत होते. आपाजानचा काहीच ठावठिकाणा लागला नव्हता. त्यांनी शेजारी सर्वत्र चौकशी केली होती. पोलिसांनादेखील आपाजान नाहीशी झाल्याची वार्ता कळवली होती. ते घरी आले आणि भिंतीला टेकून खिन्नपणे जमिनीवर बसले. आई ओक्साबोक्शी रडू लागली.

तोंडावर हात घ्यायची तिला सवय लागली; परंतु सुळ्यासारख्या पुढे आलेल्या दातांच्या विद्रूपतेची जाणीव तिच्या मनात अशी खोलवर रुजून राहिली की, अखेर तिचे हसणे बंद पडले. हसू आले तरी ती ते आतल्या आत दाबू लागली. पुढे तिला त्याचीच सवय झाली. सदान्कदा ती गंभीर राहू लागली. हसण्याचा तिला सरावच राहिला नाही.

सुरैयाआपा काही दिवस शाळेत जात असे. ती तीन इयत्ता माझ्या पुढे होती. मी पहिलीत जाऊ लागलो, तेव्हा ती तिसरीत होती. पहिल्या दिवशी तिच्याबरोबर मी शाळेत पाऊल टाकले. त्या दिवशी घरी परतल्यानंतर वडिलांनी माझ्याऐवजी तिलाच विचारले, ''क्यों? क्या कहती है करम्मा की पढाई?''

ती फारशी कुणाशी बोलत नसे. शाळेतदेखील कुणात मिसळत नसे. मला जाताना तेवढी बरोबर घेऊन जाई. येताना मी एकटाच परत येई. कारण ती कधी परते, हे मला कळत नसे. मी येईपर्यंत ती एकटी पाटी-पेन्सील घेऊन 'अलीफ बे' करत बसलेली असे. आई तिला तरतीब शिकवीत असे. तेवढ्या लहान वयातही ती नमाज पढायला, वजू करायला शिकली होती.

तिच्या गंभीर वागण्याने मला तिची भीतीच वाटत असे. तिच्याशी बोलायलाही मी धजावत नसे. एकदा... एकदाच मी तिची खोड काढली होती. तिच्या 'अलीफ बे' लिहिलेल्या पाटीवर पाणी शिंपडले होते. मी पाणी शिंपडले, तेव्हा ती जोराने किंचाळली आणि तिचे ते दोन दात सुळ्यांसारखे बाहेर डोकावले. मी तिला वेडावू लागलो. म्हणालो, ''तेरे वो दात देख... भायेर आये है।''

माझे शब्द कानी पडताच तिचा चेहरा आक्रसला. तिने ओठ घट्ट मिटून घेतले. तेवढ्यात आईने कानोसा घेतला. ''बडी भयनकी मजाक करत्या काय रे?'' तिने मला दरडावून विचारले. माझे तिने मनगट धरले आणि एक मुस्कटात मारली. मी कळवळलो, परंतु तिने माझा हात सोडला नाही. माझा हात पिरगाळीत ती विचारू लागली, ''फिर करेगा मजाक उसका? करेगा ऐसी शरारत?'' वेदना असह्य झाल्या तसा मी ओरडलो, ''नहीं ... नहीं अब नै करूंगा ... कब्बी नै करूंगा...'' आणि मग आईने माझा हात सोडला. आई बाजूला झाली आणि मी हात झटकीत एका कोपऱ्यात बसलो.

सुरैयाआपा माझ्या मदतीला धावून येईल, असे मला वाटत होते. मला वाटले- ती आईला आवरील, आईच्या तावडीतून माझी सुटका करील; परंतु तिने ढुंकूनही माझ्याकडे लक्ष दिले नाही. मी मनातल्या मनात खट्टू झालो. तिच्याविषयी माझ्या मनात निष्कारण अढी निर्माण झाली.

पण ती फार वेळ टिकली नाही. रात्री वडील घरी आल्यानंतर मी तिची थट्टा केल्याचं तिनं सांगितले. मला वाटले, वडील रागावतील; पण ते रागावले नाहीत. फक्त म्हणाले, ''बडे भयनकी ऐसी थट्टा करने की क्या रे? उसके दात भायेर है और तेरे पूरे अंदर गयेसे है क्या?'' मग त्यांनी माझ्या अंगावर हात फिरवीत म्हटलं, ''सुरैयाआपा की आज से मजाक नै करना... हां...'' ते हे बोलत असताना सुरैयाआपा गालातल्या गालात हसत असल्याचे माझ्या लक्षात आले. तिला कैक दिवसांनी मी हसताना पाहत होतो. दुसऱ्या दिवशी सारा प्रकार विसरून आम्ही बरोबर शाळेत गेलो.

दोन-तीन वर्षांनी वडिलांनी सुरैयाआपाला शाळेतून काढले. एक दिवस ते माझ्या आईला म्हणाले, ''कल से सुरैयाआपा को इसकूल मे भेजना नाही.''

आईला काही कळेना. तिने विचारले, ''लेकिन क्यूं?''

''क्या करना है ज्यादा पढके?''

''लेकिन पढती है अभी पढने दो।''

''पढके नोकऱ्या करना है क्या? वो क्या बम्मन की छोकरी है? वैसे ही भायेर घुमने वाली है?''

आईला युक्तिवाद करता आला नाही; परंतु तिच्या मनात सुरैयाआपाला अधिक शिकवायचे होते, हे तिच्या चेहऱ्याकडे पाहताना कळून येत होते. ती पुन्हा म्हणाली, ''इतना बरस पुरा करने दो...''

''काय कू?'' वडिलांनी तिला विचारले. 'बरस पुरा करके विलायत जानेवाली है क्या? कुछ जरूरत नहीं. कल से बेटा घर में रहेना ... हो...''

सुरैयाआपा नुसती 'जी हाँ' म्हणून पुटपुटली. तिने ओठ घट्ट मिटून घेतले. काही वेळ जागच्या जागी उभी राहून ती पायाच्या अंगठ्याने खालची जमीन उकरीत राहिली. मग तिचे तिलाच काय वाटले, कुणास ठाऊक- ती तिथून बाजूला झाली. वडिलांना तिने जेवण आणून ठेवले. मग स्वयंपाकघरात जाऊन आईला मदत करू लागली.

दुसऱ्या दिवसापासून सुरैयाआपाचा दिनक्रम बदलला. ती दिवसभर घरातच वावरू लागली. आईला कामात मदत करू लागली. कुठे बाहेर जायचेच झाले, तर आईबरोबरच बाहेर पडू लागली. काही काळ तिचे 'अलीफ बे' चालू होते. आई तिला गुसुल कसा घ्यावा, वजू कशी करावी, हे शिकवीत राहिली आणि त्याला वडिलांनी विरोध केला

नाही. मग ते संपले आणि सुरैयाआपाला काहीच करायचे नाही.

काही दिवस एकट्याने शाळेत जायला मला चमत्कारिक वाटले; परंतु पुढे मी इतर मुलांत मिसळून गेलो आणि सुरैयाआपा शाळेत येत नसल्याची आठवणदेखील विसरून गेलो. चौथी-पाचवीत असेपर्यंत वडील माझा अभ्यास घ्यायला तिला सांगत. नेहमी संध्याकाळी घरी आले की तिला विचारीत, ''करम्या की पढाई देखी क्या रे बेटा?'' सुरैयाआपा मान डोलवी. बोलत अशी नसेच. माझ्याकडून मात्र शाळेतून परतल्यानंतर कसून अभ्यास करून घेई. मी टाळाटाळ करत असल्याचे लक्षात येताच मला गोंजारून सांगे, ''ऐसा मत कर करीम, बाबाजान मुझे पूछेंगें तो क्या जवाब दूँ?'' हे म्हणत असताना ती असा केविलवाणा चेहरा करी की, मी अभ्यास न केल्याबद्दल तिलाच वडिलांचा मार खावा लागणार की काय, असे मला वाटू लागे आणि मी निमूटपणे अभ्यास करी. परंतु मी सहावीत गेलो आणि सुरैयाआपाचे ज्ञान माझा अभ्यास घेण्याकरता अपुरे पडू लागले. तीच आपणहून कंटाळून एक दिवस मला म्हणाली, ''अब मैं नै पढाई लूँगी तेरी।'' मी मनात म्हटलं, बरेच झाले, कटकट मिटली!

त्या दिवसापासून सुरैयाआपा माझा अभ्यास घेईनाशी झाली. वडिलांनीही तिला माझ्या अभ्यासाविषयी विचारणे सोडून दिले. ती जवळजवळ दिवसभर आईला कामात मदत करू लागली. हळूहळू ती एकटी घराबाहेर जाईनाशी झाली. एकदा आईनेच तिला वाण्याकडे पाठवले असता, वडील तिच्यावर गुरगुरले, ''काय कू भेजती है उसकू भायेर? लडकी जानती हुवी। अभी संभालके न्हयना चाहिये।''

तसे सुरैयाआपाचे वय फारसे नव्हते. सोळावे किंवा सतरावे असेल, परंतु वडिलांना एव्हानापासून तिच्या लग्नाची घाई लागली होती. अधून-मधून ते आईजवळ सुरैयाआपाच्या लग्नाचा विषय काढत. सुरैयाआपा अशा वेळी आतल्या खोलीत शांतपणे काम करीत राही. जणू बाहेरचे बोलणे आपल्याला ऐकू येत नाही, अशा रीतीने ती वावरत असे. बाहेर काही काम लागले-निघाले तरी येत नसे. तो विषय संपला की, मगच बाहेर येई.

आईला मात्र सुरैयाआपाच्या लग्नाची विशेषशी काळजी वाटत नव्हती. ''वखतपर होता है। उस खुदायात् अल्लाकूंच उसकी फिकीर- उसके किस्मत में जो मरद लिखा होगा वो उसको मिलेगाच। तुमने और हमने कितनी कालजी करना?'' आईच्या या युक्तिवादापुढे वडिलांचे काही चालत नसे. ते निरुत्तर होत.

परंतु सुरैयाआपाचे लग्न करण्याचा त्यांनी जणू ध्यासच घेतला होता. एक दिवस सुरैयाआपाला पाहण्यासाठी काही माणसे येणार असल्याचे त्यांनी आईला सांगितले. आईने त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. मग ती चौकशी करू लागली, ''कहाँ का है लडका?''

''यहांच का''

''नाम क्या उसका?''

''शेख महंमद''

''नाम तो पुरानाच है।''

''हमकू नाम से मतलब क्या? लडका अच्छा होना चाहिये।''

''वो कैसा है?''

''अच्छा सुना है। फॅक्टरी में काम करता है। देड सौ रुपया कमाता है।''

''पढाई कितनी हुई है?''

''ज्यादा नही।''

आई हिरमुसली झाली, परंतु काही म्हणाली नाही. वडील म्हणाले, ''कल दुपेर से आयेंगें। कुछ मीठा खाने कू करना।''

आईने मान डोलावली. मग वडील बोलायचे बंद झाले. त्यांचे बोलणे चालू असताना सुरैयाआपा आतल्या खोलीतच होती, परंतु मधल्या दरवाजातून ती मला दिसत होती. आपले लक्ष त्या संभाषणाकडे नसल्याचे ती भासवत होती, परंतु मधेच एकदा तिने वर पाहिले आणि मला पाहिले... मला पाहताच पुन्हा तिने मान खाली घातली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी तीन-चार माणसे आमच्याकडे आली. सुरैयाआपा आतच बसली होती. नवी सलवार-खमीज नेसली होती. आईने तिला पावडर लावायला सांगितले होते. सुरैयाआपाने आयुष्यात प्रथमच पावडर लावली असावी. ती आरशात बघून पावडर लावीत असताना वडील आश्चर्याने तिच्याकडे पाहत होते. सुरैयाआपाचे पावडर लावणे संपल्यावर ते जणू काही स्वत:शीच पुटपुटले, ''पावडर काय कू लगाती है? जादा शोक अच्छा नही।'' त्यांचे बोलणे आत आईला किंवा सुरैयाआपाला ऐकू गेले नाही.

ते लोक आले, तेव्हा वडील उठून उभे राहिले. ते बाहेर त्यांना सामोरे गेले. एकूण तीन-चार माणसे आली होती. त्यातील दोन स्त्रिया होत्या. त्या काळ्या बुरख्यात आल्या होत्या. त्यामुळे त्या कोण आहेत, हे मला कळलेच नाही.

परंतु त्या आतल्या खोलीत गेल्या, तेव्हा त्यांनी बुरखे काढले. त्यातील एक त्या मुलाची आई व दुसरी बहीण होती, हे आईने मागाहून मला सांगितले. ते दोन पुरुष बाहेरच्या खोलीत बसले. त्यातील एक नवरामुलगा होता व दुसरे त्याचे वडील होते. वडिलांबरोबर ते गप्पा करू लागले. मग थोड्या वेळाने मिठ्ठा खाना आला. तो खाऊन पाहुणेमंडळी निघून गेली.

त्यांनी जाताना निश्चित काहीच सांगितले नाही. मग वडील त्यांच्या घरी खेटे घालू लागले. एक दिवस आईने विचारले, ''उन लोगों ने क्या जवाब दिया?''

''अभी तक नक्की इचार हुवा नही उनका।''

''फिर तुम काय कू खेटे मारते हो? बम्मन लोगों जैसा। लडके के पिछे लगना अपना रवैय्या है क्या?''

वडील काहीच म्हणाले नाहीत. ते पुन्हा त्या लोकांकडे गेले की नाहीत, ते कळले नाही. त्यांच्यापैकी कुणी पुन्हा आमच्या घरी आले नाही आणि तो विषय तिथेच संपला. आपाजानच्या लग्नाचा विषय पुन्हा म्हणून घरात कुणी काढला नाही.

शाळेला सुट्टी लागली, तेव्हा मीही दिवसभर घरी राहू लागलो. आपाजान आता माझ्यापाशीही फारशी बोलेनाशी झाली. दिवसभर ती आईबरोबर घरकाम करण्यात गढलेली असे. तिला एकदा मी खेळायला बोलावले तर, आई चिडून माझ्यावर खेकसली. ''वो अब छोटी है क्या तेरे साथ खेलने के लिए?'' आणि त्यानंतर मी पुन्हा तिला माझ्याबरोबर खेळायला येण्याचा आग्रह केला नाही.

दिवसभर घरात बसून राहायचा मला कंटाला येऊ लागला. मी शेजारच्या न्हाव्याच्या दुकानात जाऊन बसू लागलो. तिथल्या सदाशिव न्हाव्याची आणि माझी ओळख होती. रस्त्याने शाळेला जाताना तो नेहमी हाक मारून मला विचारायचा, 'क्यों मिट्टू, चला इस्कूल कू?' सुटी झाल्यानंतर एक दिवस त्याच्या दुकानासमोर मी उभा असताना मला त्याने आत बोलावले. प्रथमच तेव्हा मी ते सलून पाहिले. त्याचा शेठ एका बाजूला बसला होता. दुकानात गिऱ्हाइके नव्हती. सदाशिव काही वेळ माझ्याशी बोलत बसला. काही वेळाने एक गिऱ्हाईक आले, तेव्हा तो उठला आणि त्याची दाढी करू लागला.

त्या दिवसापासून मी सदाशिवकडे रोज जाऊ लागलो. तासन्तास त्याच्या सलूनमध्ये जाऊन बसू लागलो. तो काम नसले की, माझ्याबरोबर बोलत बसे. गिऱ्हाईक आले की, कामाला लागे. एकीकडे त्याच्या हातातील वस्तरा चालत राहायचा व दुसरीकडे तो माझ्याशी बोलायचा. त्याची नजर घारीसारखी हातातल्या वस्तऱ्याच्या हालचालीवर रोखलेली असायची. त्याच्या हालचाली समोरच्या आरशात न्याहाळायला मला गंमत वाटायची.

मी सदाशिवकडे जाऊन बसत असल्याचा आईला हळूहळू सुगावा लागला. प्रथम ती माझ्यावर रागावली. ''किधर किधर शोधना तुझ कू? वहां हजाम के पास क्या काम रहता तेरा?''

मी म्हणालो, ''काम काय का? मजे से बैठता।''

''मजे से बैठता? मजे से क्या बैठना है? तुझे हजामगिरी सिखना है क्या?''

आईच्या त्या बोलण्याचे आपाजानला हसू आले. ती खुद्कन हसली आणि तिचे ते दात मला भेडवीत बाहेर प्रकट झाले. मी संतापून तिला म्हणालो, ''गप बैठेगी क्या? तुझ को काय कू हसू आता है?''

एरवी माझ्या बोलण्याने ती हिरमुसली झाली असती. परंतु त्या दिवशी कशी कुणास ठाऊक, चिडली नाही. हसतच राहिली. मी काही न बोलता स्वत:शीच जळफळलो. मग तीच हसायची थांबली. माझ्या केसांवरून हात फिरवत म्हणाली, ''कितना बिगडता है मेरा भैय्या! अरे मैने मजाक की.'' तिचा 'मजाक' समजून घेण्याच्या मी मन:स्थितीत नव्हतो. मी तिचा हात झिडकारून लावला. तेव्हापासून तिने सलूनमध्ये गेल्याबद्दल माझी थट्टा केली नाही. एकदा तर मी सलूनमध्ये बसलो असताना ती मला बोलवायला आली...

सदाशिवची आणि सगळ्यांचीच मग ओळख झाली. तो कधी आमच्या खोलीत येई, मला बोलावून नेई. एकदा त्याने मला एका हॉटेलात जेवायला नेले. ''तुमको क्या होना? बिर्यानी?'' त्याने मला विचारले. त्याच्या वागण्याने मी तर दडपूनच गेलो होतो. मला 'नाही' किंवा 'होय' बोलायचेही भान राहिले नाही. त्या दिवशी प्रथमच मी हॉटेलात जेवण कले.

घरी आल्यानंतर आईने जेवायचा आग्रह केला. तेव्हा मी भूक नसल्याचे तिला सांगितले, पण तिला ते पटेना. अखेर मला खरे सांगावे लागले. मला वाटले, ती रागावेल; परंतु ती फारसे काही बोलली नाही. आपाजानने मात्र विचारले, ''इतना क्या खिलाया रे उसने?''

मी म्हणालो, ''बिर्यानी!''

आपाजान गालातल्या गालात हसली. दात दिसू नयेत म्हणून तिने तोंडावर हात नेला. मग ती म्हणाली, ''अच्छा,

उसका भाकसूड निकालता है!''

काही दिवसांनी माझी शाळा सुरू झाली आणि सदाशिवकडे माझे जाणे कमी झाले. शाळेत जाता-येतानाच मी सलूनमध्ये डोकावू लागलो. येताना सलूनपाशी रेंगाळू लागलो. कधी कधी आपाजान सलूनसमोर माझी वाट बघत उभी राहू लागली. तिथे उभी असली की, ती मला म्हणायची, ''कितना देर किया रे?'' सलूनच्या दारात उभा असलेला सदाशिव अशा वेळी मला म्हणायचा, ''लल्लूभाई, जल्दी घर जा। तुम्हारी आपाजान इंतेजार कर रही है।'' आपाजान माझा हात पकडायची. हळुवारपणे दाबायची. मला घरी घेऊन जायची.

एक दिवस संध्याकाळची आपाजान घरातून एकाएकी नाहीशी झाली. ती कुठे गेली आहे, हे आधी कुणाला कळलेच नाही. मी शाळेतून परतलो, तेव्हा ती सदाशिवच्या सलूनपाशी उभी नव्हती. समोर सदाशिवही उभा नव्हता. त्यामुळे मी तिथे न थांबता थेट घरीच आलो. घरी येताच आईने विचारले, ''सुरैयाआपा नही आयी?''

''नही।''

तिने माझ्याकडे वळून पाहिले. ''सुरैय्या बाहर खडी नही थी?'' तिने पुन्हा विचारले.

''नही!''

''पोरटी फिर गई कहां?'' आई स्वत:शीच पुटपुटली आणि मग कामाच्या गडबडीत ती आपाजानला विसरून गेली. मलाही तिची आठवण राहिली नाही.

अंधार पडला. खूप रात्र झाली आणि आई एकाएकी भानावर आल्यासारखी भयभीत सुरात मला म्हणाली, ''कहाँ रे गई तेरी आपाजान? इतना देर कहाँ जानेवाली नही वो। मुझे तो डर लगता है।''

मग मलाही काळजी वाटू लागली. आपाजान कुठे गेली असेल? मला काहीच तर्क करता येईना. तेवढ्यात वडील आले. त्यांना आईने आपाजानविषयी सांगितले. ते काहीसे गंभीर झाले. मग उठून तिच्या शोधाला बाहेर गेले.

सुमारे तासाभराने ते परतले, तेव्हा अधिकच गंभीर दिसत होते. आपाजानचा काहीच ठावठिकाणा लागला नव्हता. त्यांनी शेजारी सर्वत्र चौकशी केली होती. पोलिसांनादेखील आपाजान नाहीशी झाल्याची वार्ता कळवली होती. ते घरी आले आणि भिंतीला टेकून खिन्नपणे जमिनीवर बसले. आई ओक्साबोक्शी रडू लागली. आईला रडताना पाहून मलाही रडू कोसळले. रडता-रडता मी कधी झोपी गेलो, मला कळले नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी शेजारचे एक गृहस्थ आमच्याकडे आले आणि वडिलांशी हळू आवाजात काही तरी बोलू लागले. बराच वेळ त्यांचे बोलणे चालले होते. वडिलांचा चेहरा मात्र संतप्त होता होता. एकदा ते मधेच म्हणाले, ''तुम्हारी कसम, मैं उसको कतल कर डालूंगा।''

त्या गृहस्थाने वडिलांचा हात धरला. वडिलांना विनवणीच्या सुरात म्हणाला, ''ऐसा कुछ करना नही खानसाब, दिमाग काबू में रखना। अपनी किस्मत बुरी समझना।''

वडील काहीच म्हणाले नाहीत. तो गृहस्थ निघून गेला तरी ते एकटेच हताशपणे बसून राहिले. आम्हाला काहीच अर्थबोध झाला नाही. अखेर आईने पुढे येऊन विचारले, ''कमरुद्दीन ने क्या बताया?''

''उसने सुरैया को देखा।''

''कहाँ?''

''मालाड में।''

''वहाँ कैसे गयी?''

काही वेळ वडिलांनी उत्तर दिले नाही. मग ते म्हणाले, ''उसके साथ सदाशिव था।''

आणि मग माझ्या लक्षात आले... सदाशिव मला कालपासून दिसलाच नव्हता! त्याला आम्ही विसरूनच गेलो होतो. त्याच्याविषयीचा विचारच आमच्या कुणाच्या मनाला शिवला नव्हता. आपाजानने सदाशिवबरोबर असे पळून का जावे, याचा मी विचार करू लागलो.

''मिला वो भी हजाम मिला! हंऽऽ'' आई हाताची बोटं कडाकडा मोडीत किंचाळली. ''दीन... इस्लाम सब भूल गयी कैसी?''

वडील काही वेळ शांत होते. मग एकदम उसळून म्हणाले, ''बस करो. अब इस घर में उस का नाम मत लेना। मेरे लिए पोरटी मर गयी- जहन्नम में गयी!'' आणि ते उठले आणि पायांत बूट घालून तरातरा चालू लागले. कामाला निघून गेले...

ते जाताच मी बसलो होतो तेथे आई आली. ''उस हरामजाद्यासे तू दोस्ती किया ना?'' माझ्या पाठीत धपाटा देत ती किंचाळली. ''तुझको बोली थी, हजाम से दोस्ती मत कर. सारा सत्यानास किया मेरे बेटी काऽ'' असे म्हणत ती मला धपाटे देत राहिली. त्या माराने मी कळवळून गडबडा लोळू लागलो. तशी कंटाळल्यासारखी ती मारायची थांबली. माझ्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकून आत निघून गेली. मी तसाच जमिनीवर पडून राहिलो. आपाजानने

सदाशिवबरोबर जाण्यात माझे चुकले तरी काय, याचा मी विचार करू लागलो.

त्यानंतर काही दिवस तिने मला शाळेत पाठवले नाही. घरातून बाहेरच जाऊ दिले नाही आणि जेव्हा वडिलांनी मला शाळेबाबत हटकले, तेव्हा ती आतून धावत आली आणि माझ्यावर खेकसत म्हणाली, ''कल से जाना बे. लेकिन सुरैया का किसी से जिकर नही करना, नै तो फिर मैं हूँ और तुम...''

आईने असा धाक घातल्यानंतर आपाजानबद्दल कुणाशी काही बोलायला मी धजावलोच नाही. मला तिच्याबद्दल कुणी विचारलेही नाही. परंतु रस्त्याने येता-जाताना त्या सलूनपाशी मी आलो की, सलूनचे इतर न्हावी माझ्याकडे पाहून मिस्किलपणे हसत आहेत, असे मला वाटायचे आणि मी खाली मान घालून तिथून पुढे सटकायचो. पुढे-पुढे मला त्यांच्या हसण्याची भीती वाटेनाशी झाली. पूर्वीसारखा न अवघडता त्यांच्यासमोरून जाऊ लागलो. संध्याकाळी शाळा सुटल्यानंतर कंटाळा आला की पुन्हा त्या सलूनच्या समोर येऊन उभा राहू लागलो. त्यांच्याशी बोलत बसू लागलो.

त्यांनी माझ्याशी आपाजानचा विषय कधी काढला नाही आणि घरातही तिच्याबद्दल कुणीच काही बोलेनासे झाले. जणू आपाजान आमच्या घरात पूर्वी वावरतच नसल्याच्या जाणिवेने घरात आम्ही सारे वागू लागलो. कुणीच तिची आठवण काढीनासे झाले.

असे वर्ष सरले आणि रमजानची ईद आली. मी आणि वडील पहाटे नमाजला गेलो. नमाज आटोपताच वडील मला म्हणाले, ''ए घर में जा। मैं सगे सोयरों को मिलके आता.'' मी घरी यायला उत्सुकच होतो. आईने शिरखुरमा केला होता. तो कधी खाईन, असे मला झाले होते. मी घराकडे पळत निघालो...

आणि सलूनपाशी सदाशिव उभा असलेला मला दिसला. मी दचकलो. माझे पाय आपोआप थबकले. मला पाहताच तो पुढे आला. माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, ''तुम्हारी आपा आयी है।''

''कुठे?''

''घर गयी है। ईद है ना। माँ से मिलने आयी है।''

''मग मी जातो घरी''

''हां हां-'' त्याने माझ्या हातात बळेच पाच रुपयांची नोट कोंबली. ''ये मेरी तरफ से ईदी-'' तो म्हणाला.

सदाशिवच्या आग्रहामुळे मला काही बोलताच आले नाही. मी ती नोट निमूटपणे इजारीच्या खिशात कोंबली आणि घराकडे धावत सुटलो.

आपाजान तेव्हाच घराकडे पोहोचली होती. तिने मला पाहिले नाही. तिने बंद दरवाजा ठोठावला आणि क्षणार्धात आई दरवाजा उघडून बाहेर आली. समोर आपाजानला पाहताच ती काही क्षण भांबावली. मग एकाएकी तिचा चेहरा कठोर बनला.

''काय कू आयी है?''

''मिलने ... तुम को मिलने माँ...''

''चले जाव यहाँ से। इधर आना नही। इस घर में कभी कदम रखना नही।''

''माँ...''

''तुम चली जाव यहाँ से। तेरे बाप ने अगर देखा तो कसम से तुम्हे कतल कर डालेगा । यहाँ से चली जा।''

आपाजान काही क्षण दरवाजातच घुटमळत उभी राहिली आणि अखेर मागे वळली. तेव्हाच तिचे लक्ष माझ्याकडे वेधले. तिचे डोळे पाण्याने तरारले होते. तिने माझ्या खांद्यावर हात ठेवला, मग ती पुटपुटली, ''तू भी मेरे ऊपर गुस्सा किया है क्या रे?''

आई अद्याप दरवाजातच उभी होती. आपाजानने माझ्या खांद्यावर हात ठेवताच ती चवताळून बाहेर आली आणि मला ओढत आत घेऊन गेली. आपाजान कधी निघून गेली, ते मी मग पाहिलेच नाही....

थोड्या वेळाने वडील आले. आईने आम्हाला शिरखुरमा आणून दिला. वडील सावकाश शिरखुरमा खाऊ लागले, परंतु मला सारखी आपाजानची आठवण येऊ लागली... शिरखुरमा खाताना मला एकदम रडूच कोसळले...

(मराठवाडा : दिवाळी १९६५)

तो तरणा, देखणा आणि
धडधाकट होता. त्याचं बसणं-उठणं
फार आदबशीर दिसायचं.
खाली मान घालून बसण्याची
त्याला सवय होती.
आणि बोलायचं झालं, तर
'होय' किंवा 'नाही' यापलीकडे
सहसा बोलत नसे.
त्याला पहाताच मरीयमचे डोळे
आनंदानं लकाकताना दिसायचे.




'जंगबारवाला' म्हणजे झांझीबारचा शमसू, तापा-धगानं 'इन्तेकाल' झाला; यापेक्षा त्याची तरणी, देखणी बीबी मरीयम रांडोक झाली, ही गोष्ट शिरळगावच्या संबंध इतिहासात अधिक शोककारक ठरली! शमसूला मूठमाती देऊन लोक परतले ते, घरोघर न जाता पुन्हा शमसूच्या घरी आले. 'खतम'चा विधी झाल्यावर बाहेरच्या फलाटावर आतली रडारड ऐकत बसले. काही जण तर आतच गेले. तिथं वठणातल्या काळोखात रडत बसलेल्या बायकांच्या अंगावर धडाधड कोसळले. त्या काळोखात मरीयम कुठं दिसते का, ते डोळे फाडफाडून बघू लागले आणि ती तिथं न दिसतांच पुन्हा उठून बाहेर आले.

पण हैदर एवढ्यावरच थांबला नाही. तो आत जाताच रडारड सुरू झाली. त्याबरोबर तो हुंदके देऊ लागला आणि बायकांची रडारड संपून हुंदक्यांवर आलं, तेव्हा सरळ स्तब्ध बसला. मग मरीयम तिथं नाही, हे पाहाताच उठून तिच्या काळोख्या खोलीत गेला आणि तिथल्या वाटेवर बसला. खाटेच्या दुसऱ्या टोकाकडून मरीयमच्या हुंदक्यांचा आवाज त्याच्या कानी आला, तसा डोळे फाडफाडत तिच्याकडे पाहू लागला. पण त्या काळोखात ती त्याला दिसली नाही. मग आपल्या कल्पनेनं तिचं नाजुक-देखणं शरीर दुःखावेगानं कसं थरथरत असेल याचं चित्र त्यानं आपल्या मनाशी उभं केलं आणि त्या कल्पनेतच पुढं होऊन तिच्या पाठीवर हात

फिरवीत तो म्हणाला, ‘‘बस आता, किती रडशील?’’

त्याला वाटलं, पुढं जावं आणि तिची समजूत घालावी. तिच्या पाठीवरून हात फिरवावा, तिच्या कोमल मुखावरून ओघळणारी आसवं पुसून काढावीत. तिच्या... पण हे विचार त्याच्या मनातच राहिले. तसं करायचा धीर त्याला झाला नाही. तो उठला. नाक-डोळे पुसत बाहेर पडला; आपल्या घराकडे चालता झाला.

त्याला तसा बाहेर पडताना पाहून तिथं बसलेल्या चार टवाळखोर पोरांतला एक जण डोळे मिचकावून हळूच म्हणाला, ‘‘ह्यो कोल्हो थतं कशाला गेलो होतो!’’ आणि त्याबरोबर त्या पोरांत विचित्र हास्य पिकले.

त्या मुलाचं म्हणणं खोटं नव्हतं. हैदर कुणाच्या भल्या-बुऱ्याला जरी कुणाच्या घरी गेला, तरी लोकांना त्यांत त्याच्या स्वार्थसाधूपणाची दुष्ट शंका येई. अख्ख्या गावात या त्याच्या स्वभावाचा लौकिक होता. सात-बाराच्या उताऱ्यांतल्या साऱ्या मेखा त्याला पुरत्या माहीत होत्या. त्याच्या जोरावर त्यानं आदल्या वर्षी खालाबीच्या घरातला जमीनीच्या वाटपाचा फसाद मिटवला होता. कुणाच्याही मध्यस्थीनं न मिटणारं भांडण थंडावलं, तेव्हा अख्खा गाव चकित झाला होता. पण काहीच दिवसांनी तलाठ्यानं खालाबीचा माळावरील सबंध सरवा जेव्हा शमशेरच्या नावावर चढवला, तेव्हा गाववाल्यांचे डोळे उघडले होते!

गुदस्तां तर त्यानं कमालच केली! आवीज झाल्यावर दर वर्षीप्रमाणं गाववाल्यांची गुरं वरती माळावरच्या वाड्यात चरावयास गेली. पण हैदरनं अशी बातमी आणली की, हल्ली रात्रीचा माळावर वाघ फिरतो; काल रात्री मी डोळ्यांनी पाहिला! झालं! सगळ्यांनी आपापली गुरं खालती आणली. माळावर रात्रीचं कोणी फिरकेनासं झालं. काही दिवस गेले आणि लोकांच्या लक्षात आलं की, माळावरचं गवत आपली गुरं घालून कोणी तरी नासधूस करीत असलं पाहिजे. तलाश जारी झाला आणि त्यातून असं निष्पन्न झालं की, वाघ-बिघ ही सगळी हैदरची गप्प आहे. आपली गुरं लोकांच्या गवतात बिनधोक चरावीत, म्हणून योजलेली ही युक्ती आहे. हा कोल्हाच रात्री-बेरात्री आपली गुरं घालून सगळ्यांच्या गवताची धूळधाण उडवतो आहे!

हैदरचा हा कावेबाजपणा लोकांना माहीत असल्यामुळं लोक त्याच्याशी सावधगिरीनं वागत. पण साध्या-सरळ माणसांना त्याच्या स्वभावातली ‘ही’ वाकडी वळणं कळत नसत. त्यामुळं मरतिकाचे वेळी हैदर घरात गेला, याबद्दल त्या घरच्या माणसांना काही वाटलं नाही; पुढं नेहमी जात राहिला, तरीही काही वाटलं नाही.

महिना झाला तेव्हा आखरी खरं झालं. शमसूच्या मरणाचा तो प्रसंग, शोक हळूहळू पुसट होत गेला. लोक आपल्या नित्य व्यवहारांत मश्गूल झाले. हैदर मात्र आपले उद्योग सांभाळून त्या घरी जात राहिला. पण मरीयम त्याच्या दृष्टीस पडेना.

आणखीन एक महिना गेला आणि तिच्या आईनं तिला आपल्या घरी- माहेरी आणलं. पुन्हा त्या दिवशी रडारड झाली. तिथं पण ती प्रथमप्रथम आपल्या खोलीबाहेर पडत नसे. पण काही दिवस गेले आणि घरातल्या घरात ती वावरू लागली.

हैदरला ती माहेरी आल्याचं कळलं आणि तो तिच्या माहेरी येऊ लागला. तिला ऐकू जाईल इतक्या आवाजात घरातल्या माणसांशी बोलत बसू लागला. ती त्याच्या दृष्टीसही पडत नसे. पण ती घरात आहे आणि आपलं बोलणं ऐकत आहे, ही भावना त्याला सुखकारक वाटायची. पुढे त्याचं तेवढ्यावरच समाधान होईना. तो बेधडक तिच्या खोलीत घुसू लागला. पानदान मागूं लागला. तिलाही त्याच्याशी बोलणं भाग पडू लागलं. असं जेव्हा नेहमीच होऊ लागलं, तेव्हा तोही कुणी परका उरला नाही. घरातली माणसं बसलेली असली आणि तो आला, तर ती उठून जाईनाशी झाली. त्याच्या बोलण्यावर हसू लागली. तिचं हसणं-बोलणं त्याला घायाळ करी. तिच्या जवान देहाकडे तो टक लावून पाहत राही. कोल्ह्यासारखे त्याचे डोळे तिच्यावर खिळलेले असत. पण आपल्या बोलण्याची, सहवासाची त्या दुर्दैवी मुलीवर काय प्रतिक्रिया होते आहे, हे त्याला कळू शकत नसे. एक दिवस एकांत साधून काही बोलण्याचा त्यानं निश्चय केला आणि जेव्हा तसा एकांत त्याला मिळाला, तेव्हा वेड्यासारखा तो तिच्याकडे पाहतच राहिला...

पण तरीही त्याचं जाणं-येणं, रोजचं टक लावून पाहणं हे चालूच राहिलं! एक दिवस मधेच या त्याच्या कार्यक्रमात खंड पडला. जमिनीचा ताबा मिळावा म्हणून त्यानं आपल्या कुळवाडी कुळांवर दावे लावले होते. त्यांच्या तारखा लागल्या, म्हणून त्याला रत्नागिरीस जावं लागलं. पुन्हा परत यायला त्याला पंधरा दिवस लागणार होते.

या अवधीतच एक नवाच माणूस मरीयमच्या घरी जाता-येताना दिसू लागला. तो तरणा, देखणा आणि धडधाकट होता. त्याचं बसणं-उठणं फार आदबशीर दिसायचं. खाली मान घालून बसण्याची त्याला सवय होती. आणि बोलायचं झालं, तर ‘होय’ किंवा ‘नाही’ यापलीकडे सहसा बोलत नसे.

त्याला पहाताच मरीयमचे डोळे आनंदानं लकाकताना दिसायचे. ती येऊन दारात उभी राहायची आणि समोर कोणी नसलं की, तो मान वर करून तिच्याकडे पाहायचा अन् तिच्या डोळ्यांतल्या आर्त भावांत विरघळून जायचा.

पंधरा दिवसांनी हैदर रत्नागिरीहून परतला, तेव्हा मरीयमचा निका त्या माणसाशी ठरल्याची बातमी त्याला कळली. सारं काही ठरून गेलं होतं. सगळ्या गावातही हे वृत्त ऐकून समाधान पसरलं. हैदरच्या तिथल्या जाण्या-येण्यामुळं जी अभद्र शंका आपल्याला येत होती, ती खोटी ठरली म्हणून बहुतेकांना समाधान वाटलं.

पण मंगनी लवकर होईना. ज्या दिवशी व्हायची असं कळलं, त्या दिवशीही झाली नाही. आणि अखेर सगाई फिस्कटली, असं एक दिवस लोकांनी ऐकलं. त्या माणसाकडूनच गावातल्या एकाला असं कळलं की, ''मरीयमला दिवस गेले आहेत आणि ते पाप पचवण्यासाठी म्हणून ती माणसं निक्याची घाई करीत आहेत. असल्या चवचाल मुलीशी मी निका लावणार नाही!''

लोकांना अर्थातच ते खरं वाटलं. पण काही जणांना यांत हैदरचं काही तरी कारस्थान असावं, असंही वाटलं. परंतु खरं-खोटं पडताळून पाहण्याची हिंमत कुणाला झाली नाही. काही दिवसांनीच दुसऱ्या एका मुलीशी त्या माणसाचा निका झाल्याचं लोकांनी ऐकलं.

मरीयमलाही ते कळलं होतं आणि तिनं त्या दिवसापासून अंथरूण धरलं. काही दिवसांनी तिला ताप येऊ लागला.

हे ऐकून गावात नव्या अफवा पुन्हा उठल्या. ती बीमार आहे, हे हैदरकडूनच लोकांना कळलं आणि तिच्या दुखण्याबद्दल निरनिराळे तर्कवितर्क सुरू झाले. ज्या लोकांची त्या घरी जाण्याची वहिवाट होती, ते जाऊन मरीयमच्या खोलीत डोकावले; पण त्यांना तिचं दर्शनही झालं नाही.

मग एक दिवस हैदर तिला पाहण्यासाठी गेला. तिला दवा करण्यासाठी त्यानं तिच्या आईला कळकळीनं सांगितलं. दवा करण्याचा तिचाही इरादा होता, पण पैशांअभावी सारं घडलं होतं. तो बोजा आपल्या शिरावर घेण्याचं हैदरनं खुषीनं मान्य केलं आणि त्या दिवसापासून मरीयमला डॉक्टरचं औषध सुरू झालं.

महिन्यानं ती घरातल्या घरात फिरू लागली. तिला बराच आराम पडला. ती बरी आहे, हे अर्थात हैदरमुळेच लोकांना कळत होतं. हल्ली तर त्याचं जाणं-येणं फार वाढलं होतं.

पण मरीयमची आई हल्ली दु:खी-कष्टी असे. मरीयमची सगाई मोडली, याबद्दल तिला खंत वाटत होती. गावात काय वाटेल ते बोललं जातं, हेही तिला कळलं होतं. त्यामुळे शक्य तितक्या लवकर मरीयमचा निका व्हावा, असं त्या माऊलीला वाटत होतं.

हैदरनं ही संधी सोडली नाही. कोल्हासारखा तो एक दिवस त्या म्हातारीच्या कानाशी चांगला तासभर लागला होता. तिच्याशी हुज्जत घालीत होता!

दुसऱ्याच दिवशी मरीयमचा हैदरशी निका ठरल्याची बातमी गावात पसरली. असं होणारच होतं, असं काहींनी बोलून दाखवलं. हैदरनं म्हातारीला बनवलं, असंही काही जण बोलले. हैदरच्या कानावर त्यातलं थोडं फार गेलं. पण त्यानं कुणाकडेही लक्ष दिलं नाही. काही दिवसांनी निका झाला, तेव्हा सगळे निक्याला हजर राहिले. हैदरची थट्टा करीत मिठ्ठा खाना खाऊन घरोघर परतले.

निका लागल्यावर हैदर लगेच घरात गेला. आत जमलेल्या गावातल्या बायका हळूहळू पांगत होत्या. रीतीप्रमाणं शेज भरून झाली आणि खोलीत ती दोघं अन् मरीयमची धाकटी बहीण एवढीच राहिली. हैदरनं त्या मुलीला खोलीबाहेर जाण्यास सांगितलं आणि धाड्कन दार लावून घेतलं! कुतूहल म्हणून काही वेळ ती पोरगी दाराबाहेर उभी राहिली. तेव्हा तिला मरीयमचे हुंदके आणि विव्हळणं तेवढं ऐकू आलं. तशी ती जाऊन मुकाट्यानं पडवीत झोपली.

दोन दिवसांनी आपल्या घरी गेली आणि लगेच तिची आई हैदरच्या घरी आली. मुलीनं तिला असं सांगितलं की, मरीयमला निक्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी उठताना चक्कर आली, न्हाणीत ती कोसळली आणि तिला रक्ताची उलटी झाली. हे खरं की खोटं ते पाहायला, चौकशी करायला ती आली होती. पण मरीयमनं तिला काही सांगितलं नाही. ती मात्र खिन्न, उतरलेली दिसत होती, एवढंच! तिची आई तशीच परत आली.

हैदरचा रुबाब या काही दिवसांत फारच वाढला. आधीच गावात त्याचे कुणाशी फारसे संबंध नव्हते, आता तर तो इतरांशी फटकूनच वागू लागला. काही दिवसांत पाणी भरण्यासाठी मोलकरणीचं काही काम नाही, असं म्हणून तिला त्यानं कामावरून सोडून दिलं आणि पाणी भरण्याचं काय मरीयमवर सोपविलं.

शमसू मेल्यानंतर प्रथमच त्या दिवशी ती घराबाहेर पडली आणि विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेली. गावातल्या चार बायका तिला तिथं भेटल्या, त्यांच्याशी ती चार शब्द बोलली आणि टवाळखोर पोरांच्या नजरा चुकवीत पाणी भरू लागली.

जेमतेम पंधरा दिवस तिनं पाणी भरलं आणि मग जशी अचानक ती एक दिवस घराबाहेर दिसली, तशीच अचानक बंद झाली. विहिरीवर गेल्यावर चार लोकांशी बोलत बसतेस, त्यांच्याशी हसतेस, खिदळतेस– असा हैदरनं तिच्यावर आळ घेतला आणि तिला बडव–बडव बडवली. ती बाहेर पडायची बंद झाली!

दुसऱ्या–तिसऱ्या दिवशी त्याला पुन्हा रत्नागिरीस जावं लागलं. तो परत आला, तेव्हा मरीयम झोपलेली होती. ते पाहून त्याच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन पोहोचली. तो जवळ जाताच ती दचकून एकदम उठून उभी राहिली आणि एकदम तिचा तोल गेला. ती खाली कोसळली. पण हैदरनं तिच्याकडे लक्ष दिलं नाही. तिला मनसोक्त शिव्या घालत त्यानं आपल्यापुरतं अन्न शिजवलं आणि ते खाऊन तो आपल्या कामाला गेला.

पण काही दिवस गेले आणि मरीयमला पुन्हा रक्ताच्या उलट्या झाल्याचं तिच्या आईला कळलं. या वेळेस तिनं येऊन पुरतीच शहानिशा केली. मरीयमनेही सगळं कबूल केलं. रात्री हैदर बाहेरून आल्यावर तिनं मरीयमला दवा करण्यासाठी त्याला काकुळतीने सांगितलं. तो एकदम खेकसून म्हणाला, ''काय होतंय तिला? सगलां ढोंग हय!''

अखेरीस मोठ्या मिनतवारीनं त्यानं दुसऱ्या दिवशी अप्पा वैद्याला आणलं. त्यानं तिला तपासलं व पडून राहण्यास सांगितलं आणि चाटण व गोळ्या देऊन तो निघून गेला.

पण हैदरनं निराळाच कांगावा करण्यास आता सुरुवात केली, ''ही निजनार अनी मना रोटी कोन देणार?'' असा आक्रस्ताळेपणा करण्यास त्यानं सुरुवात केली. तेव्हा म्हातारीने आपल्या मुलीला त्याच्याकडे पाठवलं. मरीयमकडे तिनं पाहावं, हाही हेतू होताच.

पण मरीयमचं पाहण्यास त्या मुलीला वेळ होत नसे. हैदरचं करण्यातच तिला जीव नकोसा होई. रोटी वेळेवर मिळत नाही म्हणून तो तिच्यावर डाफरू लागला. अगदी मरीयमला ऐकू जाईल अशा आवाजात ओरडू लागला. त्यामुळं ती पोरगी बिचारी कावून–करपून गेली.

हे असं चाललं असलं तरी त्याचे इतर उद्योग बंद पडले नव्हते. ते चालूच होते. जमिनीचे दावे, गावच्या सोसायट्यांच्या पैशांचं लफडं, इत्यादी भानगडी तो करीतच होता.

पण एक दिवस मरीयमचं दुखणं जास्त झालं. तेव्हा सगळा गाव हैदरच्या घरी लोटला. तिच्या कृश, फिकट देहाकडे पाहून माणसं तिच्या मरणाची चर्चा करू लागली. अजून किती दिवस जातील याचे तर्क सुरू झाले.

पण फार दिवस गेले नाहीत. तिला एक दिवस दम लागला आणि पुन्हा माणसं गोळा झाली. आदल्या दिवशी तिला एकाएकी हुशारी वाटली होती. ती उठून बसली. सुजलेले पाय तिनं आपल्या हातांनी हलकेच दाबले आणि म्हावरं खायला मागितलं, असं रडत–रडत तिच्या बहिणीनं तिथं जमलेल्या माणसांना सांगितलं. मग तिची आईही कपाळ बडवून घेऊ लागली. हैदरनं निक्याच्या वेळी आपणास शंभर रुपये दिले, हे तिनं कबूल केलं. आपल्यामुळे पोरगी मौताला लागली, असं ती म्हणू लागली आणि तरीही (स्वतःच्या आणि मरीयमच्या) नशिबाला ती बोल लावू लागली!

पण हैदर कुठूनसा आला. तो आल्याबरोबर तिथली कुजबुज बंद पडली. गर्दी पांगली. गावातल्या बायका घरोघरी गेल्या. रात्र झाली तसा जेवून तो ओट्यावर जाऊन झोपला आणि मरीयमच्याजवळ तिची आई अन् बहीण रात्रभर जागत बसली होती.

सकाळचे दहा वाजले आणि मरीयमच्या आईनं हंबरडा फोडला. बहिणीनं आर्त किंकाळी मारली. शेजारची माणसं धावली. एकच गलका झाला. गाव जमला. मरीयम 'इंतेकाल' झाली!

हैदर आपल्या शेतावर तेव्हा बांध घालीत होता. त्याला कळलं तसा संथपणे तो घरी आला. बाहेर गावातली पुरुषमंडळी गोळा झाली होती. त्यांच्याकडे विचित्र दृष्टिक्षेप टाकून तो आत गेला. वळणात मरीयमची 'मय्यत' ठेवलेली होती. बाजूला बायका रडत होत्या. ऊर बडवून घेत होत्या. हंबरडे फोडीत होत्या. त्याचा दगडी चेहरा काही वेळाने आक्रसला आणि मोठमोठ्यानं तो रडू लागला; अगदी गळा काढून, हंबरडा फोडून रडू लागला.

मूठमाती संध्याकाळी झाली. हैदर आणि इतर माणसं कबरस्तानातून परतली. 'खतम' झालं आणि बाकीची माणसं आपापल्या घरी गेली. मग हैदर घरात गेला आणि वठणात रडत बसलेल्या सासूच्या गळ्यात पडून रडू लागला. तिथंच बाजूला मरीयमची धाकटी बहीण बसून रडत होती. तिच्याकडे त्याचं लक्ष वेधलं आणि सासूच्या गळ्याला लागून हमसाहुमशी रडत असतानाच तो क्षणभर थांबून त्या कोवळ्या पोरीकडे पाहू लागला.

(वसुधा : दिवाळी १९६२)

**लेख** । हमीद दलवाई

# मुंबईकर मुसलमान



गांधीजींच्या 'हरिजन' पत्राच्या प्रती विकणे, हा त्याचा एक आवडता उद्योग होता. 'हरिजन' बंद पडले, तेव्हा तो ढसाढसा रडला आणि मग काही वेळाने शांत झाला. तेव्हा मुसलमान समाजातील जातीयतेचा धिक्कार करताना उद्वेगाने समोरच्या टेबलावर जोराने हात आपटून म्हणाला, "कंबख्त बदलते नहीं। अभी तक बदलते नहीं!" एका सबंध समाजाचे प्रसंगी अतिरेकी वागणे हे कडव्या धर्मनिष्ठेचे प्रतीक असले, तर त्या समाजाविरुद्ध उभ्या ठाकणाऱ्या शौकतुल्लांसारख्यांच्या निष्ठेचे मूळ ह्या कडव्या धर्मप्रवृत्तींतच असले पाहिजे!

सन १९४६ हे वर्ष. सकाळची वेळ. ग्रँट रोडहून पायधुणीकडे जाणाऱ्या १६ नंबरच्या ट्रामच्या रस्त्याने मी एकटा चाललो होतो. ट्रामची मला माहिती नव्हती. मी तेव्हा चौदा वर्षांचा असेन. मी घराहून पळून मुंबईला आलो होतो आणि उपनगरातील एका नातेवाईकाकडून भेंडी बाजारात राहणाऱ्या नातेवाईकाकडे चाललो होतो.

आदल्या दिवशीच हिंदू- मुसलमानांचा दंगा सुरू झाला होता, परंतु माझ्या ते गावीही नव्हते. घरातून पळून आल्याच्या अपराधी जाणिवेने मी अस्वस्थ होतो. आपल्याच विचारात गढून गेल्यासारखा रस्त्याने चालत होतो. तुरळक माणसे रस्त्याने चालली होती. मला वाटते ट्राम बंदच होती. पोलिसांच्या गाड्या फिरत होत्या. रस्त्यावरही पोलीस उभे होते. गोलपिठ्यापाशी रस्त्यावर काचांचा आणि सोडा वॉटरच्या फुटलेल्या बाटल्यांचा खच पडला होता. मी पुढे गेलो आणि गोल देवळापाशी आलो, तेव्हा समोर हजारोंचा (हिंदूंचा) जमाव पाहून थबकून उभा राहिलो. तो जमाव देवळापाशी भेंडी बाजाराच्या दिशेने तोंड करून उभा होता. समोर काही अंतरावर मुसलमानांचा तेवढाच जमाव क्रुद्ध होऊन उभा ठाकला होता. या दोन जमावांच्या मधे रस्त्यावर कुणी चिटपाखरूदेखील वावरत नव्हते. तेवढा रस्त्याचा भाग निर्मनुष्य, ओसाड भासत होता. दंगा म्हणजे काय, हे मला तेव्हा कळले! आपण हजारो हिंदूंच्या जमावात एकटे उभे आहोत, याची कल्पना येताच माझ्या अंगावर भीतीचा काटा उभा राहिला. मी भेदरल्यासारखा काही वेळ तिथेच रेंगाळत उभा राहिलो. एवढ्यात कुठून तरी पोलिसांच्या लॉऱ्या भरभरून आल्या आणि त्यांनी जमावाला पांगवायला सुरुवात केली. मी तिथून मागे वळलो आणि चालत ग्रँट रोडला परतलो.

आता अठरा-एकोणीस वर्षांचा काळ लोटल्यानंतर हिंदू आणि मुसलमान वस्तीला अलग करणारी गोल देवळाजवळची ती निर्मनुष्य वस्तीची रेषा पुसली गेली आहे. मुंबईत गेली अठरा वर्षे तरी हिंदू-मुसलमानांचा दंगा

झालेला नाही. पूर्वी हिंदू स्त्रिया ग्रँट रोडहून क्रॉफर्ड मार्केटकडे जाताना पायधुणीहून जाणाऱ्या १६ नंबरच्या ट्रामला बसत नसत, असे एका जुन्या ट्राम कंडक्टरने मला सांगितले. त्या १० नंबरच्या ट्रामने जे. जे. इस्पितळापाशी येऊन दुसरी ट्राम पकडायच्या. आता भेंडी बाजारच्या रस्त्यांतून त्या बिनदिक्कत वावरताना दिसतात.

मुंबईतील मुसलमान वस्त्याही आता निर्भेळ मुसलमानांच्या राहिलेल्या नाहीत. पाकिस्तानला गेलेल्या अनेक मुसलमानांची स्थावर मालमत्ता पाकमधून आलेल्या निर्वासितांना दिली गेली. मांडवी पोस्टाकडून महंमदअली रोडने क्रॉफर्ड मार्केटकडे जाऊ लागलो की, काही इमारतींत आता सिंधी (हिंदू) राहताना दिसतात.

परंतु यामुळे या मुसलमान वस्तीचा वेगळेपणा नष्ट झालेला नाही. या सिंधी हिंदूला आपण वेगळ्या वस्तीत राहतो आहोत, असे वाटत नाही. महंमदअली रोडवर राहाऱ्या एका सिंधी हिंदूला मी मुसलमान असल्याचे बरेच दिवस माहीत नव्हते. परंतु एक दिवस सहज बोलता-बोलता माझ्या मुसलमानत्वाचा पत्ता लागल्याने तो सद्‌गदित होऊन उद्‌गारला, ''फिर तो तुम हमारे भाईही निकले!'' बहुधा या त्यांच्या सर्वसमावेशक वृत्तीनेच या वस्तीचे स्वरूप कायम राहिले आहे.

भेंडी बाजार हे मुसलमानांच्या राजकीय चळवळीचे एके काळी केंद्र होते, असे म्हटल्याने अतिशयोक्ती वाटण्याचे कारण नाही. जीनांना मुसलमानांचे एकमुखी नेतृत्व भेंडी बाजारनेच मिळवून दिले. पाकिस्तानची चळवळ इथेच पोसली गेली, वाढली. या वस्तीतील मेमन, खोजा या धनिक, व्यापारी जमातींनी जीनांना पैशांचे पाठबळ पुरवले. हबीब बँक येथेच जन्माला आली आणि पुढे पाकिस्तानच्या निर्मितीनंतर पाकची राष्ट्रीय बँक बनली. इथल्याच केसरबागच्या मैदानावर द्विराष्ट्रवादाचा जीनांचा संदेश मुसलमानांनी ऐकला आणि 'कायदे आझम जीना जिंदाबाद' व 'पाकिस्तान जिंदाबाद'च्या घोषणांनी तेथील आसमंत एके काळी दणाणून गेले. पुढे होऊ घातलेल्या पाकिस्तानची भेंडी बाजार ही एक प्रकारे परक्या भूमीवरील (इन् एक्साइल) राजधानी होती!

अनेक वर्षे राष्ट्रीय चळवळींत पालवलेल्या एका मुसलमान नेत्याने जीनांना केसरबागेतील एका सभेच्या वेळी घडलेल्या प्रसंगाची कथा मला सांगितली होती.

जीनांच्या सभांचा खाक्या नेहमी ठरलेला असे. सभेच्या व्यासपीठावर दोन्ही बाजूंनी चाँदतारा असलेली लीगची हिरवी निशाणे फडकत असायची. मुस्लिम नॅशनल गार्ड्‌सचे स्वयंसेवक जीनांना 'खडी ताजीम' द्यायला सज्ज उभे असत. व्यासपीठानजीक सर्वांत पुढे वृत्तपत्र प्रतिनिधींची बसायची व्यवस्था केलेली असे. त्यांच्या मागे आमंत्रित व नंतर जनसमुदाय असा क्रम ठरलेला असे.

परंतु, त्या दिवशी या व्यवस्थेत काही तरी चूक झाली. आमंत्रित पुढे बसले आणि वृत्तपत्र प्रतिनिधींची व्यवस्था त्यांच्या मागे करण्यात आली. ही चूक आधी कुणाच्या लक्षात आली नाही. जीना नेहमीप्रमाणे व्यासपीठावर येऊन दाखल झाले आणि त्यांनी खाली दृष्टी टाकली; परंतु त्यांना नेहमीचे वृत्तपत्र प्रतिनिधींचे चेहरे दिसले नाहीत. व्यासपीठावर उपस्थित असलेल्या चुंद्रीगरना त्यांनी संतप्त होऊन विचारले, ''मि. चुंद्रीगर, व्हेअर्स द प्रेस? आप क्या समझते है? मैं इन बेवकूफ मुसलमानोंके सामने तकरीर करने आया हूँ? आय वाँट प्रेस!''

झालेला प्रकार चुंद्रीगर यांच्या तेव्हा लक्षात आला आणि त्यांनी जीनांची कशी तरी समजूत घातली. काही वेळाने जीना शांत झाले. मग आम जनसमुदायापुढे ते 'तकरीर' करावयास उभे राहिले. 'कायदे आझम जीना जिंदाबाद' च्या आरोळ्या हवेत उठल्या. जीना भाषण करू लागले आणि ते पहिलेच वाक्य म्हणाले ते असे, ''काँग्रेसवाले कहते है मुसलमान बेवकूफ है।''

जीनांचे आधीचे संतप्त उद्‌गार आमंत्रितांतील काही मुसलमानांनी ऐकले; त्या जनसमुदायाला काही ऐकू आले नाहीत. परंतु माईकवर जीनांनी जोराने ओरडून 'तुम सब मुसलमान बेवकूफ हो!' असे जरी सांगितले असते, तरी मुसलमानांनी ते भाषण शांतपणे ऐकले असते- नव्हे, त्यानंतर 'कायदे आझम जीना जिंदाबाद'च्या घोषणाही केल्या असत्या.

इतकी चमत्कारिक कडवी निष्ठा मुसलमानांत कशी निर्माण झाली, याचा विचार करूनही मला उलगडा झालेला नाही आणि तो विचार करणे एका अर्थाने व्यर्थही आहे. हिटलरवर जर्मनांची का निष्ठा होती? हिटलरने जर्मनीचा विनाश केला, असे वाटूनही त्याच्याविषयी आदर बाळगणारे काही जर्मन लोक अजून आहेत. त्याचप्रमाणे पाकिस्तानच्या निर्मितीनंतर आलेल्या एका वैफल्याच्या आणि नैराश्येच्या लाटेतही मुसलमान समाजात जीनांविषयी निष्ठा अद्यापही कायम आहे. या राजकीय प्रवाहापासून वेगळा राहिलेला माझ्यासारखा मनुष्य जेव्हा भेंडी बाजारातून वावरू लागतो, तेव्हा 'ट्रायल ॲट न्यूरेन्बर्ग'

चित्रपटातील अमेरिकन न्यायाधीशाप्रमाणे केसरबागेच्या मैदानात जीनांचा आवाज घुमत असलेला त्याला ऐकू येऊ लागतो. त्या आवाजाला, त्या मार्गदर्शनाला, त्या एकमुखी नेतृत्वाला आपण वंचित झालो असल्याच्या जाणिवेची उदासीनता तेथील मुसलमानांच्या चेहऱ्यावर पसरलेली त्याला दिसू लागते.

परंतु, काळाच्या गतीने आता तेथे काही बदल होऊ लागले आहेत. औद्योगिकीकरणाच्या एका प्रचंड प्रक्रियेने एकसंच मुसलमान समाजाचे विघटन सुरू झाले आहे. कामगारांचा, नोकरी करणाऱ्या पांढरपेशा सुशिक्षितांचा, श्रीमंत व्यापाऱ्यांचा आणि मुंबईच्या तथाकथित कॉस्मोपॉलिटन संस्कृतीचे वारे लागलेल्यांचा- असे वेगवेगळे समाजिक वर्ग मुसलमानांत निर्माण झाले आहेत. त्यांतील पाश्चात्त्य शिक्षणाचे वारे लागलेले कुलाब्यापासून मलबार हिलपर्यंत पसरलेल्या सुखवस्तू वस्तीत राहणे पसंत करतात. ते घरात काट्या-चमच्याने जेवतात. आपसांत (घरातून) इंग्रजी बोलतात. त्यांची मुले कॉन्व्हेंटमध्ये शिकतात. हे लोक कुठल्याही मुसलमान वस्तीत राहणे कमीपणाचे समजतात आणि आपण खरोखरीच कॉस्मोपॉलिटन झालो आहोत, असा स्वत:चा समज करून घेतात. कामगार कुठल्याही वस्तीत राहतो आणि तरीही आपल्या चाली-रीतींचे जतन करतो. पांढरपेशा वर्गाची मात्र कुचंबणा होत असते. तो आपल्या मुसलमान वस्तीतूनच राहत असतो (इतर वस्तींतून त्याला सहजासहजी जागा मिळतही नाही.) आणि आपल्या मुलांवर शिक्षणाचे, चांगल्या वागणुकीचे संस्कार करावेत, असे त्याला वाटत असते. शिक्षणाचे महत्त्व आपल्याला (म्हणजे मुसलमानांना) कळत नाही, म्हणून तो हळहळत असतो. कधी स्वत:ला, आपल्या मुलांना इतरांपासून अलग ठेवण्याचा तो प्रयत्न करतो.

परंतु, इतर सर्वसामान्य मुसलमानाला त्याची भीती वाटत नाही. तो मोहरमचा 'ताजा' तितक्याच उत्साहाने काढतो, गौसचे पंजे देहभान विसरून मिरवतो. सणासुदीला घरांना कसला तरी रंग फासतो. पैसे नसले तरी कर्ज काढून मुलांना नवी विजार आणि खमीस शिवतो. ईदच्या दिवशी गळ्यात रंगीबेरंगी रुमाल आणि कानात अत्तराचा फाया लावून आपल्या नातेवाइकांना आणि मित्रांना भर रस्त्यात 'ईद मुबारक' म्हणून कडकडून मिठी मारतो. धार्मिक

भेंडी बाजार, मुंबई



सोहळ्याच्या या उत्साहात नागरी रीति-रिवाजांना फारसे महत्त्व द्यायच्या भानगडीत तो पडत नाही!

भेंडी बाजार किंवा मदनपुरा अशांसारख्या वस्तींची तुलना न्यूयॉर्कमधील 'हार्लेम' या निग्रोंच्या वस्तींशी करता येणार नाही. हार्लेम हा अमेरिकेच्या सामाजिक जीवनाला मिळालेला शाप आहे. हार्लेममध्ये निग्रो मान ताठ करून चालतो. 'जिथे माझी सत्ता चालेल', असे त्याच्या वागण्यातून प्रतीत होत असते. तोच निग्रो गोऱ्या वस्तीत एक प्रकारच्या न्यूनगंडाने पछाडला जातो. मुसलमान मात्र कुठेही मुसलमान असल्याच्याच भावनेने वागतो आणि भेंडी बाजारात त्याची मान अधिकच ताठ होते! कारण त्याच्या धार्मिक कडवेपणातच त्याचे व्यक्तिमत्त्व सामावलेले असते. अमेरिकेतील 'ब्लॅक मुस्लिम' या जहालवादी निग्रो पंथाच्या उदयाचे मूळ या वस्तुस्थितीतच शोधले पाहिजे.

मुंबईतच आता एका विशिष्ट विभागांतच मुसलमान राहत नाहीत. मुंबईच्या वाढत्या पसाऱ्यात मुसलमान वस्त्यांची अनेक ठिगळे कोनाकोपऱ्यांत निर्माण झाली आहेत. अनेक ठिकाणी उभ्या राहिलेल्या गलिच्छ झोपडपट्ट्यांतील किमान अर्धे रहिवासी मुसलमान आहेत. मुसलमान समाजाच्या आर्थिक अवस्थेचे प्रतिबिंबच या वस्त्यांतून उमटून राहिलेले आहे.

एके काळी कोकणी मुसलमानांची संख्या (मुसलमानांमध्ये) मुंबईत सर्वांत जास्त होती. भेंडी बाजारचा डोंगरी विभाग किंवा वांद्र्याची नौपाडा वस्ती त्यांच्या आता एके काळच्या वस्त्यांच्या खुणा म्हणूनच शिल्लक उरल्या आहेत. परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे मुंबईत येऊ लागले, त्यांत परप्रांतीय मुसलमानही प्रचंड संख्येने येऊ लागले. बिहार, उत्तर प्रदेश, गुजरात व मलबार येथून आलेल्या मुसलमानांचाच आता मुंबईत गजबजाट झाला आहे आणि कोकणातला अथवा महाराष्ट्रातील मुसलमान शोधूनही सापडणे मुश्कील झाले आहे; आणि जे राहत आहेत, ते स्वत:चा वेगळेपणा गमावून बसले आहेत! त्यांनी स्वत:ची मराठी भाषा सोडून उर्दू आत्मसात केली आहे. उत्तर प्रदेशच्या मुसलमानांचे आचार-विचार, राहणी त्यांनी स्वीकारली आहे. मराठी मुलुखांतील कुणी मुसलमान भेटला, तरी ते त्याच्याशी शक्यतो मराठीतून बोलायचे टाळतात आणि माझ्यासारख्या एखाद्याने मराठीतून बोलायचा आग्रह धरलाच तर, 'अरे भाई, मियाँभाई मिलते है तब आपस में उर्दूमें ही बात करते हैं।' असे सांगून गप्प करण्याचा प्रयत्न करतात. गुजराती मियाँभाई मात्र त्यांच्याशी उर्दूतूनच बोलतो. त्यांच्या घरात गुजराती बोलली जाते, याचाही त्यांना सोइस्कर विसर पडलेला आहे.

हा प्रांतीय अथवा जमातीचा अलगपणा मुसलमान समाजात अद्यापही कायम राहिला आहे. खोजा, मेमन, बोहरी यांच्या मशिदीही वेगळ्या बांधलेल्या आहेत. (बोहऱ्यांच्या मशिदीत दुसरा कुणी नमाज पढत नाही आणि बोहरी दुसऱ्याच्या मशिदीत नमाजेला येणार नाही.) पूर्वीच्या 'इस्लामी' जगताचे प्रतिनिधी म्हणून क्रॉफर्ड मार्केटजवळील सुप्रसिद्ध जुम्मा मशिदीची, माहीमच्या मशिदीची व्यवस्था कोकणी मुसलमानांकडे राहिलेली आहे. ईदच्या दिवशी ते त्या मशिदीकडे नमाजेला वळतात. कारण त्यांच्या मजहबप्रमाणे (शाफी, हन्नफी इत्यादी) तेथे नमाज पढली जाते.

खोजा, मेमन आणि बोहरी या धंदेवाईक जमातींनी मुंबईच्या व्यापारी जगतात आपले स्थान निर्माण केले आहे. त्यातील खोजा व्यापाऱ्यांनी दाणा-बंदरच्या धान्याच्या व्यापारात आपला जम बसवला आहे, तर बोहऱ्यांनी कागद, ग्लास इत्यादी उद्योगांत एक प्रकारची मक्तेदारी प्रस्थापित केली आहे. फाळणीनंतर आलेल्या सिंधी जमातीने सर्वच प्रकारच्या व्यापारांत आपले बस्तान बसवले, त्याचा परिणाम या जमातीवर झाला आहे. प्रचंड भांडवली उद्योगधंद्यांचे एक नवे क्षेत्रच मुंबईत विकसित होऊ लागल्याने व्यापारातही आता मुसलमान मागे पडत चालला आहे, अशा प्रकारची तक्रार या जमातीकडूनच करण्यात येते. यातील बोहरी जमात राहणीने आणि आचाराने इतरांहून भिन्न तर आहेच, परंतु आपला अलगपणा कायम ठेवण्यसाठी ती सतत धडपडत असते. त्यांच्या स्त्रियांचा वेगळ्या पद्धतीचा बुरखा ही त्या अलगपणाची एक ढळढळीत निशाणी!

रांगा लावण्याची पद्धत मुंबईत युद्धकाळात अस्तित्वात आली. बसला रांग लावणे, हा मुंबईत एक सर्वमान्य प्रकार होऊन बसला. परंतु नागरी रीति-रिवाजाची फारशी तमा न बाळगणाऱ्या मुसलमान वस्तीत बसकरता रांग लावली जात नाही याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही! क्रॉफर्ड मार्केटपासून जे.जे.इस्पितळाच्या नाक्यापर्यंतच्या कुठल्याही बसस्टॉपवर बसकरता व्यवस्थित रांग लावलेली तुम्हाला दिसून येणार नाही. इथे माणसे बसस्टॉपवर घोळका करून उभी असतात आणि बस येताच आत जाण्याकरता एकच गर्दी करतात! त्या हाणामारीत बुरख्यातील स्त्रियाही तितक्याच जोरकसपणे भाग घेताना दिसतात. या विभागातील ड्युटीला बसचा मुसलमान कंडक्टरदेखील कंटाळलेला असतो. बेशिस्त जमावाला तोंड देताना त्याला

दिवसभर नकोसे होऊन जाते. या विभागातील प्रत्येक बसस्टॉपवर पाकिटमारांचे घोळके उभे असल्याचे त्याला माहीत असते. या बेशिस्तीचा फायदा घेऊन हे पाकिटमार मिळेल ती वस्तू मारतात आणि कधी कुणी सावध गिऱ्हाइकाने आरडाओरडा केलाच, तर चट्‌कन चाकू काढून त्याच्या छातीवर रोखतात!

'रामपुरी चाकू' नामक प्राणघातक शस्त्राची मुंबईत आयात रामपूरच्या मदनपुरा विभागात राहणाऱ्या मुसलमानांनीच केली!

सन १९२८-३० च्या सुमारास मुंबईत पठाणांची दादागिरी बोकाळली होती. ते सावकारी करत, तसेच दादागिरीही करत. रामपुऱ्यांनी त्यांना आपल्या चाकूचे पाणी दाखवून सळो की पळो करून सोडले. पठाणांनी दादागिरीचा धंदा सोडून फक्त सावकारी धंदा करायला सुरुवात केली आणि त्यांच्या दादागिरीचा वारसा रामपुऱ्यांनी उचलला. तो फार काळ टिकला नाही, परंतु त्यांच्या चाकूने मात्र मुंबईतल्या गुंडजगताला एक सर्वमान्य हत्यार मिळवून दिले. अशा प्रकारच्या दादांचा आणि गुंडांचा एके काळी मदनपुरा हा अड्डा बनला होता. तडीपार केलेले अनेक लोक पूर्वी मदनपुऱ्यात उघड वावरत असत. जवळच्या वेश्या-वस्तीमुळे वेश्यांचे दलाल आणि अफू, गांजा इत्यादी मादक पदार्थांचा धंदा करणारे या विभागात वावरत. आता त्यांचे प्रमाण कमी झाले असले, तरी रात्रीच्या वेळी एखादा फेरफटका मारल्यास गांजा भरलेल्या चिलमीचा फुटपाथवर बसून आस्वाद घेणारे तुम्हाला अद्यापही आढळतील.

मदनपुरा ही उत्तर प्रदेशच्या मुसलमानांची मुंबईतील वसाहत आहे. त्या वस्तीचे पूर्वीचे स्वरूप आता राहिलेले नाही. उत्तर प्रदेशचे हे मुसलमान वेगवेगळ्या विभागांतून आलेले आहेत. त्यातील अल्प सुशिक्षित तेवढे अस्खलित उर्दू बोलतात; बाकीचे सारे आपापल्या विभागातील पुरभी, उत्तरी, अवधी, मगधी, भोजपुरी इत्यादी हिंदीच्या बोलीतून बोलतात. 'इन्किलाब', 'उर्दू टाइम्स' इत्यादी उर्दू वर्तमानपत्रे ते वाचतात. ते गिरण्यांतून, कारखान्यांतून किंवा जवळच्या कापडाच्या मागावर काम करत असतात. ट्रेड युनियनचे राजकारण या विभागात चालत असते. ज्या पक्षांच्या कामगार संघटना असतात, त्या पक्षांना त्यांची निष्ठा वाहिलेली असते. उर्दूला मराठीप्रमाणेच राज्यभाषेचा दर्जा मिळाला पाहिजे, याकरिता याच विभागातून एखादा 'जुलूस' निघतो. फेरीवाल्यांच्या संघटनेसारख्या संघटनेचे मोर्चे येथीलच झूला मैदान नामक मैदानावरून निघत असतात आणि त्या मोर्चाचे रसभरीत वर्णन वाचण्यासाठी मग कधी कधी ते 'मराठा'सारखे मराठी वृत्तपत्र वाचताना (किंवा वाचून घेताना) आढळतात! उत्तर प्रदेशच्या समाजजीवनातील सारे स्तर या विभागात एकवटले गेले आहेत. त्यांत चर्मकार आहेत, न्हावी आहेत, धोबी आहेत आणि मागावर काम करणारे, कबीराचा वारसा सांगणारे अन्सारही आहेत! मात्र आपल्या या वस्तीत इतरांना (मुसलमानांनाही) ते ठरू देत नाहीत. मदनपुऱ्याला भेंडी बाजार लागून असला तरी त्याच्या या स्वभावाशी तो अजून जुळते घेत नाही. झूला मैदान आणि केसरबाग हे इवलेसे अंतर पार केले की, लागलीच हा बदल जाणवतो. मग 'डॉन', 'अन्जाम'सारखी पाकिस्तानी वृत्तपत्रे भेंडी बाजारच्या नाक्यावरील वृत्तपत्र एजंटकडे लटकलेली आपल्याला दिसून येतात.

गुमास्ता कायदा या विभागात अस्तित्वात नाही. इथली सलूने, हॉटेले आणि इतर दुकाने रात्री उशिरापर्यंत उघडी असतात. त्यांची सजावट वेगळी, भडक असते. येथील हॉटेले असंख्य आरश्यांनी व ट्यूबलाईटच्या दिव्यांनी रात्रीची झगमगून गेलेली असतात आणि दिवसभर चित्रपट-संगीत कर्णकर्कशपणे आपल्या कानांवर आदळत असते. इराणी हॉटेलवाला या विभागात अभावानेच दिसून येतो. कारण सकाळचा नुसता चहा-पाव खाऊन मुसलमानांचे कधी समाधान होत नाही. त्याला भरपूर नाश्ता हवा असतो म्हणून की काय, येथे चिलियांची हॉटेले आढळतात आणि त्या हॉटेलांमधून मोगलाई पद्धतीचे जेवण सर्रास मिळते. शीग हा भाजलेल्या गोमांसाच प्रकार याच विभागात रस्त्यांवर विक्रीकरता सर्रास ठेवलेला असतो.

हॉटेलमधून गोमांस सर्रास विकले जाते आणि घराघरांतून गोमांसाची विक्री करणारे लोक याच विभागात वावरत असतात. 'बडेका गोश सस्ता मिलता है' हे उत्तर तुम्ही थोडीशी चौकशी केल्यानंतर तुम्हाला देण्यात येते. बेकायदा गाई-म्हशींची कत्तल करून त्यांचे मांस विकणाऱ्या टोळ्या याच भेंडी बाजार-मदनपुरा विभागांत अस्तित्वात आहेत. हिंदूंच्या भावना दुखवाव्यात, म्हणून ते हा धंदा करीत नाहीत. एखाद्या ख्रिश्चनाने जितक्या सहजपणे हातभट्टीचा व्यवसाय करावा तितक्या सहजपणे त्यांनी हा व्यवसाय उचलला आहे आणि बोरिवली, घाटकोपरपासून कुलाब्यापर्यंत कुठेही त्यांनी आपल्या कार्याचा पसारा व्यापला आहे. अत्यंत कठोरतेने ते आपला उद्योग पार पाडतात. भटकणारी गुरे हे त्यांचे भक्ष्य. त्यांची 'मोडस

ऑपरेंडी' वाखाणण्यासारखी असते. दहा मिनिटांत ते एका गाईचा (अथवा म्हशीचा) सोक्षमोक्ष लावतात. शस्त्रक्रिया करणाऱ्या शस्त्रवैद्यालाही हेवा वाटावा एवढ्या कुशलतेने गुरे फाडतात, मांस अलग करतात आणि उरलेला भाग फेकून देतात. बरोबर बहुधा जीपसारखे एखादे वाहन बाळगतात. तिच्यात 'माल' टाकून ते क्षणार्धात नाहीसे होतात.

पाकिस्तानच्या निर्मितीनंतर सावकारी करणारे पठाण मुंबईतून काही काळ अदृश्य झाले होते; परंतु कालांतराने ते पुन्हा उगवले आणि आता मुंबईतील नाक्या-नाक्यावर त्यांचे अस्तित्व जाणवू लागले आहे. पठाणांकडून कर्ज घेणाऱ्या लोकांत या पठाणी सावकारीला 'पठाण बँक' असे विनोदाने संबोधले जाते. हे सारेच पठाण पुश्तु नाहीत. त्यांच्यात अफगाण पठाणांचाही प्रचंड भरणा आहे. शिवडीसारख्या ठिकाणी त्यांनी आपला अड्डा बनवला आहे. ते नमाज पढणे, रोजा पाळणे इत्यादी इस्लामी तत्त्वे काटेकोरपणे पाळतात; परंतु त्याचबरोबर निषिद्ध मानल्या गेलेल्या व्याजाच्या धंद्यावरच आपली उपजीविका करत असतात. अशा प्रकारचे धंदा करणारे सुमारे पाच हजार परदेशी पठाण मुंबईत विखुरलेले आहेत आणि त्यातील निम्मे-अधिक गुप्तपणे किंवा बेकायदा इथे राहिलेले आहेत.

मुसलमानांची वस्ती मुंबईत सर्वत्र विखुरली गेली आहे; त्याप्रमाणे मुसलमानांचे एकमुखी सामाजिक, राजकीय आणि धार्मिक जीवन भंग पावले आहे. पूर्वी 'झटका' पद्धतीने बकरे मारावे की नाही यावर (मुसलमानांत) वाद उद्‌भवत नसे. मुसलमान त्या प्रकाराविरुद्ध एकवटलेले आढळत, परंतु आता त्यावर वाद होतो. द्विभार्या-प्रतिबंधक कायदा, बुरख्याची पद्धत या बाबतीत आपसांत कडाक्याची चर्चा होते. पाकिस्तानी प्रवृत्तीचे समर्थक आणि विरोधक कडाक्याने राजकीय चर्चा करतात; इतकेच नव्हे, तर इस्लामच्या धार्मिक दृष्टिकोनातून त्या प्रवृत्तींचे पृथक्करण करू पाहतात. दाऊदी बोहऱ्यांच्या बड्या मुल्लांविरुद्ध प्रागतिक मंडळासारखी संस्था या मुंबईतच चळवळ उभारते.

अशा या मतामतांच्या गलबल्यातच राष्ट्रीय चळवळीत सारे जीवन घालवलेली आणि म्हणून मुस्लिम सामाजिक जगतापासून अलग पडलेली हॅरिस, फकी यांच्यासारखी माणसे एखाद्या अफाट महासागरात जेमतेम तग धरून राहिलेल्या इवल्याशा बेटाप्रमाणे वावरत असतात. इस्लामच्या पुनरुत्थानाच्या कार्याशी त्यांनी केलेला 'द्रोह' मुसलमान समाज अद्यापही विसरलेला नाही.

शौकतुल्ला नावाचा उत्तर प्रदेशाचा एक वृद्ध मला नेहमी भेटत असतो. हाही या राष्ट्रीय परंपरेतील माणसांच्या मालिकेतला. आता तो थकला आहे. काही वेळ झाल्यानंतर दम घेण्यासाठी तो रस्त्यातच थांबतो. गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीत त्याने उडी ठोकली, तेव्हापासून मांसाहार वर्ज्य केला. या साऱ्या गडबडीत त्याला लग्न करायचीही शुद्ध राहिली नाही! मुसलमान समाजापासून बहिष्कृत झालेला हा माणूस एखाद्या प्रचंड प्रवाहात धारेला लागल्याप्रमाणे कुठे तरी वाहत राहिला...

परंतु आता जराजर्जर झाला असला, तरी घालवलेल्या आयुष्याबद्दल त्याला कधी खेद वाटत असलेला मला दिसून आलेला नाही. त्याच्या डोळ्यांत ते पूर्वीचे दुर्दम्य निष्ठेचे पाणी अद्यापही चमकताना मला दिसते. गांधीजींच्या 'हरिजन' पत्राच्या प्रती विकणे, हा त्याचा एक आवडता उद्योग होता. 'हरिजन' बंद पडले, तेव्हा तो ढसाढसा रडला आणि मग काही वेळाने शांत झाला. तेव्हा मुसलमान समाजातील जातीयतेचा धिक्कार करताना उद्वेगाने समोरच्या टेबलावर जोराने हात आपटून म्हणाला, ''कंबख्त बदलते नहीं। अभी तक बदलते नहीं!'' एका सबंध समाजाचे प्रसंगी अतिरेकी वागणे हे कडव्या धर्मनिष्ठेचे प्रतीक असले, तर त्या समाजाविरुद्ध उभ्या ठाकणाऱ्या शौकतुल्लांसारख्यांच्या निष्ठेचे मूळ ह्या कडव्या धर्मप्रवृत्तींतच असले पाहिजे!

-आणि या मतामतांतल्या गलबल्यात भेंडी बाजारसारख्या मुसलमान वस्तीचे बेबंद जीवन सुरळीतपणे व्यतीत होते आहे. नव्या बदलाच्या खुणा जणू ते विसरण्याचा प्रयत्न करीत आहे. भेंडी बाजारचे हे प्रचलित स्वरूप आपल्या राष्ट्रीयत्वातील उणिवांचेच प्रतीक आहे; आपल्या राष्ट्रीयत्वाला गेलेल्या तड्याचे ते दुश्चिन्ह आहे.

नेहरूंनी एकदा मुसलमानांशी जनतासंपर्क जोडण्याची घोषणा केली होती. नेहरूंच्या अनेक घोषणांप्रमाणे तीही हवेत विरून गेली आणि मुसलमान इतर समाजापासून अलिप्तच राहिले. मुंबईच्या सर्व वस्त्यांत आता विखुरल्या गेलेल्या या समाजाचे अलिप्त जीवन आता हळूहळू संपुष्टात येत आहे. तो संपूर्णपणे नष्ट होईल आणि मुसलमान भारतीय जीवनात संपूर्णपणे सामावले जातील, तेव्हा राष्ट्रीय एकात्मतेचे भारताचे स्वप्न पुरे होईल. तोपर्यंत मात्र भेंडी बाजारसारखी मुसलमानांची वस्ती आपल्या राष्ट्रीयतेला गेलेल्या तड्याचीच जाणीव सतत देत राहणार आहे!

किर्लोस्कर मासिक : जुलै १९६५ (मुंबई विशेषांक)

लेख । हमीद दलवाई

# महाराष्ट्रीय मुसलमान



**‘मुसलमान मुलांच्या शिक्षणाचा हा खेळखंडोबा थांबवा आणि त्यांना मराठी माध्यमातून शिक्षण द्या’ अशा अर्थाचा एक लेख मागे मी ‘नवशक्ती’मध्ये लिहिला. तेव्हा ‘इन्किलाब’सारख्या उर्दू, जातीयवादी पत्राने मला ‘अस्तनीतला साप’ म्हणून संबोधावे, आणि रत्नागिरीतल्या ‘बलवंत’ या काँग्रेसवादी पत्राने मला जातीयवादी ठरवावे, याची संगती कशी लावायची? ‘इन्किलाब’ आणि ‘बलवंत’ची ही युती कोणत्या धोरणाची निदर्शक आहे, याचा सर्वसामान्य मुसलमान समाजानेच शांतपणे विचार केला पाहिजे.**

महाराष्ट्रातील मुसलमानांची मातृभाषा मराठी असून संस्कृती महाराष्ट्रीय आहे, असे प्रतिपादन करणारा कॉ.अमरशेख यांचा लेख फेब्रुवारीच्या ‘किर्लोस्कर’मध्ये प्रसिद्ध झाला आहे. आजच्या भाषिक आणि सांस्कृतिक जागृतीच्या काळात प्रसिद्ध झालेला हा लेख महत्त्वपूर्ण आहे; तथापि परिपूर्ण नाही. ‘आम्ही येथेच जन्मलो, येथेच वाढलो, इथली भाषा ही आमची भाषा आणि हा देश हा आमचा देश’ हा युक्तिवाद (तो कितीही बरोबर असला तरी) स्वातंत्र्याच्या चळवळीत अनेकदा करण्यात आला आणि विफल ठरला, ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रीय मुसलमानांत मराठी भाषा आणि संस्कृती यांविषयी जो एक परकेपणा आलेला आहे, तो केवळ प्राचीन परंपरेने आलेला नाही. भाषिक आणि सांस्कृतिक अलगपणा जो आलेला आहे तो राजकीय अलगपणाच्या, फुटीरपणाच्या प्रवृत्तीतून निर्माण झालेला आहे. राजकारणाचा भाग सोडला, तर आज भाषिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या मुसलमान एक प्रकारच्या अलगपणाच्या भूमिकेत वावरत आहेत. हा अलिप्तपणा नष्ट व्हावा असे वाटत असेल, तर आम्हा मुसलमानांच्या शैक्षणिक भूमिकेचा आधी विचार केला पाहिजे.

स्वातंत्र्याच्या काळापर्यंत आमच्या मुसलमान विद्यार्थ्यांना वेगळ्या उर्दू शिक्षणाची तरतूद करण्यात आली. इथल्या बहुजन समाजाशी असले-नसलेले सांस्कृतिक संबंध तोडण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करण्यात आला. उर्दू भाषेची वेगळी परंपरा निर्माण करण्यात आली. परंतु इथले संबंध आम्ही पूर्णपणे तोडू शकलो नाही, की मराठीशी फारकत करून घेऊन उर्दू पचवू शकलो नाही. आज तर मुस्लिम समाज या प्रश्नाकडे गोंधळलेल्या दृष्टीने पाहत आहे. आपली भाषा आणि आपली संस्कृतीच अखेर महाराष्ट्राच्या समाजजीवनातले आपले स्थान निश्चित करणार आहे, याची त्याला पुरती जाणीव झालेली नाही. इथल्या जीवनात रुळलेली मराठी समजल्याशिवाय गत्यंतर तर नाही आणि उर्दूविषयी अकारण निर्माण झालेल्या जिव्हाळ्याने तिला

बिलगण्याचा मोह तर आवरत नाही, अशी बहुसंख्य मुसलमानांची त्रिशंकू अवस्था झालेली आहे.

आमच्यातला आणि महाराष्ट्रातल्या बहुजन समाजातला हा अलगपणा स्वातंत्र्यानंतर नष्ट व्हावा आणि निदान भाषिक दृष्ट्या तरी मुसलमान इथल्या जीवनात मिसळून जावा, असे प्रयत्न पुन्हा करण्यात आले. परंतु मुस्लिम बहुजन समाजांत अनेक वर्षांच्या शिकवणुकीमुळे मराठी भाषा आणि संस्कृती यांविषयी एक प्रकारचा परकेपणा निर्माण झालेला असल्यामुळे या बदलास साहजिकच विरोध झाला. रत्नागिरी जिल्ह्यातल्या परिस्थितीची इथे सविस्तर माहिती देणे अप्रस्तुत ठरणार नाही.

रत्नागिरी जिल्हा स्कूल बोर्डाने स्वातंत्र्यानंतर बदललेल्या काळास अनुसरून मुसलमान विद्यार्थ्यांना मराठी माध्यमांतून शिक्षण देण्याचा एक ठराव मंजूर केला. परंतु स्कूल बोर्डातल्या मुसलमान सभासदांनी याला कडाडून विरोध केला. रत्नागिरी शहरात याच सुमारास एक उर्दू विकास मंडळ स्थापन करण्यात आले आणि त्यामार्फत स्कूल बोर्डाच्या प्रस्तावाचा निषेध तेव्हाचे शिक्षणमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांच्याकडे करण्यात आला. स्कूल बोर्डाचे शैक्षणिक अधिकार कमी करण्याच्या सरकारच्या धोरणानुसार, सरकारने प्राथमिक शिक्षणाची सूत्रे आपल्या हाती घेतली आणि स्कूल बोर्डाचा ठराव तसाच खुंटीला टांगला गेला.

स्कूल बोर्डाच्या या ठरावाच्या अनुषंगाने श्री. अप्पासाहेब पटवर्धन यांनाही मुस्लिम विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची एक योजना सुचविली होती. मुस्लिम विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे माध्यम मराठी असावे आणि एक जादा भाषा म्हणून त्यांना उर्दू देण्यात यावी, असे त्या योजनेचे (स्कूल बोर्डाचा ठरावदेखील असाच होता.) स्वरूप होते. सरकारचे धोरणदेखील अप्पासाहेबांच्या योजनेप्रमाणे असेल असे, मुस्लिम विद्यार्थ्यांना शिक्षणाचे माध्यम मराठी असावे असे प्रयत्न करणाऱ्या आमच्यासारख्यांना वाटत होते.

परंतु, मुंबई सरकारने आपले पूर्वीचे वेगळेपणाचे धोरण चालू ठेवले; इतकेच नव्हे, तर त्यात अधिक भर घालण्यात आली! पूर्वी मराठी माध्यमातून शिकणाऱ्या मुसलमान मुलाला एक जादा भाषा म्हणून उर्दूची सोय केलेली होती. आता ती बंद करण्यात येऊन उर्दू माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या मुलाला मात्र एक भाषा म्हणून मराठी शिकण्याची व्यवस्था करण्यात आली. याचा परिणाम असा झाला की, उर्दूशी असलेला आपला संपर्क तुटेल, या भीतीने मराठी माध्यमांतून आपल्या मुलांना शिक्षण देण्याचे मुसलमान पालकांनी बंद केले. चाळीस मुलांच्या पालकांनी मागणी केल्यास उर्दू शाळा देण्यात येईल, या धोरणानुसार उर्दू शाळांच्या मागण्या भराभर करण्यात आल्या. शाळांच्या भराभर फाळण्या झाल्या आणि सर्वच मुले उर्दू माध्यमातून शिक्षण घेऊ लागली.

चाळीस मुलांच्या पालकांनी उर्दू शाळेची मागणी केल्यास त्यांना उर्दू शाळा द्यावी, हे धोरण कोणत्या तत्त्वास धरून आखण्यात आले? या चाळीस मुलांच्या पालकांच्या मागणीचा निकाल कोणत्या न्यायाने लावण्यात आला? महाराष्ट्रातल्या- विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यातल्या- मुसलमानांची मातृभाषा उर्दू आहे, असे सरकारला म्हणावयाचे आहे काय?

आम्ही मुसलमान महाराष्ट्रात धार्मिक दृष्ट्या अल्पसंख्य असलो तरी भाषिक दृष्ट्या अल्पसंख्य नाही, हे आमच्या निधर्मी सरकारला सांगण्याची वेळ यावी हे दुर्दैव आहे! भिन्नधर्मीय लोक एकभाषिक असू शकतात आणि एकाच धर्माच्या लोकांची मातृभाषा वेगवेगळी असू शकते. मुसलमान धर्माने भिन्न असले तरी भाषिक दृष्ट्या वेगळे नाहीत, हे सांगण्याची आवश्यकता नाही. आणि समजा, एखादे मुसलमान कुटुंब पूर्वी कधी काळी अगदी थेट अरबस्तानातून आले असले, तरी त्याला इथल्या प्रादेशिक भाषेतूनच शिक्षण दिले गेले पाहिजे; कारण पिढ्यान् पिढ्या तो महाराष्ट्राच्या भूमीत आता रुतून गेला आहे.

आम्हा मुसलमानांची धर्मभाषा काही उर्दू नव्हे, ती अरबी आहे. आमची काही धार्मिक पुस्तके उर्दूतून आहेत, हे खरे आहे; पण त्यामुळेच शिक्षणाचे माध्यम म्हणून उर्दूची मागणी मान्य करून कसे चालेल? बहुसंख्य हिंदू लोकांचे सगळे धर्मग्रंथ संस्कृतात आहेत, महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या ज्यू धर्मीय लोकांचेदेखील हिब्रू भाषेत आहेत, म्हणून सरकार त्या-त्या जमातीच्या धार्मिक शिक्षणाची कोणती सोय करते? मग मुसलमानांच्या धार्मिक शिक्षणाची तरतूद करण्याची काळजी आमच्या निधर्मी सरकारला का वाटावी? आणि आज उर्दूतून शिक्षण घेत असलेल्या मुस्लिम विद्यार्थ्यांची मातृभाषा कोणती ठरवायची? त्यांचे आई-बाप आणि आई-बापांचे आई-बाप यांच्या भाषेवरून जर मातृभाषा ठरवायची, तर ती मराठी ठरवावी लागेल. या अगोदरच्या पिढीला उर्दूचे अगदीच मामुली ज्ञान आहे. त्यांचा घरचा व्यवहार, व्यापारी जमाखर्च आणि पत्रव्यवहार सगळा मोडीतून होतो; परंतु गेल्या सार्वत्रिक

नोंदणीत तो विद्यार्थी अथवा पालक सांगतील ती मातृभाषा (म्हणजे उर्दू) लावण्यात आली आहे (कारण मुलगा उर्दू शाळेत जातो.)! खुद्द माझ्या घरातली स्थिती सर्वांत अधिक केविलवाणी आहे! माझी मातृभाषा मराठी नोंदवली गेली आहे आणि माझ्या धाकट्या भावाची (तो उर्दूतून शिक्षण घेत असल्याने) उर्दू नोंदवली गेली आहे!

उर्दूतून शिक्षण घेत असलेली ही मुले पुढे मराठी माध्यमांतून दुय्यम शिक्षण घेऊ शकत नाहीत. जिल्ह्यात एखाद्या ठिकाणी असलेल्या उर्दू हायस्कूलमध्येही ती जाऊ शकत नाहीत. अखेर शिक्षणाला रामराम ठोकण्यातच याची परिणती होते. अशाने मुस्लिम समाज कायमचाच अज्ञानाच्या अंध:कारात खितपत राहणार आहे!

मुंबई सरकारच्या शैक्षणिक धुरीणांना या गोष्टी कळत नाहीत, असे कसे म्हणायचे? परंतु सरकारचे हे धोरण केवळ संधिसाधू आहे, राजकीय धूर्तपणे आखलेले आहे. मुसलमानांचे हितकर्ते आपणच आहोत– सरकारचे धोरणच मुसलमानांच्या कल्याणाचे आहे, असा भ्रम मुसलमानांत निर्माण करण्याचे आहे– आणि तात्पुरते व अंतिम असे दोन परिणाम यातून उद्‌भवणारे आहेत. सध्या मुसलमानांचा भरघोस पाठिंबा आणि मते मिळतात, हा तात्पुरता परिणाम आणि अंतिम परिणाम म्हणजे, मुस्लिम समाज इथल्या स्थानिक जीवनापासून कायमचाच अलग पाडण्यात होईल, होतो आहे– त्याला इथल्या जीवनापासून, भाषेपासून वंचित करण्यात येणार आहे.

मुस्लिम समाजातल्या एका जमातवादी गटाला हेच हवे आहे. स्वातंत्र्यातही या जमातवादी प्रवृत्तीला गोंजारण्याचे चाललेले हे प्रयत्न पाहून माझ्यासारख्यांचे अंत:करण व्यथित होते. ‘मुसलमान मुलांच्या शिक्षणाचा हा खेळखंडोबा थांबवा आणि त्यांना मराठी माध्यमातून शिक्षण द्या’ अशा अर्थाचा एक लेख मागे मी ‘नवशक्ती’मध्ये लिहिला. तेव्हा ‘इन्किलाब’सारख्या उर्दू, जातीयवादी पत्राने मला ‘अस्तनीतला साप’ म्हणून संबोधावे, आणि रत्नागिरीतल्या ‘बलवंत’ या काँग्रेसवादी पत्राने मला जातीयवादी ठरवावे, याची संगती कशी लावायची? ‘इन्किलाब’ आणि

उर्दूतून शिक्षण घेतलेली ही मुले पुढे...?



'बलवंत'ची ही युती कोणत्या धोरणाची निदर्शक आहे, याचा सर्वसामान्य मुसलमान समाजानेच शांतपणे विचार केला पाहिजे. या धोरणाने स्वत:चा फायदा होते आहे की नुकसान होत आहे, याचा विचार झाला पाहिजे.

सत्ताधारी पक्षाच्या धोरणाचा अर्थ उघड आहे. मुसलमान समाजाच्या समुदायवृत्तीचा फायदा घेण्याची वृत्ती याच्या मुळाशी आहे. सरकारच्या देशव्यापी धोरणाचाच तो एक भाग आहे. बेल्लारीचे भवितव्य ठरवताना तिथल्या मुसलमानंचे वेगळे मत का अजमावण्यात आले? सरकारच्या या धोरणामुळे आता आंध्रातला आमचा तेलुगू भाषक मुसलमानही उर्दूची मागणी करू लागला आहे.

हे सर्व विस्ताराने लिहिण्याचे कारण इतकेच की, मुसलमान इथल्या भाषेशी, संस्कृतीशी एकरूप व्हावा; स्थानिक समाजजीवनाशी तो समरस व्हावा, असे इच्छिणाऱ्या आणि त्याप्रमाणे प्रयत्न करणाऱ्या मुसलमान तरुणांच्या मार्गात सत्ताधाऱ्यांचे हितसंबंध हीच एक मोठी आडकाठी होऊन बसली आहे!

सरकारचे हे धोरण आता बदलले पाहिजे. महाराष्ट्रातल्या मुसलमानाला मराठी भाषेविषयी, मराठी संस्कृतीविषयी जिव्हाळा वाटावा असे वाटत असेल; तर त्याच्या शिक्षणाचे माध्यम मराठी ठेवले पाहिजे. महाराष्ट्राचा इतिहास विकृतपणे उर्दूतून शिकवला जाण्याने मराठी इतिहासाविषयी इथल्या मुसलमानाला प्रेम वाटेल काय? यासाठी सर्वत्र सक्तीचे मराठी माध्यम करून एक जादा भाषा म्हणून सरकारने उर्दू शिकवण्याची व्यवस्था करावी. शैक्षणिक स्वरूपाविषयी आज सर्वत्र एक प्रकारची जागृती आलेली आहे. शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्नही विद्वानांत चर्चिला जात आहे. अशा वेळी या जिव्हाळ्याच्या प्रश्नात महाराष्ट्रांतील बहुजन समाजानेही लक्ष घातले पाहिजे. सरकारने आपले हे शैक्षणिक धोरण बदलावे म्हणून दडपण आणले पाहिजे.

सरकारचे धोरण जरी जाणूनबुजून चुकीचे असले, तरी आम्ही मुसलमानांनीच आता खरे आत्मपरीक्षण करण्याची वेळ आलेली आहे. सरकार चुकते, असे म्हणून आमची जबाबदारी टळत नाही; आमच्या चुका लपल्या जात नाहीत. गेल्या अनेक वर्षांच्या सततच्या शिकवणुकीने का होईना; मराठी भाषेशी, संस्कृतीशी आणि प्राचीन परंपरेशी आम्ही कायमची फारकत मिळवू शकतो का? उर्दू आमच्यात पूर्णपणे रुळली का? उर्दूमय झालेल्या आमच्या या तरुणांचे उद्याच्या महाराष्ट्रातले स्थान कोणते राहील, याचा तरी आपण शांतपणे विचार करू या. उर्दूच्या अर्धवट ज्ञानाने आणि भोवतालच्या दैनंदिन जीवनातल्या मराठीच्या सरावाने जी भाषा उर्दू म्हणून बोलली जाते, ती पूर्णपणे धेडगुजरी असते. पुढील काही नमुने पाहण्यासारखे आहेत- ''मुजे जानाच चाहिये'', ''वो आदमखान मऱ्या'', ''तुम इदर काय कू आया?'' इत्यादी. कोकणातल्या मुसलमानांच्या जीवनात मोडी लिपीसकट मराठी मुरली आहे. घरात बोलली जाणारी बोली कोकणी असते. उर्दूशी तिचा काही संबंध नसतो.

भाषा, रीति-रिवाज, परंपरा, चाली-रीती, पेहराव या सगळ्या गोष्टींचा विचार केला; तर आमच्या परंपरा कोणत्याच बाबतीत भिन्न नाहीत, हे दिसून येईल. लग्नप्रसंगी आमच्यात जी गीते गायली जातात, त्यात पीरांच्या उल्लेखाबरोबर नजीकच्या परशुरामाचादेखील उल्लेख आहे! लग्नाच्या चाली-रीतीत तर इथल्या बहुजन-समाजाच्या चालीरीतींचा फार मोठा प्रभाव आहे आणि यात वेगळे, वाईट असे काहीही नाही. महाराष्ट्रातल्या मुसलमानाचा पेहरावही काही वेगळा नाही. क्वचित आढळणाऱ्या फेझ टोप्या सोडल्या; तर खाली धोतर, अंगरखा आणि वर फेटा असला अस्सल मराठी पोशाख आमच्याकडचा मुसलमान घालतो. बायकांच्या गळ्यात मंगळसूत्र असते अणि काही ठिकाणी कुंकू लावणाऱ्या मुसलमान स्त्रियाही मी पाहिल्या आहेत. लग्नाच्या आणि गरोदरपणाच्या वेळी ओटीत नारळ देण्याची प्रथा काही मुसलमानी नाही! कुठल्याही गावात गावच्या देवीला पीराइतकाच मान देण्यात येतो आणि अनेक प्रयत्न करूनही तो अजून नष्ट करता आला नाही! मागे लीगच्या ऐन चळवळीच्या वेळी गावच्या देवीला नारळ देऊ नये, असा प्रयत्न काही तरुणांनी आमच्या गावात केला. परंतु पुरुषांच्या नकळत बायकांनी देवीला नारळ पोचते केल्याचे मला माहीत आहे! गेल्या पन्नास वर्षांत आमच्या गावात गोहत्या घडलेली नाही. पुष्कळसे तरुण गोमांस खातात, परंतु आमच्या बायका ते घरात शिजवायलाही तयार होत नाहीत! मुसलमान व्यापाऱ्याच्या जमाखर्चाच्या वह्या दिवाळीत बदलतात- मोहरमपासून व्यापारी वर्ष मोजण्याची प्रथा महाराष्ट्रीय मुसलमानांत क्वचितच दिसून येते. या सगळ्या परंपरा, हे संस्कार शुद्ध मराठी आहेत. कदाचित यांत श्रद्धेचाही भाग असेल (तो आहेच.) ही श्रद्धा उडवणे फक्त बुद्धिवादानेच शक्य होईल. अनेक वर्षांचे संस्कार नष्ट करणे फक्त बुद्धिवादाला शक्य आहे. परंतु जेव्हा ते शक्य होईल, तेव्हा देवीलाच नारळ देणे बंद होणार नाही- कशालाच न मानण्याची वृत्ती निर्माण होईल!

अनेक वर्षांच्या शिकवणुकीनेही जर आपण या परंपरा नष्ट करू शकलो नाही, तर मग वेगळेपणाचा, अलिप्तपणाचा प्रयोग आपण किती दिवस करत राहणार? आता आपण उलट दिशेने आपल्या प्रयोगाला सुरुवात केली पाहिजे. वेगळेपणाच्या परंपरा वाढवण्याऐवजी एकमेकांशी संबंधित असलेल्या परंपरेच्या जोपासनेचे प्रयत्न केले पाहिजेत.

हे करायचे, तर आपल्याला आपले शैक्षणिक धोरण आधी बदलले पाहिजे. फुटीरपणाच्या शिकवणुकीमुळे इथल्या बहुजन समाजाच्या आणि मराठी भाषेच्या द्वेषावर पोसला गेलेला–वाढलेला एक पुढारीवर्ग आमच्या समाजात निर्माण झाला आहे. सर्वसामान्य मुसलमान समाज अज्ञ, अजागृत राहिल्यामुळेच या वर्गाचे पुढारीपण टिकून राहत असल्याने तो नेहमी सबंध समाजाला चुकीचा मार्ग दाखवतो. इतकेच नव्हे, तर स्थानिक जीवनाशी समरस व्हावे असे इच्छिणाऱ्या नि त्याप्रमाणे प्रयत्न करणाऱ्या मुस्लिम तरुणांविरुद्ध लोकमत भडकावण्याचाही सतत प्रयत्न करण्यात येतो. परंतु यामुळे आलेली कटुता विसरून जाऊन, इथल्या बहुजन समाजावर अथवा सरकारवर विसंबून न राहता मुस्लिम बहुजन समाजाला या धोरणाचा अंतिम परिणाम समजावून देण्याचा प्रयत्न आम्ही मुस्लिम तरुणांनीच केला पाहिजे. असे प्रयत्न आपण केल्यास महाराष्ट्रातला बहुजन समाज आपल्याला खचित सहकार्य देईल. मुस्लिमांनी आपल्यात सामावून जावे, असेच त्यालाही वाटते. आपले स्वागत करायला तो तयार आहे– नव्हे, उत्सुक आहे!

आजचा सर्वसामान्य मुस्लिम तरुण गोंधळलेला आहे. उद्याच्या महाराष्ट्रातील आपले स्थान कोणते, याची त्याला निश्चिती वाटत नाही. उदासीनतेच्या पोटी आलेला हा अलिप्तपणा नष्ट व्हावा असे वाटत असेल, तर आधी आपण आपल्या मराठी भाषेशी, संस्कृतीशी, इतिहासाशी आणि परंपरेशी समरस होऊ या. आपली मातृभाषा आपण आत्मसात करू या. उर्दू शिकायचीच असेल, तर कोणी आपल्याला प्रतिबंध केलेला नाही. उर्दूच काय, पण भारतातल्या आपल्या इतर भाषाभगिनींचाही मुसलमानांनी अभ्यास करावा, त्यात पारंगतता मिळवावी, असे मी म्हणेन!

उर्दूचे प्रस्थ आपण किती ठेवायचे याचाही आता विचार झाला पाहिजे. भारतात कुठल्याही प्रदेशाची भाषा म्हणून उर्दूला स्थान राहिलेले नाही. लखनऊ हे उर्दूचे केंद्र समजले गेले; परंतु तिथेही तिला एक प्रादेशिक भाषा म्हणून मान्यता नाही. यामुळे उर्दूच्या अस्तित्वालाच एक प्रकारचे आव्हान दिले गेल्यासारखे आहे. उर्दूची लिपी बदलली आणि देवनागरी लिपीचा तिने स्वीकार केला, तरच एक भाषा म्हणून भारतात ती तग धरू शकेल. तसे झाल्यास राष्ट्रभाषा म्हणून हिंदी शिकल्याने उर्दूचा आपोआपच सराव होऊ शकेल. परंतु सध्याची परिस्थिती कायम राहिल्यास उर्दू शिक्षण मुसलमान तरुणांच्या चरितार्थाचा प्रश्न सोडवू शकत नाही. अशा स्थितीत नोकऱ्या मिळण्यास आणि वेगवेगळ्या क्षेत्रांत पारंगतता मिळण्यास स्थानिक भाषेच्या अभावी आपण नालायक ठरलो, तर सरकारला अथवा बहुजन समाजाला दोष देणे योग्य ठरेल काय?

आपल्या धार्मिक शिक्षणाचा सवाल आपण उपस्थित करणार असू, तर तोही एक प्रकारे चुकीचा ठरेल. बंगाली मुसलमानाला बंगालीमधून धार्मिक शिक्षण मिळू शकते, बोहरी व गुजराती मुसलमान कुराण व तरतीब यांसारखी धार्मिक पुस्तके गुजरातीतून वाचू शकतात; मग महाराष्ट्रीय मुसलमानाला मराठीतून ती वाचण्याची अडचण का वाटावी? श्री.सय्यद अमीनसारख्यांनी 'इस्लाम आणि संस्कृती'सारखी पुस्तके मराठीत लिहिल्यामुळे उलट अरबी न समजणाऱ्या मुसलमानांचा फायदाच झाला आहे. या गोष्टी आम्ही सामान्य मुसलमानाला समजावण्याच्या प्रयत्न केला पाहिजे.

इथल्या सामाजिक जीवनात पूर्णपणे समरस व्हायचे असेल, तर आजची त्रिशंकू अवस्था आपल्याला आता सोडली पाहिजे. स्थानिक जनतेशी असलेले आपले सांस्कृतिक संबंध आपण अधिकच दृढ केले पाहिजेत. इथल्या परंपरांचे जतन करून आपण खऱ्याखुऱ्या अर्थाने महाराष्ट्रीय म्हणून ओळखले जाऊ या. मराठी सारस्वताचा आपला व्यासंग आपण वाढवू या. तुकारामाचे अभंग आपल्या ओठांवर खेळवू या. ज्ञानेश्वरीच्या अध्यायांची आपण पारायणे करू या. समर्थांच्या दासबोधाचे मर्म आपण समजावून घेऊ या. मराठी शाहिरांच्या वीररसाने आपण रोमांचित होऊ या. हे साहित्य–भांडार केवळ हिंदूंचे नाही, आपलेही आहे. मराठी सरस्वतीच्या अंगावरची ती बहुमोल लेणी आहेत.

बदलता कालप्रवाह ओळखून आजचा मुस्लिम समाज आता महाराष्ट्राशी समरस होण्याची वाट शोधीत आहे. पूर्वीचे संस्कार त्याला बिचकावीत आहेत. अशा वेळी आपण तरुणांनी त्याला साह्य केले पाहिज. महाराष्ट्रातला मुस्लिम तरुण हा नवा दृष्टिकोन स्वीकारील, याबद्दल मला शंका वाटत नाही!

('मौज' साप्ताहिक : ११ एप्रिल १९५४)

**लेख** । हमीद दलवाई

# भारतीय मुसलमानांचे अंतरंग



प्रथम आपल्याला पाकिस्तानच्या बाबतीत खंबीर धोरण स्वीकारावे लागेल. खंबीर धोरण ठेवणे याचा अर्थ, पाकिस्तानच्या सहकार्याच्या कृतीला प्रतिसाद न देणे असा मात्र नव्हे. जिथे जिथे सहकार्याचा प्रसंग येईल तिथे सहकार्य करणे; त्याचबरोबर पाकिस्तानला काश्मीरसकट कोणत्याही सीमेवर खंबीरपणे रोखून धरणे, असे धोरण आपल्याला दीर्घ काळ आखावे लागेल. कारण भारत-पाक संघर्ष नजीकच्या भविष्यकाळात संपणार असल्याची भोळसर अपेक्षा बाळगून कोणतेही पाऊल टाकणे चूक ठरेल. आपल्याला निदान ५०/७५ वर्षे या युद्धाला तोंड द्यावे लागणार आहे, ही खूणगाठ मनाशी बाळूगन वागावे लागणार आहे.

**भा**रतीय स्वातंत्र्यलढ्यात सर्व जमातींचे लोक सहभागी झाले होते, असे म्हणता येणार नाही. तथापि अल्पसंख्याकांतील बऱ्याचशा जमाती कदाचित स्वातंत्र्यचळवळीपासून अलिप्त राहिल्या असतील; मात्र त्यांनी स्वातंत्र्यलढ्याला विरोध करण्याचे पाप क्वचितच केले. मुस्लिम जमातीने मात्र स्वातंत्र्य मिळणे याचा अर्थ हिंदूंच्या हातात सत्ता जाणे असा अर्थ लावला आणि स्वातंत्र्यलढा हा हिंदूंचा लढा आहे, अशी स्वातंत्र्यलढ्याची व्याख्या केली.

याची कारणे स्पष्ट होती. आपण या देशात अल्पसंख्य आहोत, ही जाणीव भारतीय मुसलमानांना झाली होती. आपण अल्पसंख्य असल्याची जाणीव जगातील साऱ्याच मुस्लिम अल्पसंख्य असलेल्या देशांतील मुसलमानांना आहे, हे येथे आपण लक्षात घेणे आवश्यक आहे. मुसलमान अल्पसंख्य असलेले देश तसे फार नाहीत. इथिओपिया, सोव्हिएट रशिया, युगोस्लाव्हिया या काही देशांत मुसलमान अल्पसंख्याक आहेत. यातील सोव्हिएट रशियातील परिस्थितीचे अखंड भारतातील परिस्थितीशी काहीसे साम्य आहे. अखंड भारतात मुसलमानबहुल सुमारे पाच-सहा घटक राज्ये होती. सोव्हिएट रशियातही मुस्लिम पाच घटक राज्ये आहेत. तथापि, दोन्ही राष्ट्रांतील या इस्लामीकरणाच्या प्रक्रिया अतिशय वेगळ्या आणि म्हणून महत्त्वाच्या आहेत. भारतात मुस्लिम आक्रमणाच्या आणि सत्तेच्या प्रक्रियेतून इस्लामीकरणाची प्रक्रिया निर्माण झाली. दीर्घ काळच्या मुस्लिम सत्तेमुळे येथील मुस्लिम समाजाला सतत सवलती आणि संरक्षण मिळाले. सत्तेचे हे छत्र होते तोवर या जमातीला अल्पसंख्य असल्याची जाणीव होत नव्हती. इथे ब्रिटिश आले नसते आणि मोगलराजे राहिले असते, तरी ही जाणीव निर्माण झाली नसती. परंतु लोकशाही राजवटीची मागणी बहुजन समाजाने केली असती, तर मुसलमानांनी तिला तीव्र विरोध केलाच असता. थोडक्यात, समान संधीच्या आणि नागरिकांच्या चौकटीत

अल्पसंख्याक म्हणून राहावयास मुसलमानांच्या मानसिक विरोध होता आणि तो विरोध अद्यापही कायम राहिला आहे. पाकिस्तानची चळवळ आणि निर्मितीही अल्पसंख्याक म्हणून राहावयास मान्यता न देण्याचाच प्रकार होता. तथापि त्याची परिणती मुसलमान येथे अधिकच अल्पसंख्य होण्यात झाली! (अखंड भारतातील मुसलमानांचे प्रमाण २४.७ टक्के होते, सध्या भारतात ते १२ टक्के आहे.)

सोव्हिएट रशियातील मुस्लिमबहुल प्रदेश हा झारच्या राजवटीने जिंकून घेतला. तिथे इस्लामीकरणाची प्रक्रिया आधीच होऊन चुकली होती. नव्या राजवटीला (किंवा परक्या राजवटीला) आधी मुसलमानांनी प्राणपणाने विरोधही केला. बुखाराच्या खेदिलने जिहादची घोषणाही दिली होती, परंतु झारशाहीने हा प्रतिकार निष्ठूरपणे मोडून काढला. रशियात क्रांती झाली, तेव्हा मुसलमान या नव्या परिस्थितीशी जुळते घेण्याच्या मन:स्थितीपर्यंत येऊन पोहोचले होते! क्रांतीमुळे त्यांना काहीच गमवावे लागले नाही! कदाचित कम्युनिझमच्या निरीश्वरवादी तत्त्वज्ञानाला त्यांचा विरोध झाला असेल; परंतु साऱ्या कम्युनिस्ट-विरोधकांना जसे चेचून काढण्यात आले, तसे या मुस्लिम कम्युनिस्टविरोधकांनाही चेचून काढण्यात आले. फुटीरपणाच्या चळवळी दडपून टाकण्यात आल्या आणि आधुनिकीकरणाची एक प्रचंड प्रक्रिया या प्रदेशातही सुरू करण्यात आली.

त्याचबरोबर या प्रदेशात रशियनांची वसाहतही सुरू झाली. ह्या वसाहत करण्याच्या धोरणामुळे लोकसंख्येच्या स्वरूपात हळूहळू बदल करण्यात आला. हा बदल अद्याप होतोच आहे. थोडक्यात, लोकशाहीच्या आणि मूलभूत स्वातंत्र्याच्या चौकटीतील समान नागरिकत्वाला रशियातील मुसलमानांनी अल्पसंख्याक म्हणून विरोध केलाही असता; त्यांना तशी संधी देण्यात आली होती. (काश्मिरात भारतातील नागरिकाला स्थायिक होता येत नाही, हे या संदर्भात आठवल्याखेरीज राहत नाही!)

इथिओपियात या मानसिक संघर्षाला आता आरंभ झाला आहे. इथिओपियातील मुस्लिम अल्पसंख्याकाचा प्रश्न हा भारतातील मुस्लिम अल्पसंख्याकाच्या पद्धतीने सोडवण्यात

स्वातंत्र्यपूर्व काळातील सभेला आलेला जनसमुदाय : हैदराबाद



यावा, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय इस्लामिक नियतकालिके करू लागली आहेत. सोमालिया आणि इथिओपिया यांच्यामधील सीमा-संघर्ष हा इथिओपियातील मुसलमानांच्या या मानसिक अवस्थेचेच प्रतीक आहे. अल्पसंख्याक म्हणून ते इथिओपियात राहावयास तयार नाहीत. त्यांना इथिओपियाची विभागणी व्हायला पाहिजे आहे. बहुसंख्य मुस्लिम असलेल्या सोमालियात राहावयाची त्यांची तयारी आहे!

युगोस्लाव्हियाचा इतिहास थोडा वेगळा आहे. मुस्लिम राजवट तिथे दीर्घ काळ कधी स्थिर झाली नाही. ख्रिश्चन आणि मुस्लिम सत्ताधीशांची रस्सीखेच या प्रदेशात सतत होत राहिली. हा प्रदेश ख्रिश्चन आणि मुस्लिम सत्ताधाऱ्यांच्या हातात सतत येत-जात राहिला. परिणामत: तेथील मुस्लिम नागरिकांत निश्चित निष्ठा निर्माण झाल्या नाहीत. दुसरे असे की, शेजारी जवळच धर्माधिष्ठित बहुसंख्याक मुस्लिम देश अस्तित्वात नाही; या भौगोलिक वस्तुस्थितीचाही युगोस्लाव्हियातील मुस्लिम मनोवृत्तीवर परिणाम झालेला आहे. त्यामुळे अल्पसंख्याक असल्याची तीव्र भावना युगोस्लाव्हियातील मुसलमानांत तेवढीशी आढळत नाही; तशी ती नसेल, असेही प्रतिपादन अर्थात येथे मला करायचे नाही. भारतीय मुसलमानांचे अंतरंग समजावून घेण्यासाठी ही ऐतिहासिक आणि भौगोलिक वस्तुस्थिती आपण विचारात घेणे अगत्याचे आहे.

भारतात राहणाऱ्या मुसलमानांनी पाकिस्तानच्या मागणीला का पाठिंबा दिला? पाकिस्तान हे त्यांच्या इस्लामिक राष्ट्रविषयक आकांक्षेचे प्रतीक बनले म्हणून! कारण इस्लाम हे एक राष्ट्र आहे, ही भावना भारतीय मुसलमानांच्या मनात सखोल रुजून बसली होती. खिलाफत चळवळीच्या रूपाने तिचा एकदा उद्रेक झाला. त्या आकांक्षांची परिणती पाकिस्तानच्या निर्मितीत झाली.

परंतु ही भावनात्मक अथवा मानसिक पार्श्वभूमी झाली. व्यावहारिक दृष्ट्या येथे राहणाऱ्या मुसलमानांनी पाकिस्ताननिर्मितीचे पुरोगामी परिणाम का ध्यानात घेतले नाहीत? सुशिक्षित मुसलमानांनीदेखील याचा का विचार केला नाही? असा एक प्रश्न नेहमी माझ्या मनात येतो. या प्रश्नाचे उत्तरही मी सर्वत्र शोधण्याचा प्रयत्न करतो. माझ्या मते, मुस्लिम लीगच्या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतातील अल्पसंख्याक ओलीस धरण्याचा जो सिद्धान्त होता, त्याचा सुशिक्षित मुसलमानांच्या मनावर जबरदस्त दबाव होता, हे एक कारण. सुशिक्षित मुसलमान हा एका दृष्टीने मध्ययुगीन ओलीस ठेवण्याच्या कल्पनेतच अडकून पडला होता. त्याच्यावर आधुनिकतेचे संस्कार खऱ्या अर्थाने झालेलेच नव्हते. (अद्यापही झालेले नाहीत.) दुसरे कारण- भारत झट्कन् एकवटला जाईल, असे येथील मुसलमानांना वाटत नव्हते. सुशिक्षित मुसलमानांनादेखील वाटत नव्हते. हैदराबाद स्वतंत्र होईल, संस्थाने स्वातंत्र्य पुकारतील आणि अशा परिस्थितीत दुबळा भारत व पर्यायाने विस्कळीत हिंदू पाकिस्तानशी स्पर्धा करू शकणार नाहीत असा सुशिक्षित मुसलमानांचा कयास होता!

अशा या दुबळ्या भारताचे लचके तोडणे पाकिस्तानला सहज शक्य होईल, पाकिस्तानचा विस्तार होत राहील; निदान अर्धा भारत तरी पाकिस्तानच्या ताब्यात जाईल, अशी सुखस्वप्ने उत्तरेकडील सुशिक्षित मुसलमान बाळगत होते! आणि दंगलीचा प्रतिकार हिंदू करणार नाहीत, असेही त्यांना वाटत होते. हिंदू प्रतिकार दुबळा ठरेल, हाही त्यांचा अंदाज होता. हिंदू दुबळा असल्याचे चित्र त्यांच्या मनात मुस्लिम राजवटीच्या दीर्घ काळच्या इतिहासातून निर्माण झाले होते. हिंदू-अध:पतनाचा काळ संपत आला असल्याचे या सुशिक्षित मुसलमानाला कधी जाणवलेच नाही!

भारतातील सुशिक्षित मुसलमानांनी पाकिस्तानच्या निर्मितीचे परिणाम कधी लक्षात घेतले नाहीत, याची ही काही महत्त्वाची आणि कठोर सत्य कारणे आहेत. मुस्लिम सुशिक्षित समाजाचा विचार करण्याचे कारण एवढेच की, कोणत्याही अशिक्षित समाजाला आपण चुकीच्या चळवळीबद्दल दोष देण्यात अर्थ नाही. कोणत्याही समाजाचे नेतृत्व सुशिक्षितवर्गच करत असतो. चळवळीच्या परिणामांची त्यानेच दखल घ्यायची असते. म्हणून, परिणामांची जबाबदारी त्याच्यावरच येते.

परंतु, मुस्लिम नेतृत्वाचा हा सर्व कयास चुकीचा ठरला. हिंदूंनी दंगलीला दंगलींनी उत्तर दिले. नौखालीची किंमत बिहारमध्ये मुसलमानांना द्यावी लागली. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर पश्चिम पाकिस्तानमध्ये झालेल्या दंगलीची तीव्र प्रतिक्रिया पूर्व पंजाब व दिल्लीच्या आसपास झाली आणि त्या विभागातील सर्वच मुसलमानांना परागंदा व्हावे लागले. काश्मीरमधून पाकिस्तानी टोळीवाल्यांना आणि सैन्याला मागे रेटण्यास भारताने यश मिळवले. पाकिस्तानच्या नकाशात काश्मीरचा समावेश झाला नाही; होऊ शकला नाही! (अजून होत नाही.) हैदराबादमध्ये सैन्य पाठवून तेथील मुसलमानांचा भारतातील सामिलीकरणाला

असलेला विरोध मोडून काढण्यात आला. पाकिस्तानकडून जुनागढ हिसकावून घेण्यात आले आणि वल्लभभाईंनी झपाट्याने सर्व संस्थाने भारतात सामील करून घेतली. भारत एकवटला गेला. हे फार झपाट्याने झाले. येथील मुस्लिम समाजाने ही अपेक्षा कधी केली नव्हती. त्याला या भारताच्या एकत्रीकरणाच्या प्रक्रियेने जबरदस्त धक्का बसला!

मुसलमान समाजाला या धक्क्यातून सावरायला काही काळ गेला. मुस्लिम समाजाच्या तेव्हाच्या आणि सध्याच्या मन:स्थितीचे गमक म्हणून अलिगढ विश्वविद्यालयाचे उदाहरण देता येण्यासारखे आहे. फाळणीच्या मागणीला पाठिंबा देऊन आम्ही आमचे भवितव्य येथील बहुजन समाजाच्या हाती दिले आहे, असे हतबल झालेला मुस्लिम समाज तेव्हा मानीत होता. अलिगढ विश्वविद्यालयाचे तेव्हाचे व्हाईस चान्सलर आणि मुस्लिम लीगचे उत्तर प्रदेशमधील एक नेते श्री.नबाब महंमद इस्माईलखान यांनी अलिगढ विद्यापीठाबाबत काय करायचे ते सरकारने करावे; हे विद्यापीठ सरकारला बंद करायचे असेल तर खुशाल करावे, असे नेहरूंना १९४७ मध्ये कळवले होते. परंतु १९६४ मध्ये तेथील विद्यार्थ्यांनी केलेल्या दंगलीमुळे विश्वविद्यालयाच्या कारभारात सुधारणा करण्याच्या हेतूने सरकारने टाकलेल्या पावलांविरुद्ध तेथील मुस्लिम समाजाने व नेत्यांनी गहजब गेला आणि सरकारला तसा अधिकार नाही, असे म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेली. हा फरक कशामुळे घडला?

खरे म्हणजे, मुस्लिम जातीयवादी प्रवृत्तीत काहीच फरक पडलेला नाही, याचे हे निदर्शक आहे. मुस्लिम जातीयवादी प्रवृत्ती काही काळ परिस्थितीच्या दडपणामुळे दबल्या गेल्या होत्या. त्या पुन्हा आस्ते-आस्ते संघटित झाल्या असून पुन्हा पूर्वीच्याच जोमाने आपले कार्य करू लागल्या आहेत.

येथील मुस्लिम जातीयवादी शक्तीच्या सामर्थ्याचा चढ-उतार हा पाकिस्तानच्या राजवटीच्या स्थिरतेच्या चढ-उतारावर आधारलेला राहिला आहे, हे चाणाक्ष राजकीय निरीक्षकांच्या लक्षात आल्याखेरीज राहणार नाही. पाकिस्तानातील एके काळच्या राजकीय अस्थैर्याने येथील मुस्लिम जातीयवादी राजकारण मंदावलेले होते, परंतु तेथे काही राजकीय बदल झाले. आयूबखानांनी पाकिस्तानला राजकीय स्थैर्य मिळवून दिले. आर्थिक प्रगतीची वाटचाल सुरू केली. लष्करी सामर्थ्य भराभर वाढायला सुरुवात केली. पाकिस्तान आता भारताशी मुकाबला करावयास सिद्ध झाला आहे, हे हेरलेल्या येथील मुस्लिम राजकीय नेत्यांनी मुस्लिम संघटना उभारण्यास जोरदार आरंभ केला. पाकिस्तानला युद्धात अपयश पदरात पडल्यामुळे येथील मुस्लिम जातीय वृत्ती-मनोवृत्तीच्या तेजोभंग झाला आणि म्हणून या नेतृत्वाने आपला मोहरा बदलला. भारतातील बदलत्या राजकीय परिस्थितीचा त्याने गैरफायदा घेण्याचे ठरवले. मुशावरतची स्थापना आणि मुस्लिम मतांच्या आधारे हिंदूंशी सौदा करण्याचा मुशावरतचा प्रयत्न, हा त्याचाच भाग होता. मुस्लिम मतांच्या आणि संख्येच्या आधारे या देशातील राजकारणाला आपण हवे ते वळण लावू, अशी ईर्षा या नेतृत्वाने बाळगली होती. परंतु उत्तर प्रदेशात सत्ता बदलूनही उर्दूला मान्यता मिळू शकली नाही. सौदा करण्याच्या धोरणाची परिणती रांचीच्या दंगलीत झाली. यामुळे मुस्लिम नेतृत्व आता गोंधळलेल्या मन:स्थितीत आहे. तथापि, आपले काय चुकते आहे याचा विचार करावयाच्या मन:स्थितीत ते अजूनही नाही.

पाकिस्तानला पाठिंबा देण्याची चळवळ आपण केल्याचा हा परिणाम आहे, हे प्रामाणिकपणे मान्य करणारा क्वचितच कोणी मुस्लिम भेटतो. आमची चळवळ योग्य होती, स्वयंनिर्णयाचा (पाक) मुसलमानांना अधिकार होता; अखंड भारतात मुसलमानांची याहूनही अधिक दुर्दशा झाली असती. हिंदूंच्या जाचातून बिचारे पाक मुसलमान तरी सुटले. पाकिस्तानला पाठिंबा मिळाल्यामुळे आम्ही आमचे हक्क गमावलेले नाहीत. हिंदूंशी लढून (मुकाबला करके) आम्ही ते मिळवू, अशी आणि अशा प्रकारची विधाने दहांतील नऊ मुसलमान करताना मला माझ्या उत्तर भारताच्या दौऱ्यात आढळून आले. भारतीय मुसलमानांच्या मन:स्थितीची यावरून आपल्याला कल्पना यायला हरकत नाही.

थोडक्यात, येथील मुसलमानी राजकारणाचे यापुढील धोरण अंतर्गत आणि बाह्य परिस्थितीनुसार ठरत जाणार आहे. एकीकडे येथील मुस्लिम जातीयवादी नेते पाकिस्तान आणि मुस्लिम देशांच्या इस्लामी करारातून निर्माण होणाऱ्या (किंवा होण्याची शक्यता असलेल्या) सामर्थ्यातून भारतावर दडपण येण्याची अपेक्षा बाळगतील आणि त्याचबरोबर भारतातील राजकीय अस्थिरतेचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्नही करत राहणार. मुस्लिम लोकसंख्या वाढवण्याचा एक पद्धतशीर प्रयत्न अस्तित्वात असावा, असे मानावयास आधार आहे. अलिगढ विश्वविद्यालयाच्या एका प्राध्यापकाने माझ्याशी बोलताना क्युबेकमधील वाढलेल्या

फ्रेंच लोकसंख्येचे उदाहरण देऊन भारतातील 'मुसलमानांनाही क्युबेकमधील फ्रेंचांप्रमाणे आपल्याला भारतात आणखी एक स्वतंत्र भूमी निर्माण करता येईल' हे काढलेले उद्‌गार मुस्लिम मनोवृत्तीचे यथार्थ दर्शन घडवतात. (क्युबेकमधील फ्रेंच कॅथॉलिक आहेत. इंग्रजी कॅनेडियन प्रोटेस्टंट असल्यामुळे ते कुटुंबनियोजन करतात. कॅथॉलिकांनी कुटुंबनियोजन न केल्यामुळे गेल्या ७५ वर्षांत त्यांनी आपली लोकसंख्या वाढवली, असे या प्राध्यापक महाशयांना सांगायचे होते.) वरील विवेचनावरून आपल्यापुढील प्रश्नांची कल्पना यावयास हरकत नाही. प्रथम आपल्याला पाकिस्तानच्या बाबतीत खंबीर धोरण स्वीकारावे लागेल. खंबीर धोरण ठेवणे याचा अर्थ, पाकिस्तानच्या सहकार्याच्या कृतीला प्रतिसाद न देणे असा मात्र नव्हे. जिथे जिथे सहकार्याचा प्रसंग येईल तिथे सहकार्य करणे; त्याचबरोबर पाकिस्तानला काश्मीरसकट कोणत्याही सीमेवर खंबीरपणे रोखून धरणे, असे धोरण आपल्याला दीर्घ काळ आखावे लागेल. कारण भारत-पाक संघर्ष नजीकच्या भविष्यकाळात संपणार असल्याची भोळसर अपेक्षा बाळगून कोणतेही पाऊल टाकणे चूक ठरेल. आपल्याला निदान ५०/७५ वर्षे या युद्धाला तोंड द्यावे लागणार आहे, ही खूणगाठ मनाशी बाळूगन वागावे लागणार आहे.

या बाबतीत आपल्या राष्ट्रीय नेतृत्वाने काही ढोबळ चुका केल्या आहेत, त्या आपण आता टाळल्या पाहिजेत. गांधींजींचे धोरण पाकिस्तानशी व येथील मुसलमानांशी मृदुपणाचे आणि म्हणून चूक होते. नेहरूंचे धोरण पाकिस्तानशी अधिक वास्तववादी, परंतु येथील मुसलमानांशी मृदू आणि म्हणून चूक होते. वल्लभभाईंचे धोरण हे पाकिस्तान आणि येथील मुसलमानांशी खंबीरपणे वागण्याचे होते. त्यातील उणीव एवढीच होती की, पाकिस्तान आणि येथील जातीयवादी मुस्लिम नेतृत्व यांच्याशी खंबीर वागताना मुस्लिम उदारमतवादी व्यक्तींना (मृदू वागून) अधिक वाव देण्याचे धोरण वल्लभभाईंना अजमावता आले नाही.

आपल्या देशातील कम्युनिस्टांनी व समाजवाद्यांनी आलटून-पालटून गांधीजी व नेहरू यांचे चुकीचे धोरणच पुढे चालवले आहे आणि हिंदू जातीयवाद्यांनी वल्लभभाईंच्या धोरणाला आपला आदर्श मानले आहे. ही दोन्ही आत्यंतिक टोके टाळून वास्तववादी धोरण आपल्या देशातील धर्मनिरपेक्ष म्हणवणाऱ्या पक्षांनी आता अवलंबिण्याची वेळ आली आहे. या बाबतीत जनसंघाच्या एका गटाचे उदाहरण देणे अस्थानी ठरणार नाही. काश्मीरमधील पंडित मुलीच्या आंतरधर्मीय लग्नाच्या निमित्ताने झालेल्या आंदोलनाच्या वेळी जनसंघाचे अध्यक्ष श्री. बलराज मधोक आणि खासदार अटलबिहारी वाजपेयी यांनी केलेल्या निवेदनांतील फरक फार महत्त्वाचा आहे. मधोक यांना हे लग्न होणे नापसंत होते; तर वाजपेयी यांचा आक्षेप ती मुलगी अज्ञान आहे, हा होता. सज्ञान मुलीला कोणाशीही लग्न करण्याचा अधिकार आहे, असे स्पष्ट निवेदन वाजपेयी यांनी केलेले आहे. वाजपेयी यांच्या आणखी एका समतोल विचारांचे उदाहरण येथे देणे गैर ठरणार नाही. गेल्या भारत-पाक युद्धात राजस्थानमधील बारमेर सीमेवर राजस्थान आर्म्स कॉन्स्टिब्यूलरीच्या सैनिकांनी सीमेवरील काही मुसलमानांवर अत्याचार केल्याचे आणि काही स्त्रियांवर बलात्कार केल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. या प्रकरणी समाजवादी नेते मधु लिमये यांनी लोकसभेत प्रश्न विचारायचे ठरवले आणि त्यावर विरोधी पक्षांच्या नेत्यांची सही मागितली. श्री.वाजपेयी हे जनसंघाचे नेते आहेत, त्यांनी या प्रश्नावर सही दिली आणि कोणत्याही नागरिकांवर अत्याचार होणे मी चूक मानतो, अशी भूमिका घेतली.

मला वाटते, ही भूमिका (म्हणजे अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, त्याचबरोबर मुस्लिम जातीयवादाला सतत विरोध करणे) मुस्लिम राजकारणाला वळण देण्याबाबत उपयुक्त ठरेल; त्यायोगे मुसलमानांत एका नव्या समंजस नेतृत्वाचा उदय हाईल. आधुनिकतेचा संस्कार झालेले नवे मुस्लिम नेतृत्व ज्या क्षणी अल्पसंख्य-बहुसंख्य या जाणिवेतून विचार करायचे बंद करील, त्या क्षणी येथील मुस्लिम मनोवृत्तीत आपल्याला फरक झाल्याचे आढळून येईल!

(राष्ट्र सेवादल पत्रिका : दिवाळी १९६७)

**लेख ।** हमीद दलवाई

# हिंदू-मुस्लिम संबंध



भारतातील हिंदू-मुस्लिम संबंधांचा या साऱ्या परिस्थितीतून विचार करायचा, तर तथाकथित मुस्लिम राष्ट्रवादी नेतृत्वाचे अपयश ठळकपणे नजरेत भरते. मुसलमान समाजाला हे नेतृत्व एके काळी वेगळ्या राष्ट्राच्या जाणिवेपासून परावृत्त करू शकले नाही, तर स्वातंत्र्योत्तर काळात उर्वरित भारतातील मुसलमानांना बहुजन समाजाच्या आशा-आकांक्षांशी ते समरस करू शकले नाही. याचे कारण ते सनातनी, परंपरागत होते आणि आहे, हेच होय. मुसलमानांच्या वेगळ्या राष्ट्राच्या मागणीला ते विरोध करीत होते, एवढ्या अर्थाने ते नेतृत्व निश्चितच राष्ट्रवादी होते. याचा अर्थ, ते भारतीय राष्ट्रवादाची कल्पना मान्य करीत होते, एवढाच होतो; परंतु या नेतृत्वापाशी वेगळेपणाची जाणीव होतीच, ते मुसलमान म्हणूनच स्वत:चा विचार करीत होते.

हिंदू-मुसलमानांच्या संबंधांचा विचार करताना गेल्या अनेक वर्षांतील चुकीच्या राजकारणाचा केवळ काथ्याकूट केल्याने आपण काही मार्ग काढू शकणार नाही, या निष्कर्षाप्रत आता मी येऊन पोहोचलो आहे. चुकीच्या गतराजकारणाचा विचारच केला जाऊ नये, असे मला प्रतिपादन करायचे नाही; परंतु या प्रश्नाकडे आता एका वेगळ्या मूलभूत चिकित्सेच्या दृष्टिकोनातून पाहिले जाणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या दृष्टीचा आपल्याकडे अभाव आहे.

गतेतिहासाविषयी आपण बाळगत असलेले पूर्वग्रह हे संबंध स्थिर होणाऱ्या मार्गातील एक फार मोठी अडचण आहे. भारतातील आठशे ते हजार वर्षांचा मुसलमानी अंमल हा आपल्या (म्हणजे मुसलमानांच्या) वैभवाचा काळ असल्याचा मूर्ख समज मुसलमानांत प्रचलित आहे आणि या इतिहासाविषयी अनाकलनीय कटुता काही हिंदूंनी बाळगली आहे. हे इतिहासाचे पूर्वग्रह विसरले जाणे अत्यंत आवश्यक आहे. तेवढे ते सोपे नाही, हे मी जाणू शकतो. वर्तमानकाळ अंधकारमय असलेल्या आणि भविष्याबद्दल उदास साशंकता निर्माण झालेल्या काळात गतेतिहासाची शल्ये गोंजारीत बसण्याची मानवी प्रवृत्ती मी समजू शकतो; परंतु त्यातून आपण भविष्याला वळण लावू शकणार नाही, हेंही तितकेच स्पष्ट आहे.

'इतिहासाचे पूर्वग्रह आपण विसरायला पाहिजेत' असे मी म्हटल्यानंतर पुण्याला एक हिंदुत्ववादी मित्र चिडले होते! ते म्हणाले, "मुसलमानांचे (इतिहासातील) अत्याचार आम्ही विसरूच शकत नाही."

मी त्यांना म्हणालो, "हे अत्याचार झालेच असले, तर ते माझ्या पूर्वजांवर झाले आहेत, तुमच्या नव्हेत. आणि म्हणून मी आता (नावाने का होईना) तुमच्यासमोर मुसलमान म्हणून ओळखला जातो आणि तुम्ही मात्र हिंदूच आहात. माझ्या पूर्वजांवर झालेल्या अत्याचारांबद्दल आज या हिंदुत्ववादी मित्रांनी शोक करीत कशाला बसावे, हे मला

कळलेले नाही.''

अशाच टोकाचा दुसऱ्या प्रकारचा मूर्खपणा मुसलमान करीत असतात. ''आम्ही भारतावर अमुक वर्षे राज्य केले'' असे म्हणणाऱ्या मुसलमानाचा पूर्वज कदाचित आक्रमक मुसलमानांचा प्रतिकार करताना धारातीर्थी पतनही पावला असेल! कदाचित शूद्र म्हणून तो चातुर्वण्याच्या नरकात तेव्हा पिचत राहिला असेल, कदाचित मुसलमान सत्ताधाऱ्यांनी त्याला 'हिंदू' असल्याबद्दल छळलेही असेल!

इतिहासाच्या या वेगवेगळ्या अवस्थांतून होत गेलेल्या स्थित्यंतरांबद्दल आज आपण काय करणार आहोत? वास्तविक, आज मी मुसलमान असल्याबद्दल मला काही अभिमान वाटत नाही; त्याचबरोबर कसली खंत बाळगत बसण्याचेही मला काही कारण नाही. या स्थित्यंतराच्या अवस्था समजू शकणारी निरपेक्ष दृष्टी आता आपण सर्वांनीच धारण केली पाहिजे. ही दृष्टी न येण्याचे कारण या इतिहासातच आहे. सुमारे आठशे ते हजार वर्षांच्या मुसलमानांच्या राजवटीत भारतातील एकूण लोकसंख्येच्या पंचवीस टक्के एवढी लोकसंख्या मुसलमान झाली. अखेरी-अखेरीला तर केंद्रीय प्रबळ मुस्लिमसत्ता खिळखिळी झालेलीही पाहण्याचे त्यांच्या नशिबी आले... या काळात हिंदूंची (मी वेगळ्या अर्थाने येथे 'हिंदूंची' हा शब्दप्रयोग वापरला आहे.) राज्येही स्थापन होऊ शकली.

मुसलमानांचे धर्मांतराचे जे जगड्व्याळ चक्र तेव्हा फिरत होते, ते भारतात मध्यवर्ती प्रबळ इस्लामी सत्ता दुबळी होताच थांबले गेले; आणि हिंदूंची (अथवा या देशातील बहुसंख्य जनता असलेल्यांची, असे आपण म्हणू) प्रबळ मध्यवर्ती सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वीच ब्रिटिशांनी भारतात पाय ठेवला. हिंदू-मुसलमानांच्या (सत्तांच्या) या ऐतिहासिक संघर्षाचा हा जो चमत्कारिक शेवट झाला, त्यामुळे दोन्ही जमातींतील काही गटांना वस्तुस्थितीचे आकलन झालेले नाही. ती वस्तुस्थिती हीच की, भारतातील मुस्लिम सत्ता हिंदू राज्यांनी दुबळी केली आणि पर्यायाने इस्लामीकरणाच्या प्रक्रियेला पायबंद घातला. हिंदू आणि मुसलमान या दोहोंनाही त्याचे नीटसे आकलन झालेले नाही.

हा सारा प्रकार अप्रत्यक्षरीत्या झाला, हे याचे खरे कारण आहे. मुस्लिमसत्तेच्या वाढीचे चक्र (महाराष्ट्रातल्यासारख्या ठिकाणी) रोखले गेले; परंतु त्या सत्तेचा सरळ-सरळ पराभव झाला नाही. तसा पराभव होणे, हे दोन्ही समाजांच्या भावी निरोगी संबंधांच्या दृष्टीने योग्य ठरले असते. आणि म्हणून मुसलमानांच्या तथाकथित आक्रमणाला प्रतिप्रहार करण्याची व उलटी प्रक्रिया सुरू करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या हिंदूंची आणि ती प्रक्रिया पुढे चालविण्याची जणू ऐतिहासिक कामगिरीच आपल्यावर नियतीने सोपविली आहे असे मानणाऱ्या मुसलमानांची मानसिक प्रवृत्ती हे या संघर्षाचे एक कारण आहे.

येथे हे स्पष्ट केले पाहिजे की, या इतिहासाची खंत बाळगणाऱ्या हिंदूंची संख्या त्या इतिहासाचा वारसा चालविण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या मुसलमानांहून फारच कमी होती. याचे कारण दोन्ही धर्मांच्या मानसिक प्रवृत्तींत आपल्याला शोधावे लागेल. मोक्षाच्या कल्पनेने भारावलेल्या हिंदूमनाने चुकीच्या बंधनांच्या शृंखला स्वीकारल्या, त्याचबरोबर अशी खंत बाळगण्यापासून ते मुक्तही होऊ शकले. अतिरिक्त व्यक्तिस्वातंत्र्याने समाजाचा विचार करण्याची पात्रता ते गमावून बसले; परंतु त्याचबरोबर विचार करण्याची परंपरा ते निर्माण करू शकले. विचार करण्याची आणि वेगळे विचार ऐकून घेण्याची हिंदूमनाला गेल्या हजारो वर्षांची सवय आहे. त्यामुळे तटस्थपणे कठोर आत्मपरीक्षण करण्याची मनोवृत्ती त्यांच्यात निर्माण होऊ शकली. या इतिहासाकडे पाठ फिरवली पाहिजे, हे त्यांतील बहुसंख्य समजू शकले.

मुस्लिम मनाला विचार करण्याचीच सवय नव्हती आणि नाही. 'किताबी मजहब' (Religion of Books) श्रेष्ठ असल्याच्या तथाकथित परंपरागत समजुतीत ते इतके गुरफटले गेले की, मुसलमानांचे जे-जे ते चांगले असाच त्यांचा समज होऊन बसला. हा समज अद्यापही कायम आहे. महंमद पैगंबराला फक्त सेमिटिक धर्मसंस्थापकांचीच माहिती होती. त्यामुळे त्याने त्या धर्मसंस्थापकांना पैगंबर माना, असे म्हटले. भारतातील धर्मांची त्याला माहिती नव्हती, हे सर्व इतिहासकारांनी तर नमूद केलेच आहे; परंतु पैगंबराच्या काही चरित्रकारांनीदेखील मान्य केले आहे. उदा. : Ideal Prophet by Khaja Kamaloddin. आणि योगायोगाने प्रत्यक्ष पराभव (भारतात) होऊ न शकल्यामुळे वैचारिक आवर्तने या समाजात निर्माण होऊ शकली नाहीत.

आपल्याकडे राजकीय जागृतीचा काळ आला, तेव्हा १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात मुसलमान समाजाने प्रचंड प्रमाणात भाग घेतल्यामुळे तो भरडून निघाला होता. आधी आधुनिक शिक्षणाकडे त्याने पाठ फिरविली आणि मागाहून शिक्षण घेण्याची त्याला आवश्यकता वाटू लागली ती सर्व प्रकारच्या संधी हिंदू समाजाला लाभतील, या न्यूनगंडाच्या जाणिवेतून. आधुनिक शिक्षणाने मुसलमान समाजाचा हिंदू

समाजाकडे पाहावयाचा मूलभूत दृष्टिकोन वास्तविक बदलायला हवा होता; परंतु तो बदलला नाही. एक प्रकारच्या घाईने घेतलेल्या शिक्षणाने निर्माण झालेली मुसलमानांची पहिली पिढी आधुनिक विचारांनी न भारावली जाता, नव्या लोकशाहीच्या (एक व्यक्ती : एक मत) जमान्यात कारभार हिंदूंच्या हातात जाणार, या विचाराने भयभीत झाली.

वास्तविक, भयभीत होण्यासारखे काहीच नव्हते. किंबहुना, ती अगदी स्वाभाविक प्रक्रिया घडून येणार होती. एके काळी शासकाच्या मनोवृत्तीतून वागणूक देणाऱ्या मुसलमानांना हिंदूंच्याबरोबरच्या दर्जाची कल्पना मानवेनाशी झाली आणि मुसलमानांच्या राजकीय चळवळींची सुरवात ही अशी वेगळेपणाच्या मागण्यांची मुहूर्तमेढ ठरली. बहुसंख्याक हिंदूंनी मुसलमानांच्या न्याय्य अधिकारांवर गदा आणली असती, असे समजण्यासारखी कोणतीही घटना घडलेली नव्हती. काँग्रेसच्या स्थापनेनंतर भारतातील सर्व जमातींना तिच्या आशा-आकाक्षांशी समरस करून घेण्याचे प्राथमिक प्रयोग काँग्रेसच्या नेत्यांकडून करण्यात येत होते.

मुसलमान आधी या चळवळीबद्दल उदासीन होते आणि जेव्हा तिचे स्वरूप त्यांना जाणवले, तेव्हा त्यांनी आपल्या अधिकाराची भाषा सुरू केली. ही अधिकारांची मागणी करणारे मुस्लिम लीगचे नेतृत्व मुसलमानांत असलेल्या स्वतःच्या वेगळेपणाच्या जाणिवेचाच फायदा घेत होते. त्या आधीच्या मुसलमानांतील साऱ्या धार्मिक आणि राजकीय चळवळींची दिशा अशी या बंदिस्त मनाने ठरवून दिली होती. देवबंद येथील इस्लामी धर्मविचारांची चळवळही अशाच प्रकारच्या इस्लामच्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेतून उगम पावली होती. ब्रिटिश सरकारविरुद्ध तिचा रोख होता, हे खरे; पण तिचा हेतू भारतात इस्लामी राज्य निर्माण करणे, हा होता. ब्रिटिशांनंतर ती हिंदूंविरुद्ध शस्त्र उगारणार, असाच याचा अर्थ होता.

फाळणीच्या वेळचे स्थलांतर (१९४७)



आधुनिक शिक्षणाचे युक्त असलेले सारेच मुसलमान या विचाराचे प्रतिनिधित्व करीत नव्हते, हे खरे; परंतु जे करीत नव्हते, ते भौतिकवादाकडे आकर्षित होत होते. याचे कारण स्पष्ट आहे. धर्माचा त्याग केल्याखेरीज त्याला आधुनिकतेचा स्वीकारच करता येत नाही, अशी चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली होती आणि आजही काही प्रमाणात अस्तित्वात आहे. सुशिक्षित मुसलमान हा एक तर परंपरागत धार्मिक विचारांतच गुरफटून राहतो किंवा त्याचा त्याग करून मोकळा होतो, या दोन एकांतिक टोकांकडे लंबकासारखा हेलकावे खात असतो. कारण धर्माचा आधुनिक अन्वयार्थ लावण्याची हिंमत तो करू शकत नाही. (धार्मिकतेचा आता नव्याने विचार केला पाहिजे, असे एका मुसलमान मित्राजवळ मी एकदा म्हणालो; तेव्हा त्याने मला 'आहे त्याच्यापलीकडे विचार करायचा नाही, अशी कुराणाची आज्ञा असल्याचे' उत्तर दिले!)

हिंदू-मुसलमानांच्या संघर्षमय संबंधांचे हे एक कारण आहे. तथापि, त्याचबरोबर हिंदूधर्माच्या चातुर्वर्ण्याच्या पद्धतीने केलेला आघातही आपल्याला कमी लेखून चालणार नाही. धर्मांतर झालेल्याला बहिष्कृत केले गेल्याने, त्याच्याशी फटकून वागल्याने मुसलमानांच्या वृत्ती हिंदूविरोधी बनण्यास हातभार लागला आहे; कारण मुळात तो हिंदूच होता, बाहेरून येथे आला नव्हता. सांस्कृतिक दृष्ट्या हिंदूहून त्याचे काहीच वेगळे नव्हते. हा वेगळेपणा निर्माण करावयास धार्मिक श्रेष्ठतेच्या कल्पनेने मुसलमानांनी जसा जाणूनबुजून प्रयत्न केला, तसाच हिंदूंनी आपल्या चातुर्वण्याच्या पद्धतीने अजाणता का होईना फटकून वागण्याने केला. त्यामुळेच इथल्या मुसलमानी मनाची जडण-घडण ही केवळ खास मुसलमानी राहिलेली नाही; चातुर्वर्ण्याच्या संदर्भातील ती हिंदूविरोधी बनली आहे. जीनांनी या साऱ्याचा फायदा घेतला!

मुसलमानांतील लीगचे नेतृत्व आणि राष्ट्रवादी नेतृत्व यांच्यातील एका चमत्कारिक विरोधाभासाकडे कुणाचे फारसे लक्ष गेलेले नाही. मुस्लिम लीगचे नेते वृत्तीने आधुनिक, परंतु लोकशाहीविरोधी (किंबहुना दहशतवादी) होते; तर राष्ट्रवादी (मुस्लिम) नेतृत्व सनातन, परंपरागत परंतु लोकशाहीला मानणारे होते. आपल्या लोकशाहीविरोधी आकांक्षा साध्य करण्यासाठी लीगवाल्यांनी धर्माचे साधन वापरून सारा मुसलमान समाज आपल्यामागे संघटित केला आणि सनातन नेतृत्वाला हतबल केले. लीगच्या नेतृत्वाच्या कर्तबगारीपेक्षा या राष्ट्रवादी सनातन नेतृत्वातील उणीव याला अधिक कारणीभूत ठरली. कारण धर्माचे आधुनिक स्वरूप मुसलमान समाजासमोर हे नेतृत्व स्पष्ट करू शकले नाही.

जीना आधुनिक विचारांचे होते, म्हणून त्यांचा गौरव करता येणे शक्य नाही; कारण सत्तेच्या आपल्या आकांक्षांखातर त्यांनी ज्या शक्ती मोकाट सोडल्या, त्या गेली अठरा वर्षे झाली तरी आटोक्यात येऊ शकलेल्या नाहीत. मुसलमानांना जीनांनी प्रथम वेगळ्या राष्ट्रवादाची प्रेरणा दिली नाही, हे जितके खरे; तितकेच मुसलमानांतील या प्रेरणेला आपल्या हेतुखातर त्यांनी मोकाट सोडले, हे विसरता येणार नाही. जीनांच्या साऱ्या राजकारणाचे सूत्र हिटलरच्या राजकारणाशी फार जुळते आहे. अखेर हिटलर हा प्रामाणिकपणे जर्मन वंशाच्या श्रेष्ठतेवर विश्वास ठेवत होता आणि जीनांचा तसा (मुस्लिमश्रेष्ठतेवर) नव्हता, म्हणून जीनांचे कृत्य कमी गर्हणीय ठरत नाही. वेगळ्या राष्ट्रविस्ताराची जीनांची प्रेरणा मूलत: हिटलरच्या जर्मन राष्ट्राच्या विस्ताराच्या कल्पनेहून भिन्न नव्हती. शिवाय, हिंदूंच्या बहुसंख्यतेने मुसलमानांचे हित खरोखर धोक्यात येणार नाही, हे समजण्याइतके ते दूधखुळे नव्हते. जीना केवळ मुसलमानांच्या हिताचीच भाषा बोलत नव्हते, इस्लाम धोक्यात असल्याची आरोळी त्यांनी ठोकली होती. हिंदू धर्मांचे स्वरूप पाहता, दुसऱ्या धर्मावर तो कुरघोडी करणे शक्यच नव्हते व नाही. कारण धार्मिक विस्तारालाच त्यात वाव नव्हता. धर्माच्या विस्ताराची कल्पना खरे म्हणजे इस्लाममध्ये होती (किंवा आहे) आणि म्हणून पाकिस्तान इस्लामी राज्य जाहीर केले गेल्यानंतर इतर धर्मीयांना दुय्यम नागरिकत्व लाभावे, यात मला आश्चर्य वाटले नाही. (भारतातील अल्पसंख्य आणि पाकिस्तानातील अल्पसंख्य यांच्या स्थितीत आपल्याला यामुळेच फरक दिसतो.)

माझ्या मते, जीनांच्या विस्तारवादाच्या प्रेरणा याच मध्ययुगीन भारतातील इस्लामी राजवटीतून निर्माण झाल्या होत्या. भारतात इस्लामी सत्ताधाऱ्यांचे आगमन होण्यापूर्वी जशी तेव्हा वेगवेगळी राज्ये अस्तित्वात होती, तशी काहीशी परिस्थिती स्वातंत्र्यानंतर पुन्हा भारतात निर्माण होईल आणि आपण त्याचा फायदा घेऊ शकू, असा जीनांचा कयास असावा, असे समजावयास आधार आहे. भारतात संस्थांचे त्वरित विलीनीकरण झाल्याने जीनांच्या या आकांक्षांना तडे गेले. पाकिस्तानचे आजचे भारताविषयीचे वैर हे या भ्रमनिराशेतूनही उद्‌भवलेले आहे.

भारतातील हिंदू-मुस्लिम संबंधांचा या साऱ्या परिस्थितीतून विचार करायचा, तर तथाकथित मुस्लिम राष्ट्रवादी नेतृत्वाचे अपयश ठळकपणे नजरेत भरते. मुसलमान समाजाला हे नेतृत्व एके काळी वेगळ्या राष्ट्राच्या जाणिवेपासून परावृत्त करू शकले नाही, तर स्वातंत्र्योत्तर काळात उर्वरित भारतातील मुसलमानांना बहुजन समाजाच्या आशा-आकांक्षांशी ते समरस करू शकले नाही. याचे कारण ते सनातनी, परंपरागत होते आणि आहे, हेच होय. मुसलमानांच्या वेगळ्या राष्ट्राच्या मागणीला ते विरोध करीत होते, एवढ्या अर्थाने ते नेतृत्व निश्चितच राष्ट्रवादी होते. याचा अर्थ, ते भारतीय राष्ट्रवादाची कल्पना मान्य करीत होते, एवढाच होतो; परंतु या नेतृत्वापाशी वेगळेपणाची जाणीव होतीच. ते मुसलमान म्हणूनच स्वत:चा विचार करीत होते. मुसलमान समाजाचा वेगळेपणा त्याला कायमच ठेवायचा होता. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्वकाळी जातीय मागणीला विरोध करीत असल्याचे दिसणारे हे नेतृत्व स्वातंत्र्योत्तर काळात स्वत:च जातीय बनल्याचे दृश्य आपल्याला दिसून आले. याचा परिणाम मुसलमान समाज त्या जुन्याच कल्पनांत गुरफटून राहण्यात झाला. त्याला जुन्या परंपरागत धार्मिक कल्पनेतून आता मुक्त केले पाहिजे.

हे कार्य आपण कसे पार पाडणार आहोत?

मुसलमानांना उपेक्षिततेने वागवणाऱ्या चातुर्वर्ण्याची चौकट आता खिळखिळी झाली आहे, परंतु मुस्लिम परंपरागत मनोवृत्तीला मात्र अद्याप धक्का लागलेला नाही. तिच्यावर आघात केले जाण्याची आता आवश्यकता आहे आणि ते परंपरागततेचा त्याग केलेल्या मुसलमानांनीच केले पाहिजे. मुस्लिम स्त्रियांची चळवळ हा असा आघात करण्याचा एक अल्प प्रयत्न! आपल्या खऱ्या अथवा काल्पनिक गाऱ्हाण्यांचा बागुलबुवा उभा न करता बहुजन समाजाच्या इच्छा-आकांक्षांशी समरस होण्याची प्रवृत्ती मुसलमान समाजात निर्माण होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात हिंदू समाजाने मुसलमानांना अनुदारतेने वागविले, असे मानायला काही आधार नाही. त्यांच्या विरुद्ध दंगे झाले असतील, तर ती त्यांनीच पाकिस्तानच्या प्राप्तीसाठी सुरू केलेल्या दंगलीच्याच चक्राची प्रतिक्रिया होय. दुखावलेल्या अंत:करणाने अलिप्ततावादाची जोपासना करून दंगे थांबणार नाहीत. हिंदू समाजाच्या मनात बसत असलेला अविश्वास कृतीने नष्ट केल्याने आणि त्यांचा विश्वास संपादन करूनच मुसलमानांना स्वत:चे रास्त स्थान प्राप्त करून घेता येईल.

त्याचबरोबर सारा मुसलमान समाज हा १९४७ च्या मनोभूमिकेत वावरत असल्याचे गृहीत धरण्याचा मूर्खपणा करूनही आपण त्यांच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणू शकणार नाही. आज त्या समाजातही विचारमंथन सुरू झाले आहे. नेटकी, अचूक दिशा दाखविण्याचे सततचे प्रयत्न त्या समाजातील काही माणसे जिद्दीने करीत आहेत, त्यांची दखल घेतली गेली पाहिजे; नव्हे, त्यांना बहुजन समाजाने पाठिंबा दर्शविला पाहिजे. अखेर सर्वांबद्दल अविश्वास दर्शविल्याने आपण काहीच साध्य करू शकणार नाही.

आज मुसलमान समाजात विविध प्रवृत्ती अस्तित्वात आहेत. पाकिस्तानविषयीचा जिव्हाळा तर आहेच आहे. (तो केवळ आपण संतापून नष्ट होणार नाही. आपल्या कल्याणाकरिता पाकिस्तानची आवश्यकता आहे असे मानणाऱ्या समाजाची पाकिस्ताननिष्ठा- ती कितीही चुकीची, राष्ट्रीय निष्ठेशी विघातक आणि संतापजनक असली तरी- समजून घेतली पाहिजे. ती नष्ट करायची असेल; तर पाकिस्तानबाबतीत वेगळे, खंबीरतेचे धोरण अमलात आणले पाहिजे. हिंदू देशबांधवच तुमचे हित आणि जीवित सांभाळतील, पाकिस्तान नव्हे; हे पाकिस्तानला प्रतितडाखे देऊनच आपण सिद्ध करू शकू, त्या समाजावर संताप काढून नव्हे!) सर्वसाधारणपणे- काँग्रेसचा पाठिंबा राहण्यामागे आज मुसलमान समाजाचा कल आहे. परंतु त्यांच्यातील एकसंधी वृत्तीही संपलेली नाही. त्याचबरोबर तिचा आविष्कार होण्याचे त्या समाजाच्या एकसंधत्वाचे सामर्थ्य लयाला गेले आहे. एक प्रकारच्या पराभूत मनोवृत्तीत ती आज वावरत आहे. मुसलमान समाज अद्याप जातीयवादीच आहे. तथापि, आक्रमक जातीयवाद आणि बचावात्मक जातीयवाद यांच्यातील फरक आपण ओळखला पाहिजे. एखाद्या समाजाच्या चुकीच्या निष्ठा जेव्हा बचावात्मक पवित्रा धारण करतात, तेव्हा त्यांना आता तडे जात असल्याची विदारक जाणीव त्या समाजाला होऊ लागली असल्याचे हे लक्षण आहे. त्यांच्यातील भ्रमनिरास झालेल्या नव्या पिढीला आपण जवळ करायला हवे; कारण त्याखेरीज त्यांच्यात नव्या मनोवृत्तीचा उदय होऊच शकणार नाही.

'अल्पसंख्याकांचे अधिकार' म्हणून जे काही मागण्यात येते, ते अतिशय अवास्तव आणि चुकीचे असते. अल्पसंख्याकांचे अधिकार तरी कोणते? माझ्या मते, अल्पसंख्याकांना धर्म (म्हणजे धर्माची अध्यात्माची जी बाजू आहे, तेवढ्यापुरता) पाळण्याचे स्वातंत्र्य असले

पाहिजे आणि तो अल्पसंख्याक असल्यामुळे त्याला कुठली संधी नाकारली जाता कामा नये; याखेरीज कोणत्याही वेगळ्या मागणीचा कधी विचार केला जाता कामा नये. कारण या मागण्या आपली अलिप्तता अथवा वेगळेपणा कायम टिकविण्याच्या प्रयत्नांचा एक भाग असतो.

ज्या उदारमतवादी अल्पसंख्य मुसलमान समाजातून परंपरागत नेतृत्वाचा त्याग केला जाण्याची शक्यता होती, तो जीनांच्या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताने साफ निकालात निघाला, ही हिंदू-मुसलमान संबंधांतील एक मोठीच शोकांतिका आहे. भारतात त्याला महत्त्व उरले नाही आणि पाकिस्तानात तो देशद्रोही समजला गेला. या उदारमतवाद्यांच्या प्रवाहाचे संगोपन आपण पुन्हा करणे आवश्यक आहे. पाकिस्तानात ए. के. ब्रोही, जी. एम. सय्यद आदींच्या रूपाने तो अद्याप अस्तित्वांत आहे. त्याचबरोबर फाळणीला विरोध करणाऱ्या पाकिस्तानातील गटांची झालेली ससेहोलपट आपण मुकाट्याने पाहत राहण्याचा भयानक गुन्हा केला आहे. सरहद्द गांधी, खान अब्दुल सयदखान, फझलुल हक आणि खिजर हयातखान तिवाना आदींची शोकांतिका ही खरी आपल्या नालायक नेतृत्वाच्या कर्तृत्वहीनतेची शोकांतिका होय. आता ती चूक सुधारली गेली पाहिजे. भारताचे विघटन करण्याचे पाकिस्तानने ठरवले, तरी ते घडवून आणणे तेवढे सोपे नाही. कारण नागप्रदेश अथवा मिझो जिल्हा हा भारताच्या एकूण क्षेत्रफळातील अत्यल्प भाग आहे. तथापि, पूर्व पाकिस्तान अथवा सरहद्द प्रांत म्हणजे तीन-चतुर्थांश पाकिस्तान आणि तेवढा सारा भाग आज असंतोषाने पेटलेला असूनही आपण मुकाट्याने ते पाहत बसलो आहोत. कसलीही अपेक्षा न बाळगता या विभागांतील चळवळींना सातत्याने मदत करीत राहणे आणि पाकिस्तानने प्रहार केल्यास जबरदस्त प्रतिप्रहार करणे, हेच पाकिस्तानबाबतीत धोरण ठेवले गेल्यास भारत-पाक संबंध आणि पर्यायाने येथील हिंदू-मुसलमान संबंध स्थिर होण्यास साह्यभूत ठरेल. अखेर हे दोन्ही देश एकत्र येणार असतील, तर केवळ आपल्या लष्करी बळावर आपण आणू, असे समजणे हीदेखील आत्मवंचनाच ठरेल. याबाबतीत पाकिस्तानातदेखील आपल्याला सदिच्छा आणि नव्या प्रवृत्ती निर्माण कराव्या लागतील. हे आपल्याला काळाचे आणि इतिहासाचे आव्हान आहे, ते स्वीकारण्याची जिद्द आपण दाखविली पाहिजे. मुसलमानांनी परंपरागततेचा त्याग केल्याने या कार्याला गती मिळणार आहे. त्याबरोबर मुसलमानांविषयीच्या सार्वत्रिक संशयाला मूठमाती दिल्याने त्यातील अडचणी दूर होणार आहेत. ज्यांना ज्यांना हे कार्य प्रिय वाटते, त्या-त्या साऱ्यांनी एकत्र येऊन हे आव्हान पार पाडले पाहिजे. सध्याचा काळ त्याला अधिक अनुकूल आहे. त्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.

घटनेने आपण धर्मातीततत्व केलेच आहे. या धर्मातीततत्वाच्या आधारेच आपण पुढे पाऊल टाकू या. अल्पसंख्याक जमातींनी खरे म्हणजे धर्मातीततेचा प्रवाह अधिक बळकट केला पाहिजे, कारण त्यामुळे त्यांच्या हक्कांना आपोआपच न्याय्य संरक्षण लाभते. परंतु, मुसलमान धर्मातीतपणाचा उदो-उदो करतात, तेव्हा ते धर्मातीत नसतात; धर्मातीततेचे फायदे फक्त त्यांना हवे असतात आणि जबाबदाऱ्या हिंदूंच्या माथ्यावर झटकून ते पुन्हा वेगळे राहू इच्छितात. हे यापुढे चालू देता कामा नये. आपण सर्वांनी समान अधिकार आणि समान जबाबदाऱ्या घेतल्या पाहिजेत. या दृष्टीने दोन्ही समाजांना जवळ आणण्याच्या कामी सर्वांना समान नागरी कायदा क्रांतिकारक ठरेल. शासन जर असा कायदा करीत नसेल, तर शासनाला तो करावयास भाग पाडण्यात आले पाहिजे. मुसलमानांत आधुनिकतेची प्रवृत्ती निर्माण व्हावयास त्यामुळे फार साह्य होईल. वेगळ्या शाळा, वेगळी भाषा, वेगळा शिक्षणक्रम या साऱ्यांनाच आता तिलांजली दिली पाहिजे. भारत आणि पाकिस्तान एकत्र येण्याआधी येथील हिंदू-मुसलमान समाज एकत्र येणे आवश्यक आहे. त्यासंबंधीचे हे विवेचन मी केले आहे, ते अपुरे आहे; परंतु लेखनमर्यादेनुसार पुरेसे आहे, असे वाटते. या संबंध प्रश्नाला अनेक अंगे आहेत. त्या दृष्टीने सर्वांगीण प्रयत्नांची आवश्यकता आहे. परंतु जे प्रयत्न करायचे ते चुकीचे असू नयेत, एवढा मात्र माझा आग्रह आहे. कारण चुकीच्या प्रयत्नांची फळे आपण सध्या भोगतो आहोत.

('वसंत' मासिक : सप्टेंबर १९६६)



# हमीद दलवाई यांची पुस्तके

१. **लाट** (१३ कथांचा संग्रह)
पहिली आवृत्ती १९६१ : साधना प्रकाशन, पुणे
तिसरी आवृत्ती २००३ : मौज प्रकाशन, मुंबई (उपलब्ध आहे)
पृष्ठे : ११०, किंमत : १०० रुपये

२. **इंधन** (कादंबरी), मौज प्रकाशन, मुंबई (उपलब्ध आहे)
पहिली आवृत्ती : १९६५, सातवी आवृत्ती : २०१३,
पृष्ठे : १५२, किंमत ८० रुपये
या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद दिलीप चित्रे यांनी
Fuel या नावाने केला असून, ते पुस्तक
'नॅशनल बुक ट्रस्ट' ने प्रकाशित केले आहे.

३. **राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान :** (लेखसंग्रह)
पहिली आवृत्ती : २००२, साधना प्रकाशन, पुणे
दुसरी आवृत्ती : २०१२, सुगावा प्रकाशन, पुणे (उपलब्ध आहे.)
पृष्ठे : २०८, किंमत : २०० रुपये

४. **इस्लामचे भारतीय चित्र** (शोधयात्रा)
पहिली आवृत्ती : १९८२, श्रीविद्या प्रकाशन, पुणे
पृष्ठे : ६४ (आवृत्ती संपली आहे.)

५. **मुस्लिम जातीयतेचे स्वरूप : कारणे व उपाय** (साधनातील चार लेख)
पहिली आवृत्ती : १९६८, साधना प्रकाशन, पुणे
पृष्ठे : ५६ (उपलब्ध नाही)

6. **Muslim Politics in India** (Essays)
Translated by Dilip Chitre
First Edition : 1968, Nachiket Publications, Mumbai.
Third Edition : 2002, Published by
Indian Secular Society, Mumbai,
Pages : 134, Price : 120 Rs.

७. **आग्नेय आशियातील संघर्ष** (इतिहास) :
लेखक – ब्रायन क्रोझियर । मराठी अनुवाद : हमीद दलवाई
जनपद प्रकाशन, मुंबई (आवृत्ती संपली)
पहिली आवृत्ती : १९६७, पृष्ठे : २१४

# हमीद दलवाई यांच्याविषयीची पुस्तके



१. **मी भरून पावले आहे** (आत्मचरित्र) : मेहरुन्निसा दलवाई
पहिली आवृत्ती : १९९५, साधना प्रकाशन, पुणे
दुसरी आवृत्ती : २०१०, मेहता प्रकाशन, पुणे,
(आवृत्ती संपली आहे.) पृष्ठे : २००

२. **दगडावरची पेरणी** (कार्यकथन) : सय्यदभाई
पहिली आवृत्ती : २००९, अक्षरमानव प्रकाशन, पुणे
दुसरी आवृत्ती : २०१५, अक्षरमानव प्रकाशन, पुणे.
(उपलब्ध आहे) पृष्ठे : २००, किंमत : २०० रुपये
या पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती 'समकालीन प्रकाशन', पुणे यांनी तर उर्दू आवृत्ती 'प्रोग्रेसिव मुस्लिम्स फोरम' यांनी काढली आहे.

३. **हमीद दलवाई : क्रांतिकारी विचारवंत** (लेखसंग्रह)
संपादक – प्रा.शमसुद्दीन तांबोळी (उपलब्ध आहे)
पहिली आवृत्ती : २००९,
दुसरी आवृत्ती : २०१४
डायमंड प्रकाशन, पुणे. पृष्ठे : १८०, किंमत : २०० रुपये
हमीद दलवाई यांचे आठ लेख आणि त्यांच्यावर विविध क्षेत्रांतील १३ मान्यवरांनी लिहिलेले लेख.

४. **हमीद** (आठवणी मित्राच्या) : अनिल अवचट
नीळकंठ प्रकाशन, पुणे
पृष्ठे : ८०, किंमत : ५० रुपये

## लेखन कार्यशाळा

महाराष्ट्रातील नवोदित लेखकांसाठी मुस्लिम समाजातील उदारमतवादी व्यक्ती, पुरोगामी विचारधारा, मुस्लिम समाजाचे योगदान आणि मुस्लिम समाजाच्या विविधांगी प्रश्नांवर पुस्तके प्रकाशित करावयाची आहेत.

यासंदर्भात दिनांक २६ ऑगस्ट २०१५ रोजी, लेखन कार्यशाळेचे आयोजन केले आहे. यात राजन खान आणि इतर ज्येष्ठ मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यशाळेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी
**प्रा.शमशुद्दीन तांबोळी,**
अध्यक्ष, मुस्लिम सत्यशोधक मंडळ,
भ्रमणध्वनी : 9822679391 किंवा 9175823162 या क्रमांकावर
सकाळी १० ते १२ किंवा सायंकाळी ५ ते ७ या वेळेत संपर्क साधावा.

# आपल्या मुलांना लहानपणापासूनच बचतीची सवय लावणारी CUBS योजना

CUBS DEPOSIT SCHEME
The small account for big dreams

- वय वर्षे २१ च्या आतील मुलांसाठी
- प्रारंभिक ठेव रु. ५०/-
- वय वर्षे १४ नंतर मुलांना स्वतःचे खाते हाताळण्याची मुभा
- खाते उघडणाऱ्या सर्व मुलांना भेटवस्तू
- खाते उघडणाऱ्या मुलाच्या नावावर वैयक्तिक पासबुक



आकर्षक भेटवस्तू

सारस्वत बँक

*अटी लागू

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेडयुल्ड बँक)

**पुणे झोन - ८/३, एरंडवणा, कर्वे रोड, नळ स्टॉप जवळ, पुणे ४११ ००४**

Website:www.saraswatbank.com e-mail:customerservicecentre@saraswatbank.com

साधना साप्ताहिक :
१५ ऑगस्ट २०१५

Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ / रजि.क्र. पी.सी.डब्ल्यू./०८०/२०१५–१७
Posted at Marketyard PSO, Pune / Posting Every Thursdy/Date of Publication : 10-8-2015

# प्रकाशनपूर्व सवलत नोंदणी सुरू झाली

## साधनाने ६० व्या वर्षी सुरू केलेला उपक्रम...

## बालकुमार दिवाळी २०१५

(संपूर्ण बहुरंगी)

बाल-कुमार

पृष्ठे : ४४, किंमत : ३० रुपये

**सवलतीत : १५ रुपये**

(५० पेक्षा अधिक प्रतींची नोंदणी असेल तर)

सुरुवातीची तीन वर्षे आठ रुपये,
तर नंतरची चार वर्षे दहा रुपये
इतक्या अल्प किंमतीत बालकुमार अंक
उपलब्ध करून दिला होता.
या वर्षी आठ पाने वाढवून,
किंमत पाच रुपये वाढवली आहे.

(मागील सहा वर्षे सरासरी साडेतीन लाख प्रती
वितरीत झाल्या आहेत)

## साधनाने ६६ व्या वर्षी सुरू केलेला उपक्रम...

## युवा दिवाळी २०१५

(संपूर्ण बहुरंगी)

युवा

पृष्ठे : ६०, किंमत : ४० रुपये

**सवलतीत : २० रुपये**

(२५ पेक्षा अधिक प्रतींची
नोंदणी असेल तर)

गेल्या वर्षी
पहिला युवा दिवाळी अंक काढला,
त्याच्या ७५ हजार प्रती
वितरीत झाल्या.

संपर्क : साधना साप्ताहिक

४३१ शनिवार पेठ, पुणे ३० फोन ०२० २४४५१७२४ weeklysadhana@gmail.com

**व्यवस्थापक :** (बालकुमार व युवा अंक) गोपाळ नेवे, Mob. : 9421702841